मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-आश्विन-मार्गशीर्ष १९३५
ऑक्टोबर-डिसेंबर २०१३ / खंड ३७ अंक ३

- भारतातील भूमी सुधारणा : एक दृष्टिक्षेप
- थेट गुंतवणुकीचा किरकोळ व्यापारावर परिणाम
- आदिवासी जागल्यांची आर्थिक स्थिती
- जागतिक अर्थव्यवस्थेत विकासासाठी सहकार
- बांबू-प्रक्रिया एक महाउद्योग
- भारतीय शेती क्षेत्रात काळा पैसा : एक आव्हान
- वित्तीय समावेशन : प्रगती व आव्हाने
- जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम
- महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरुप व उपाययोजना
- ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना
- असंघटित क्षेत्र व कामगार कल्याण
- महाराष्ट्रातील स्थूल उत्पादन : क्षेत्राचा शेती हिस्सा
- ग्रंथ परीक्षण : फ्रँकलिन रुझवेल्ट
- महाराष्ट्रातील साखर उद्योग : समस्या व उपाय

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्म सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

nternational Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

SSN 0973-8452

eg.No. 31918/77

www.marthpari.org

# अर्थसंवाद

ऑक्टोबर-डिसेंबर २०१३ / खंड ३७ अंक ३

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

---

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

---

सल्लागार मंडळ
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहुल म्होपरे
अशोक हळ्ळी

---

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश निकम
मातृपितृ-कृपा,
प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म णि का

- **अविनाश निकम**, शहादा
  संपादकीय संवाद ........ १०९
- **राजकिशोर गुप्ता, सुदाम कोरडे**, जळगाव
  भारतातील भूमी सुधारणा: एक दृष्टिक्षेप ........ १११
- **संभाजी शिंदे**, पुणे
  थेट परकीय गुंतवणुकीचा किरकोळ व्यापार क्षेत्रावर परिणाम. ११९
- **दिलीप जगताप**, नंदुरबार
  आदिवासी जागल्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती........१२४
- **पी. आर. पवार**, कुंडल
  जागतिक अर्थव्यवस्थेत विकासासाठी सहकार........ १३१
- **एस.एस. कावळे**, तळोधी (बाळापूर)
  बांबू-प्रक्रिया एक महाउद्योग........ १३५
- **निमसे शितल**, अहमदनगर
  दुग्ध व्यवसाय-एक शेतीवर आधारित उद्योग........ १४४
- **नितिन जाधव**, अमळनेर
  भारतीय शेती क्षेत्रात काळा पैसा: एक आव्हान........१५०
- **निरगुडे आय. ए.**, श्रीरामपूर
  वित्तीय समावेशन: प्रगती व आव्हाने........१५८
- **कुलकर्णी अविनाश**, पुणे
  जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम........ १६५
- **गवारे एन. बी.**, पाटोदा
  महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप व उपाय योजना........ १७६
- **खाचणे अशोक**, जळगाव
  ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना........ १८१
- **कडूकर पी. एम.**, मुंबई
  असंघटित क्षेत्र व कामगार कल्याण........ १८६
- **शेसभरे सुधीर**, पलूस
  महाराष्ट्रातील स्थूल देशांतर्गत उत्पादन:शेती क्षेत्राचा हिस्सा.. १९६
- **मुसमाडे मंजुषा**, पुणे
  ग्रंथ परीक्षण: फ्रँकलिन रुझवेल्ट ........ २००
- **सूर्यवंशी नागेश**, मुंबई
  महाराष्ट्रातील साखर उद्योग:समस्या व उपाय........ २०४
- **गोरे ज्ञानेश्वर**, देऊळगावराजा
  करार शेती: कृषि विकासाचे माध्यम........ २०८
- **ज. फा. पाटील**, कोल्हापूर
  अर्थ शब्दांची वाट पाहे: मजार्थशास्त्र ........ २१४

## मराठी अर्थशास्त्र परिषद
### कार्यकारी मंडळ २०१३-१४


❁ अध्यक्ष ❁

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

❁ कार्याध्यक्ष ❁

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

❁ कार्यवाह खजिनदार ❁

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

❁ प्रमुख संपादक-अर्थसंवाद ❁

अविनाश रामलाल निकम (शहादा)

❁ विश्वस्त ❁

मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्त जहागिरदार (अमरावती)

❁ सदस्य ❁

श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
बालाजी शिंदे (परभणी)
वामन सावंत (रत्नागिरी)
वनिता चौरे (चांदूरबाजार)



❁ अक्षर रचना: ❁
सुनील मरलीधर भांडारकर, शहादा.
❁ मुद्रणालय: ❁
सातपुडा ऑफसेट, जळगाव.



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
**(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)**
**मुद्रक-प्रकाशक:** अनिल बाबुराव सर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती दानाजवळ, शिवाजीनगर
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
**दूरध्वनी :** ०२१८४-२२४२९४,
**भ्रमणध्वनी:** ८८०५६९१४०६


❁ **वर्गणी:** ❁

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


❁ **अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:** ❁

१) भारतीस सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१२-१३ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

**टिप:** म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवाद...

## शेअर मार्केटचा 'बुल'...

शेअर मार्केट अन् 'बुल' च नातं तसं अतूट आहे. जगातील सर्वच शेअर मार्केट्सचा 'बुल' हा प्रतीक बनला आहे. पण प्रतीक म्हणून 'बुल'च का? याचा इतिहास आहे. १६ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत इंग्लंडमध्ये 'बुल्स' व अस्वल यांची लढाई लोकप्रिय होती. पण त्यामध्ये 'बुल' हा शक्ती, संघर्ष व लढवय्याचे प्रतीक होता. लढाईत हरलेल्या प्राण्यांमागे कुत्रे सोडण्याची प्रथा त्या काळात होती. कार्टुनिस्ट थॉमस नास्ट याने १९ व्या शतकात यू. एस. स्टॉक मार्केटमध्ये 'बुल' च्या प्रतिमा लोकप्रिय केल्या. खाली डोकं असलेला 'बुल' आघात करणारा असतो आणि हाच जास्त लोकप्रिय ठरला. येथे कलाकृतीचा उल्लेख मराठीत न करता 'बुल' असा केला आहे कारण संपूर्ण जगात ही कलाकृती 'बुल' या नावानंच प्रसिद्ध आहे.

ऑक्टोबर १९८७ मध्ये झालं असं की, न्यूयॉर्क स्टॉक मार्केट अवघ्या चोवीस तासात २२.६% इतकं घसरलं. तो दिवस होता सोमवार. त्याला 'ब्लॅक मंडे' असं म्हटलं जातं. त्यावेळी डी-मोडिका यांनी आशावाद म्हणून अन् अमेरिकन लोकांची इच्छाशक्ती प्रबळ आहे हे दर्शवण्यासाठी 'बुल' ची निर्मिती केली. हा 'बुल' पहिल्यांदा न्यूयॉर्क स्टॉक मार्केट समोर डिसेंबर १९८९ ला पहायला मिळाला. भविष्यकाळात मार्केटचा निर्देशांक उसळेल या आशावादाचा तो प्रतीक होय. वॉल स्ट्रीट बुल हा ३२०० कि.ग्रॅ. वजनाचा आर्टुरो डी मोडिका यांनी तयार केला आहे. या 'बुल'च वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या पाठीचा भाग उंच तर तोंडाकडचा भाग खाली झुकलेला आहे. जो दर्शवितो की, 'बुल' धावण्याच्या तयारीत आहे. हे सगळं काही शेअर मार्केटची भरभराट दर्शवण्यासाठी आहे. न्यूयॉर्क स्टॉक मार्केटमध्ये 'बुल' ची कलाकृती पर्यटकांचं प्रमुख केन्द्र बनलं आहे. वित्तीय बाजारातील आशावादी लोकांच्या बातम्यांसह वृत्तमाध्यमांमध्ये 'बुल' चं चित्र दाखवलं जातं. हा 'बुल' अमेरिकन लोकांच्या वित्तीय बाजाराच्या आशा कायम ठेवण्यास प्रवृत्त करतो. तसंच हा 'बुल' म्हणजे अमेरिकन लोकांच्या क्षमता व शक्तीचं प्रतीक आहे. डी-मोडिका यांनी 'बुल' ची कलाकृती निर्मिती आणि १६ फुट लांबीचा हा पुतळा बसवण्यासाठी ३,६०,००० डॉलर्स खर्च केले. न्यूयॉर्कमधील स्टॉक मार्केटच्या समोरील मोठ्या रस्त्याच्या मध्यभागी एका ख्रिसमस ट्री खाली लोअर मॅनहटनची साईट डी-मोडिका यांनी 'बुल' बसवण्यासाठी निवडली. हा 'बुल' बसवण्यासाठी त्यांनी अमेरिकन पोलिसांची रीतसर परवानगी घेतली नाही म्हणून पोलिसांनी हा पुतळा हटविण्याची कृती केली. तेव्हा जनसमुदायाने त्याविरुद्ध आवाज उठवला. तेव्हा न्यूयॉर्क सीटी पार्क व नूतनीकरण विभागाने सदरील पुतळा वॉल स्ट्रीटच्या जवळ बाऊलींग

ग्रीन पार्क मध्ये स्टॉक मार्केटच्या दोन्ही ब्लॉकमध्ये हलविण्याची जबाबदारी घेतली. सन २००४ ला डी-मौडिका याने सदरील 'बुल' कलाकृतीचे कॉपी राईट्स विक्री करण्याचं जाहीर केलं. परंतु ती 'बुल' न्यूयॉर्कमधील स्थापित जागेवरून न हलविण्याच्या अटीवर कॉपी राईट्स विक्री करण्याचं ठरवलं. सन २००६ मध्ये काहि मल्टीनॅशनल कंपन्यांनी सदरील कॉपी राईट्सची जाहिरात प्रसार आणि लाभासाठी वापर केल्याचा आरोप झाला. न्यूयॉर्कमध्ये या 'बुल' कलाकृतीची प्रचंड लोकप्रियता पाहता जगातील अनेक देशांनी त्याची प्रतिकृती शेअर मार्केटमध्ये स्थापित केली. आपल्या देशानंही हेच केलं आहे.

## यशस्वी अमरावती अधिवेशन....

मराठी अर्थशास्त्र परिषदेचं ३७ वं अधिवेशन अमरावती शहरातील भव्य अशा संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृहात यशस्वीरित्या पार पडलं. इच्छाशक्ती अन् नियोजनाच्या बळावर लहान गावातील महाविद्यालये महानगरात उत्कृष्टरित्या परिषदेचं अधिवेशन घेऊ शकतात, याचं हे उत्तम उदाहरण ठरलं आहे. पिपल्स् वेल्फेअर सोसायटी, अमरावती संचालित चांदूरबाजार येथील कै. नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालयानं आयोजीत केलेल्या या अधिवेशनास सदस्यांनी मोठ्या संख्येनं उपस्थिती दिली. पिपल्स् वेल्फेअर सोसायटीच्या सन्माननीय पदाधिकाऱ्यांनी प्राचार्य सुरेश देशमुख, स्थानिक कार्यवाह डॉ.वनिता चौरे यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचं उत्कृष्टरित्या नियोजन केलं. या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या टीमवर्कचं दर्शन झालं. या अधिवेशनात परिषदेच्या वतीनं माझी सहकारी अध्यक्ष डॉ.जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, कार्यवाह डॉ.अनिल सूर्यवंशी, विश्वस्त व सर्व कार्यकारी मंडळ सदस्य यांनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाने एकमतानं माझी अर्थसंवादच्या प्रमुख संपादकपदासाठी पुढील तीन वर्षांकरिता पुनर्नियुक्ती करून विश्वास दर्शवला त्याबद्दल आभार मानतो. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग सहा अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं, स्थानिक कार्यवाह डॉ.वनिता चौरे यांनी जाहिरात पाठविली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार! अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

**अविनाश रामलाल निकम**

(प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद')

# भारतातील भूमी सुधारणा : एक दृष्टिक्षेप

**राजकिशोर एच. गुप्ता, जळगाव,**
प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
संचालक, सामाजिकशास्त्रे प्रशाळा,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ९४२३१८५००२
E-mail: rajkishorhgupta@gmail.com

**सुदाम कडूजी कोरडे, जळगाव,**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
सामाजिकशास्त्रे प्रशाळा,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ८६५७२५६११८
E-mail: korde.sudam@gmail.com

ज्या देशात शेतीच्या विकासाचा प्रश्न पुढे येतो तेथे भूमी सुधारणा करण्याची गरज असते. कृषी क्षेत्रात संस्थात्मक सुधारणेत भूमी सुधारणा सर्वाधिक महत्त्वपूर्ण मानल्या जातात. भूमी सुधारणा म्हणजे जमिनीचा वापर आणि जमीन कसण्याचा जमिनीबाबत हक्क यासंबंधी सुधारणा होत.

जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण, मध्यस्थाचे उच्चाटन, कुळकायदे आणि कमाल जमीन धारण कायदे या सुधारणांना भूसुधारणा असे म्हणता येईल.

शेतीच्या उत्पादनतंत्रात बदल घडवून आणणाऱ्या तंत्रात्मक सुधारणा होत. यामध्ये सुधारित बियाणे, नवीन अवजारे, रासायनिक खते, सिंचन सोयीत वाढ इत्यादी उपायाचा समावेश होतो. या उपायातून उत्पादनात वाढ घडवून आणता येते. जर जमीन कसणारा हा जमीन मालक नसून केवळ श्रमीक असेल व धारण क्षेत्राचा आकार किफायतशीर नसेल तर तंत्रात्मक सुधारणांचा खरा परिणाम दिसून येणार नाही. शेती कसण्याच्या पद्धतीत किंवा रचनेत बदल घडवून

आणणाऱ्या संस्थात्मक सुधारणा असतात. या दोन प्रकारच्या सुधारणा एकमेकास पर्यायी नसून पूरक आहेत. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने जमिनीच्या मालकी हक्कांचे पुनर्वितरण, जमिनीच्या महत्तम वापराच्या दृष्टीने बदल, कुळांच्या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी केलेले उपाय या सर्वांचा समावेश भूमी सुधारणा या संकल्पनेत होतो.

## भूमी सुधारणेसाठी दोन मतप्रवाह:

भूमी सुधारणेसाठी समर्थनार्थ व विरोधी बाजूने मांडण्यात येणारी मते-

### भूमी सुधारणेचे समर्थन:

अलीकडील काळात जमीन सुधारणेच्या समर्थनार्थ विविध मते मांडली जातात. त्यामध्ये विकसनशील देशामध्ये जमीन सुधारणेमुळे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक फायद्यावर विशेष प्रकाश टाकला जातो. विकसनशील देशात जमीन सुधारणाद्वारे लागवडीखालील जमिनीचे आकारमान वाढविल्यास त्याद्वारे निश्चितच उत्पादन वाढून अन्नसुरक्षितता निर्माण होईल तसेच दारिद्र्य निर्मूलन होण्यास मदत होईल असा एक विचार मांडला जातो. जमीन सुधारणेमुळे पर्यावरण विषयक फायदे देखील मोठ्या प्रमाणात मिळतात. तसेच समता तत्त्वाचा प्रभावी वापर जमीन सुधारणेमुळे होतो असे सांगितले जाते.

### भूमी सुधारणेला विरोध:

मोठ्या प्रमाणात जमिनीचे पुनर्वितरण केल्यास ती अनुत्पादक ठरते. तसेच ज्यांची जमीन हस्तांतरीत केली आहे त्यांना जमिनीचे योग्य मोबदले दिले जात नाहीत असे टीकाकाराचे मत आहे. याबाबतचे उदाहरण असे सांगितले जाते की, झिम्बाब्वे हा देश मोठ्या प्रमाणातील भूमी सुधारणा केलेला असा देश आहे की ज्या ठिकाणी जमिनीच्या पुनर्वितरणाचा परिणाम म्हणून त्या देशाची आर्थिक स्थिती ढासळली. तसेच देशात अन्नसुरक्षितता निर्माण झाली. सरकारने जबरदस्तीने जमीन हस्तांतरण केल्यास जमीन मालक निकृष्ट दर्जाच्या जमिनी हस्तांतरित करण्यास परवानगी देतात. ज्यामुळे अशा जमिनीचे जरी पुनर्वितरण झाले तरी तिची उत्पादकता अत्यल्प असते.

अशाप्रकारे जमीन सुधारणेबाबत जरी परस्पर विरोधी मतप्रवाह असले तरीदेखील शेती क्रांतीतील भूमी सुधारणा हा एक मैलाचा दगडच ठरेल असे म्हणावे लागेल.

## भूमी सुधारणांची उद्दिष्ट्ये:

1) कृषी उत्पादनात वाढ करणे.
2) सामाजिक न्याय.
3) शोषणविरहीत रचना.
4) कसेल त्याची जमीन.
5) कृषी क्षेत्राचा विकास.
6) कृषी मधील रोजगार वाढविणे.
7) मध्यस्थांचे उच्चाटन करणे.
8) कृषीत संस्थात्मक व तंत्रात्मक सुधारणा घडवून आणणे.

## भारतातील भूधारणा पद्धती:

ज्या पद्धतीनुसार जमीनीची मालकी ठरते अशी कायद्याने ठरलेली किंवा परंपरेनी रूढ झालेली व्यवस्था म्हणजे भूधारणा पद्धती होय. भारतात पुरातन काळापासून भूधारणेच्या निरनिराळ्या पद्धती अस्तित्वात होत्या.

1) जमीनदारी पद्धत.
2) रयतवारी पद्धत.
3) महालवारी पद्धत.

१) जमीनदारी पद्धत:

ही पद्धत लॉर्ड कॉर्नवॉलीसने अठराव्या शतकाच्या शेवटी (बंगाल) अंमलात आणली.

भारतात काही भागात विशेषत: उत्तर व पूर्व भागात जमिनदारी पद्धत अस्तित्वात होती. जमीन महसूल वसूल करण्यासाठी जमीनदार हे मध्यस्थ नेमण्याची पद्धत वापरली जात होती.

जमिनदारी पद्धतीत काही काम न करता चैनीत राहणारा मोठा वर्ग निर्माण झाला. सरकारचा महसुल वाढू शकला नाही. शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण झाले. शेती मागासलेली राहिली. या दोषामुळे स्वातंत्र्य मिळाल्यावर निरनिराळ्या राज्य सरकारानी जमिनदारी पद्धत नष्ट केली.

जमीनदारीचे उच्चाटन केल्याने २ कोटी शेतकऱ्यांना जमिनीवर मालकी हक्क मिळाला. जमीनदारी रद्द करताना दिलेल्या भरपाईच्या मानाने सरकारच्या उत्पन्नात वाढ झाली नाही. ६७० कोटी रुपये भरपाई दिली तर राज्यसरकारचा महसूल ३० कोटी रुपयांनी वाढला.

उत्तर प्रदेश मधील एका अभ्यासानुसार जमीन मालकांपैकी ५८ टक्के जुने जमीनदार होते. ते स्वत: जमीन कसत नसतानाही जमीन कसत आहेत असे दाखविले जाते. ज्या भागात जमिनदारी पद्धत जास्त प्रचलित होती अशा उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल अशा राज्यात शेती सुधारणा कमी झालेली दिसते. तर पंजाबसारख्या जमिनदारी नसणाऱ्या राज्यात शेतीचे आधुनिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले.

२) महलवारी पद्धत:

या पद्धतीत संपूर्ण गावाचा संयुक्त मालकी हक्क अभिप्रेत असतो. महाल म्हणजे गाव जमिनीवर गावातील सर्वांची संयुक्त मालकी असते. सरकारने संपूर्ण गावाचा सारा साधारण ३० ते ४० वर्षांसाठी ठरवून दिलेला असतो. त्यानंतर त्यात बदल होऊ शकतो. निश्चित केलेला सारा जमा करण्याची जबाबदारी त्या गावातील लोकांची संयुक्त आणि वैयक्तिक असते. पंजाब, उत्तरप्रदेश या ठिकाणी ही पद्धत प्रचलित होती.

३) रयतवारी पद्धत:

या पद्धतीची सुरुवात मद्रासमध्ये १७९२ पासून झाली. पुढे ही पद्धत मध्य भारतात अनेक ठिकाणी अंमलात आली. या पद्धतीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे रयत हा जमिनीचा अधिकृत मालक असतो. त्याला सरकारकडून जी जमीन मिळते त्याबद्दल विशिष्ट रक्कम द्यावी लागते. सरकार आणि रयत यांच्यामध्ये कोणीही मध्यस्थ नसतो.

## भारतातील भूमी सुधारणा:

१) मध्यस्थांचे उच्चाटन:

या सुधारणामध्ये सर्वात महत्त्वाची सुधारणा म्हणजे जमीनदार, जहागिरदार यासारख्या मध्यस्थांचे उच्चाटन करणे हे होय. शेती हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय असल्याने केंद्रसरकारच्या निर्देशानुसार घटक राज्यांनी मध्यस्थांच्या उच्चाटनाचे कायदे पास केले. शेतीमधील मध्यस्थांचे उच्चाटन करताना त्यांना नुकसान भरपाई देण्याची पद्धत आपण स्वीकारली. अशाप्रकारे नुकसान भरपाई देण्याची एकूण रक्कम ६७० कोटी रुपये होती. म्हणजे जमीनदारीसारख्या अनुचित प्रथा नष्ट करण्यासाठी ही प्रत्यक्ष किंमत द्यावी लागली. एकंदरीत मध्यस्थ उच्चाटनाचा फायदा फक्त ३० लाख शेतकऱ्यांना मिळाला.

२) कुळांच्या हक्काबाबत सुधारणा:

भारतात शेतकऱ्याला शेतीची गरज

जास्त असल्याने जमीन मालक त्याचे शोषण करू शकतो. भारतातील सुधारणा पद्धतीत कुळांची अवस्था अतिशय वाईट होती. अशा परिस्थितीत बदल करण्यासाठी सरकारने निरनिराळे कायदे केले.

अ) कुळांना शाश्वती देणे:

जमीन मालक कुळाला आपल्या मर्जीप्रमाणे काढू शकणार नाही अशी तरतूद करणे याला शाश्वती असे म्हणतात. जमीनीत कायमस्वरूपी सुधारणा करण्यासाठी खर्च करावयाचा असेल तर पुरेसा काळ जमीन कुळाकडे राहणे आवश्यक आहे. सामान्यपणे एकाच जमिनीवर बारा वर्षे सलगपणे कुळ म्हणून राहणाऱ्या कुळाला कायद्याने संरक्षण मिळते. जमीन मालक कुळाला विशिष्ट कारणासाठीच काढू शकतो. पहिले कारण म्हणजे खंड न देणे, सतत तीन वर्षे खंड न देणाऱ्यास काढून जमीनीचा ताबा घेण्यासाठी जमीनमालक दावा करू शकतो. दुसरे कारण म्हणजे स्वत: कसण्यासाठी जमीन मालक जमिनीचा ताबा मागू शकतो. याशिवाय कुळाला संरक्षण मिळू नये यासाठी कुळाला एका जमिनीवरून दुसऱ्या जमिनीवर हलविण्यात आले आणि बारा वर्षाच्या आत काढून टाकण्यात आले.

ब) खंडाची कमाल मर्यादा ठरविणे:

बहुतेक राज्यात पिकाचा एकपंचमांश ते एक चतुर्थांश हिस्सा ही खंडाची मर्यादा ठरविली आहे. काही राज्यात एक षष्ठांश तर काही राज्यात एक तृतीयांश अशा मर्यादा आहेत. पूर्वी सामान्यपणे पिकांचा निम्मा वाटा खंड म्हणून घेतला जात असे.

क) कुळांना जमिनीचा मालकी हक्क देणे:

कुळांना सरकारने ठरविलेल्या किंमतीला १५ ते २० वार्षिक हप्त्यांत रक्कम भरून जमिनीची मालकी मिळू शकते. वर उल्लेख केल्याप्रमाणे कुळांकडून करार रद्द करून घेऊन जमीन मालकांनी याचा फायदा कुळांना मिळू दिला नाही.

भारतात पश्चिम बंगालमध्ये मात्र कुळ सुधारणा मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसते. याठिकाणी कुळ सुधारणा यशस्वी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्या ठिकाणची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती होय. प.बंगाल वगळता भारताच्या इतर राज्यांमध्ये या संदर्भातील राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याने उर्वरित राज्यांमध्ये कुळ सुधारणा अयशस्वी झाल्याचे चित्र आहे.

३) कमाल जमीन धारण मर्यादा:

कमाल जमीन धारणा कायदा म्हणजे, एक कुटूंब अधिकाधिक किती जमीन जवळ बाळगू शकतो यासाठी ठरविलेली जमीन होय. नवीन धोरणात कमाल जमीन धारण मर्यादा ठरविताना कुटूंब हा आधार घेण्यात आला आहे. पती, पत्नी आणि तीन मुले यांच्या कुटुंबासाठी ही मर्यादा आहे. जर कुटुंबातील व्यक्तीची संख्या जास्त असेल तर प्रत्येक जास्तीच्या सदस्यासाठी विशिष्ट जमीन ठेवता येईल. या मार्गदर्शक धोरणाला अनुसरून सर्व राज्यांनी सिलींगचे नवीन कायदे केले. त्यानुसार-

अ)ज्या जमिनीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध असून किमान दोन पिके घेतली जातात तेथे जमीनधारण मर्यादा १० ते १८ एकर अशी राहील.

ब)जेथे केवळ एक पीक घेण्याइतपत पाणी पुरवठ्याची सोय आहे तेथे कमाल मर्यादा २७ एकर राहील.

क)इतर जमिनीसाठी कमाल मर्यादा ५४ एकर निश्चित करण्यात आली.

कमाल जमीनधारणा कायद्यानुसार आतापर्यंत देशात ७४ लाख हेक्टर भूमी अतिरिक्त घोषीत केली गेली आहे. परंतु अनेक मोठ्या जमिनीच्या मालकांनी आपल्या जमिनी जवळच्या नातेवाईकाच्या नावे करून अप्रत्यक्षरित्या स्वत:च मालक राहणे पसंत केले.

४) जमिनीचे एकत्रीकरण:

तुकडेबंदी ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये शेतकऱ्याला त्याची इतरत्र विखुरलेल्या जमिनी एवढीच जमीन त्याच्या शेजारी दिली जाते. तुकडेबंदीचा उद्देश हा एका कुटुंबाची विखुरलेली शेती एकाच ठिकाणी मिळवून देणे हा होता, जेणेकरून आर्थिक शेतीमध्ये प्रगती होऊ शकते. तुकडेबंदी ही अनिवार्य तसेच ऐच्छिक या दोन्ही प्रकारची असू शकते. ऐच्छिक तुकडेबंदी ही गुजरात, मध्यप्रदेश तसेच पश्चिम बंगालमध्ये लागू आहे.

पंजाब, हरियाणामध्ये एकत्रीकरणाचे कार्य पूर्ण झाले असून उत्तरप्रदेशामध्ये ९० टक्के कार्य पूर्ण झाले आहे. ३१ मार्च २००६ पर्यंत देशात जवळपास १,६३३.४७ लाख एकर जमिनीचे एकत्रीकरण झाले.

५) सहकारी शेती :

शेतकऱ्याकडून सहकारी तत्त्वाच्या आधारावर संयुक्त रूपाने शेती करणे म्हणजे सहकारी शेती होय. भारतीय योजना आयोगानुसार, सहकारी कृषी ही एक अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये जमिनीचे एकत्रीकरण करून सामूहिक शेती केली जाते. भारतातील सर्व भूमी सुधारणांचे अंतिम ध्येय हे सहकारी ग्रामीण अर्थव्यवस्थेची स्थापना करणे हे आहे. सध्या देशात जवळपास ९,७०० सहकारी कृषी समित्या कार्यरत आहेत.

६) भूदान चळवळ:

हा भूमी सुधारणेचा ऐच्छिक कार्यक्रम आहे. भूदान म्हणजे स्वेच्छेने भूमीचे दान करणे होय. आचार्य विनोबा भावे यांनी अहिंसावादी सत्याग्रहाचा अवलंब करून १८ एप्रिल १९५१ मध्ये हैद्राबाद पासून ३४ कि.मी.दूर असणाऱ्या तेलंगाना जिल्ह्यातील पोचमपल्ली गावामधून भूदान चळवळीची सुरुवात केली.

विनोबा भावे वेळोवेळी आपल्या भाषणातून भूदान चळवळीवर प्रकाश टाकीत असत. त्यांच्यामते भूदानामुळे आर्थिक विषमतेतून होणारी हिंसक क्रांती टाळता येऊ शकते. या हिंसेतून वाचण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे अहिंसक मार्गाने भूदान चळवळ सरू करणे होय. थोडक्यात या चळवळीचे खालील फायदे आहेत.

१. भूदानामुळे संपत्तीच्या इतर साधनांचे समान स्वरूपात वितरण होते.
२. भूदानामुळे कृषियोग्य पडीत जमिनीचा अधिकाधिक उपयोग करता येतो.
३. भूदानामुळे मध्यस्थाचे उच्चाटन होण्यास मदत होते.
४. भूदान चळवळीमुळे भूमिहीनांना शेतीची मालकी मिळेल.
५. भूदान चळवळीच्या सहकार्याने इतर भूमी सुधारणा कार्यक्रमांना सहज चालविता येते.

आचार्य विनोबा भावेंनी एकूण ५ कोटी एकर जमीन एकत्र करण्याचे लक्ष ठेवले होते. परंतु मार्च २००३ पर्यंत ३९ लाख एकर जमीन प्राप्त झाली. विनोबा भावेच्या मृत्युनंतर ही चळवळ बंद पडण्यासारखी झाली आहे.

७) जमीन मालकीचे रेकॉर्ड:

भूमी सुधारणेसाठी जमिनीचे रेकॉर्ड अद्ययावत असणे अतिशय आवश्यक आहे. संपूर्ण देशामध्ये जमिनीची मालकी, कुळाचे अधिकार, पीक उत्पादनातील वाटा इत्यादी संबंधी व्यवस्थित रेकॉर्ड ठेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारने जमिनीसंबंधी रेकॉर्ड तयार करण्याची एक योजना तयार केली आहे. जमीन मालकीचे रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र इत्यादी राज्याच्या जमिनीचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवण्यात आले.

८) सरकारी बंजर जमिनीचे वितरण:

सरकारी पडीत जमिनीचे वितरण हे भूमी सुधारणेसंबंधी कार्यक्रमाचाच एक भाग आहे. भूमिहीन, गोरगरिबांमध्ये या पडीत जमिनीचे वितरण व्हावे हे सरकारचे धोरण आहे. मार्च २००३ पर्यंत १४८ लाख एकर सरकारी बंजर जमिनीचे वितरण ग्रामीण भूमिहीन व गरिबांमध्ये केले गेले.

## भूमी सुधारणा कार्यक्रमाचे मूल्यमापन:

सामाजिक न्याय व कृषी विकासाच्या दृष्टीने गेल्या ६० वर्षात भूमी सुधारणा कार्यक्रम काही सीमेपर्यंत आपले उद्देश सफल करू शकला. जमीनदारी निर्मूलनामुळे सरकार व शेतकरी यांच्यात साधा व सरळ संबंध निर्माण झाला.

कुळ कायद्याने शेतकरी शेती करण्यास प्रेरित झाला. कमाल जमीन धारणा कायद्याने मोठमोठ्या अतिरिक्त जमीन भूमिहीन किंवा लहान लहान शेतकऱ्यात वाटप केली. जमिनीच्या एकत्रीकरणाने लहान प्रमाणात शेती कुशल व उत्पादक होऊ लागली.

वरील उपायांवरून कृषी विकास व सामाजिक न्याय अनुरूप जरी असेल परंतु भूमी सुधारण्याच्या संबंधात झालेली प्रगती संथ व असंतोषजनक आहे.

ग्रामीण क्षेत्रात आताही असमानता आहे. त्याचबरोबर भूमी लहान-लहान तुकड्यात विखुरलेली आहे. भूमी सुधारणा धीमी व असंतोषजनक प्रगतीसाठी कारणीभूत आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे-

१) सदोष संकल्पना:

अतिरिक्त भूमी ज्या शेतकऱ्यांना दिली जाईल तो स्वत: शेतकरी ती शेती कसेलच हे सांगता येत नाही. शेतकऱ्याला दिलेली जमीन त्याने स्वत: कसलीच पाहिजे असा कायदा नाही.

२) सदोष कार्यवाही:

कमाल जमीन धारणा कायदा धोरणाची घोषणा करणे आणि त्याला लागू कारणे यामधील जो वेळ मिळेल त्याचा फायदा मोठ्या शेतकऱ्यांनी घेऊन जमीन दुसऱ्याच्या नावावर केली.

३) सरकारची उदासीनता:

ग्रामीण भागात पूर्वीचे जमीनदार मोठे जमीनमालक असे प्रभावी वर्ग असल्याने राज्य सरकार त्याच्या हिताला बाधा येऊ देत नाही.

४) भूमी सुधारणेच्या विविध अंगात समन्वयाचा अभाव:

भूमी सुधारणेचे अनेक कार्यक्रम आहेत. उदा. एकत्रीकरण, कमाल जमीन धारणा, सहकारी शेती इत्यादी कार्यक्रमात परस्पर समन्वयाची आवश्यकता जास्त असते परंतु भूमी सुधारणेच्या अलग अलग कार्यक्रमाला अलग अलग चरणात लागू केल्याने चांगली सफलता मिळू शकली नाही.

५) भूमी संबंधी अभिलेख अपूर्ण असणे:

भूमी संबंधी अभिलेख आताही अपूर्ण आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मालकी मिळण्यात अडचणी येतात. भूमिहीन शेतकऱ्यात वाटप झालेल्या जमिनीत मालकी हक्का विषयी अनिश्चितता तयार झाली.

६) ग्रामीण भागातील सामाजिक रचना:

ग्रामीण भागात परंपरेने मोठे जमीन मालक, सावकार, व्यापारी अशा वर्गांना उच्च सामाजिक स्थान आणि इतर वर्गांना निम्न किंवा कमी दर्जाचे सामाजिक स्थान मिळाले आहे.

७) कृषी सहकारी समित्यावर जमीनदाराचे वर्चस्व:

अधिकाधिक कृषी सहकारी समित्या केवळ कागदावरच आहेत. डॉ.राजच्या मते, 'सामान्यत: सहकारी समित्या सधन व्यक्तींच्या हातात आहेत.'

८) भूमी सुधारणा कार्यक्रमात भिन्नता:

भूमी सुधारणा कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर एकाच वेळी लागू होऊ शकला नाही. भूमी सुधारणेत वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे नियम बनविल्याने संपूर्ण देशात एकरूपता दिसून आली नाही.

९) खंडाचे अधिक दर:

खंडाचे अधिक दर लावल्याने शेतकऱ्यांना अधिक उत्पादन वाढीसाठी प्रेरणा राहिली नाही.

१०) राजकीय कारण:

एकंदरीत भूमी सुधारणाची प्रगती असमाधानकारक राहण्यासाठी राजकीय कारणही कारणीभूत आहे. देशाची प्रशासन संरचनाही कार्य करण्यास गंभीर नाही. राजकीय इच्छाशक्ती व साहस नसेल तर योग्य कायद्याची अंमलबजावणी होणार नाही.

## भूमी सुधारणा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना:

भूमी सुधारणा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पुढील सूचना उपयोगी आहेत.

१) योग्य दराने कृषी पतपुरवठा:

भूमी सुधारणा कार्यक्रमाद्वारे लहान-लहान शेतकऱ्यांना भूमी प्राप्त झाली. त्या भूमीच्या विकासासाठी आवश्यक कृषी साधने व योग्य दरात कृषीला पतपुरवठ्याची सुविधा केली जावी.

२) लहान शेतकऱ्यांना सहकाराच्या तत्त्वावर प्रोत्साहित करावे:

लहान-लहान शेतकऱ्यांना सहकारांच्या तत्त्वावर प्रोत्साहीत केले जावे.

३) लाभार्थी शेतकऱ्यांची समिती बनवावी :

शेतकरी आणि भूमिहीन शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मदत करु शकतात. लाभार्थी शेतकऱ्याची गाव व गटस्तरावर समिती बनवावी तसेच भूमी सुधारणा कार्यक्रम संबंधात लागू करावी.

४) लाभार्थ्यांना सुशिक्षित करण्यासाठी व्यापक कार्यक्रम चालवावा:

भूमी सुधारणा कार्यक्रमाच्या सफलतेसाठी भूमी सुधारणा कायद्यासंबंधी लाभार्थ्यांना सुशिक्षित करून व्यापक कार्यक्रम चालवावा. या संबंध समाजसेवी संघटना महत्त्वाची भूमिका निभाऊ शकतात. संबंधित कायद्याचा प्रादेशिक भाषेत अनुवाद करून प्रसार माध्यमाद्वारे प्रचार केला पाहिजे.

५) माहिती अचूक व अद्ययावत असावी:

भूमीसंबंधी माहिती अचूक व अद्ययावत

असावी व वेळोवेळी त्यामध्ये संशोधन होणे आवश्यक आहे.

६) सरळ भूमी सुधारणा कायदा करावा:

सरळ भूमी सुधारणा कायदा करावा. त्यामुळे कायद्याचा आधार घेऊन काम करता येईल.

७) सध्याच्या कुळकायद्यातील उणिवा दूर केल्या पाहिजेत:

सध्याच्या कुळकायद्यातील उणिवा दूर करण्यासाठी उपाय सुचविले पाहिजेत. जेणेकरून कुळांना पूर्ण सुरक्षा मिळेल. तसेच एका मर्यादेनंतर कुळांना मालकी हक्क मिळाला पाहिजे.

८) कुशल प्रशासकीय व्यवस्था:

प्रशासकीय व्यवस्था भूमी सुधारणेच्या त्वरित व कुशल कामासाठी योग्य ती कार्यवाही करू शकली नाही हे सिद्ध झाले आहे. भूमी सुधारण्यासाठी गाव, तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर कार्य करणारी कुशल प्रशासन व्यवस्था निर्माण केली जावी.

**समारोप:** भारतात कृषी उत्पादकता वाढीसाठी व गरीब शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी हे आवश्यक आहे की, भूमी सुधारणा कार्यक्रम कुशलतापूर्वत लागू केला पाहिजे.

## संदर्भ सूची:


1) htpp://www.google.co.in land reform in India.
2) htpp://www.google.co. in land reform in evaluation.
3) htpp://www.google.co.in Evaluation land & agrarian reform.
4) htpp://www.google.co.in evaluation land reform
5) htpp://India.gov..in//land reform
6) www.land reform in India-wikipedia.
7) land Reform. ladesa. org
8) West Bengale Land reforms
9) 7th five year plan (vol-2) The planning commission India 2.65, Retrieved 02 Aug. 2013.
10) Shaban R.A. (1987) *Testing betn Alternative models of shareropping Jowinal of Political Economy,* vol.95, pp.893-920.

११) रुद्र दत्त आणि के.पी.एम. सुन्दरम, *'भारतीय अर्थव्यवस्था'*, एस.चन्द एण्ड कंपनी लि., नई दिल्ली, २००९.

१२) डॉ.जी.एन. झामरे, *'भारतीय अर्थशास्त्र'*, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

१३) डॉ.देसाई, डॉ.भालेराव, *'भारतीय अर्थव्यवस्था'*, निराली प्रकाशन, पुणे.

१४) डॉ.जे.पी.मिश्रा, *'अर्थशास्त्र'* साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा.

१५) डॉ.विजय कविमंडन, *'कृषी अर्थशास्त्र'*, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

१६) डॉ.एस.आर. टकले, डॉ.टी.व्ही.पोवळे, *'कृषी अर्थशास्त्र'*, नवी दिल्ली.

१७) दैनिक लोकसत्ता.

१८) *'अर्थसंवाद'*, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, ऑक्टोबर-डिसेंबर २०११/खंड ३५, अंक ३.

१९) *योजना*, मासिक नोव्हेंबर २०१३.

# थेट परकीय गुंतवणुकीचा किरकोळ व्यापार क्षेत्रावर परिणाम

**संभाजी गोपाळा शिंदे, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी.
भ्रमणध्वनी : ९८८१०३७८८९
ई-मेल : shindesambhajig@gmail.com

आधुनिक काळात जगातील सर्वच देशांना आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धीचा दर उंचावण्यासाठी परकीय गुंतवणुकीची आवश्यकता भासत आहे. १९९१ मध्ये काँग्रेस पक्ष सत्तेवर आला आणि पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी 'खाऊजा' धोरण स्विकारले. भारतात १९९१ पासून विदेशी गुंतवणुकीसाठी अर्थव्यवस्थेची दरवाजे उघडण्यात आली आहे.

भारतात काही मोजके उद्योग वगळता १० ते १००% पर्यंत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक करण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्याद्वारे अर्थव्यवस्थेला बळकटी मिळवून दिली. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर २००७-०८ मध्ये ९.३% पर्यंत वाढला परंतु त्यानंतर तो प्रतिवर्षी घसरत गेला. २०११-१२ मध्ये तो ६.५% झाला. आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची पत घसरु लागली. आयात निर्यातीपेक्षा अधिक वाढून परकीय गंगाजळीचे प्रमाण कमी होऊ लागले. अर्थसंकल्पातील वाढती तूट, अंशदानांचा वाढता खर्च, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील वाढती तूट, अमेरिकेतील मंदीची वाढती तीव्रता, देशी औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकातील घसरण, वाढती बेकारी, जागतिक पातळीवर पंतप्रधानांवर होणारी टिका अशा पार्श्वभूमीवर अर्थमंत्री असलेले प्रणव मुखर्जी हे देशाचे राष्ट्रपती झाले. त्यामुळे अर्थमंत्रीपद चिंदबरम यांच्याकडे आले, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री चिंदबरम सरकारने सप्टेंबर २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक निर्णय घेतले. त्यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे देशाच्या प्राथमिक स्तरावरील बाजारात म्हणजेच किरकोळ व्यापारात ५१% परकीय थेट गुंतवणुकीचा निर्णय होय.

**किरकोळ व्यापार क्षेत्रातील 'एफडीआय' चा निर्णय :**

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या औद्योगिक धोरण व संवर्धन विभागाने दिनांक २० सप्टेंबर २०१२ प्रेस नोट नं. ५ नुसार सरकारने Multi Brand Retail मध्ये ५१% पर्यंत विदेशी गुंतवणुकीस परवानगी पुढील अटी व शर्तीवर जाहीर केली आहे.

१) Multi Brand Retail दुकानातून Un-Branded शेतीउत्पादन, फिशरी, पोल्ट्री, मटन यांची विक्री करता येईल.

२) Multi Brand Retail मध्ये विदेशी गुंतवणुकदाराने किमान १० कोटी डॉलर्स गुंतवणूक करावी.

३) एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी ५०% रक्कम Back End Infrastructure मध्ये म्हणजे कच्च्या मालावरील प्रक्रिया, उत्पादन, वितरण, वेस्टन, वाहतूक, साठवणूक इत्यादी पायाभूत सुविधांमध्ये गुंतविली पाहिजे.

४) विदेशी गुंतवणुकदारांना Multi Brand Retail ची दुकाने २०११ च्या जनगणनेनुसार १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरात किंवा शहराच्या १० कि.मी. परिसरात उघडता येतील.

५) Multi Brand Retail च्या दुकानात गुंतवणूक करताना तेथे वाहतुकीच्या व पार्किंगच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या पाहिजे.

६) विदेशी गुंतवणूक असलेल्या Multi Brand Retail कंपनीस E-commerce करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

७) केंद्र सरकारने हे धोरण जाहीर केले असले तरी Multi Brand Retail दुकाने सुरु करण्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य सरकारचा राहील.

८) Multi Brand Retail ने किमान ३०% किंमतीच्या वस्तू भारतातील लघु-कुटीर उद्योगांकडून खरेदी करुन ते विदेशी गुंतवणुकदाराने स्वत: प्रमाणित करायचे असून सनदी लेखापालाने त्याची खात्री करायची आहे.

९) शेती उत्पादने अग्रक्रमाने खरेदीचा अधिकार भारत सरकारचा राहील.

सरकारने प्रथम 'सिंगल ब्रँड' रिटेलला काही वर्षापूर्वी परवानगी दिली. त्यामध्ये ५१% परकीय गुंतवणुकीस अनुमती होती. आता सरकारने सिंगल ब्रँड रिटेलमध्ये १००% तर मल्टी ब्रँड रिटेलमध्ये ५१% परकीय भांडवल गुंतवणुकीस परवानगी दिली आहे. किरकोळ आणि घाऊक व्यापाराचा भारताच्या जीडीपी मधील एकूण वाटा २२% आहे. २००६-०७ मध्ये या क्षेत्राची उलाढाल ३२२ बिलियन डॉलर्सची होती; ती दरवर्षी १३% ने वाढून २०११-१२ मध्ये अंदाजे ५९० बिलियन डॉलर्स होणे अपेक्षित होते. 'भारतीय रिटेल क्षेत्र' हे जगातील ३० वाढत्या बाजारपेठांपैकी गुंतवणुकीच्या दृष्टीने हे दुसऱ्या क्रमांकाचे आकर्षक क्षेत्र आहे. साहजिकच देशी गुंतवणूकदारांचे व परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांचे या क्षेत्राला खुले करण्यासाठी प्रचंड प्रयत्न चालू होते. WTO, IMF, World Bank इ. आंतरराष्ट्रीय वित्त संस्था, परदेशी सरकारे या सर्वांमार्फत भारत सरकारवर दडपणे आणली जात होती. युरोपीयन आर्थिक संकट, त्यातून निर्माण होत असलेल्या मंदीच्या वातावरणाचा लाभ

उचलून घेण्यासाठी सरकारने 'प्रगतीसाठी सुधारणा गरजेच्या' असे सांगून रिटेल क्षेत्र थेट विदेशी गुंतवणूकीसाठी खुले केले. त्यामुळे 'स्पर्धा' वाढून सेवेचा दर्जा सुधारेल असे तथाकथित तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

थेट परकीय गुंतवणुकीचे भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रावर होणारे अनुकूल आणि प्रतिकूल परिणामांचे विश्लेषण पुढील भागात केले आहे.

**रिटेल क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूकीचे अनुकूल परिणाम:**

१) पायाभूत सुविधातील गुंतवणूक: भारत सरकारला पायाभूत सुविधांमध्ये अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. परंतु त्यासाठी सरकारकडे पुरेसा वित्तीय निधी उपलब्ध आहे. रिटेल क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीपैकी ५०% गुंतवणूक बॅक एण्ड इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवण्याची अट असल्यामुळे आपोआप पायाभूत सुविधांचा विकास होईल.

२) सरकारच्या महसुलात वाढ : विदेशी भांडवल गुंतवणुकीमुळे किरकोळ व्यापार संघटित होऊन मर्यादित कंपन्यांच्या देशभर शाखा सुरु होतील. या मर्यादित कंपन्यांचे कर निर्धारण व कर वसुलीचे काम कमी खर्चात, कमीत कमी वेळात आणि आणि अधिक कार्यक्षमतेने होऊन सरकारच्या महसुलात वाढ होईल.

३) प्रगत तंत्रज्ञान आणि कौशल्याचा लाभ : रिटेल क्षेत्रातील विदेशी भांडवल गुंतवणुकीमुळे, मालाचे उत्पादन, प्रक्रिया, ब्रँडिंग, पॅकिंग, साठवणूक इत्यादीत आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य भारतात येईल. त्याचा फायदा शेतकरी, लघु-कुटीर उद्योजकांना होईल परिणामतः वस्तूंच्या दर्जात व किंमतीत सुधारणा होईल.

४) रोजगारात वाढ : रिटेल क्षेत्रात 'एफडीआय' ला मान्यता दिल्याने भावी काळात निश्चितच रोजगाराच्या संधी वाढणार आहेत. रोजगाराच्या संधी तत्काळ वाढणार नाहीत, पडद्यामागील म्हणजेच उत्पादन, प्रक्रिया, माल हाताळणी वितरण या क्षेत्रात रोजगार संधी वाढतील. रिटेल स्टोअर्स उघडणे, त्यांची देखभाल करणे, रस्त्यांची निर्मिती, बांधकाम, शीतगृहांची निर्मिती, सॉफ्टवेअर इंडस्ट्री आणि किरकोळ व्यापारासाठी मदत करणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवा यात अनेक नवीन रोजगार संधी निर्माण होतील.

५) कृषी उत्पादनांच्या किंमती मर्यादित : भारतात बाजारातील अन्नधान्य व कृषी उत्पादनांच्या किंमती वाढत आहे. परंतु विदेशी थेट गुंतवणूक किरकोळ व्यापारी क्षेत्रात झाल्यानंतर शेतीपासून ते विक्री दुकानापर्यंत माल त्वरित व कमी खर्चात पोहचवण्याची यंत्रणा निर्माण होईल. परिणामी कृषी उत्पादनांच्या किंमती मर्यादित राहतील.

६) स्पर्धा वाढेल : जागतिक स्तरावर टेस्को, टारगेट, मेट्रो, वॉलमार्ट इत्यादीसारख्या ३०० पेक्षा जास्त किरकोळ व्यापार क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या आहेत. या कंपन्यांची कोणत्याही देशात मक्तेदारी नाही. किरकोळ विक्री क्षेत्रात विदेशी कंपन्या आल्याने स्पर्धेत वाढ होईल आणि किंमतीही नियंत्रणात राहतील. ग्राहकांना वस्तुंचे विविध पर्याय रास्त किंमतीला उपलब्ध होतील.

७) परकीय चलन साठ्यात वाढ : रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणूकीमुळे भारताच्या परकीय चलन साठ्यात लक्षणीय वाढ होऊन परकीय चलनाच्या गंगाजळीत वाढ होईल. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सुधारण्यास मदत होईल.

८)मालाचा दर्जा आणि सुरक्षितता : ग्राहकांना मिळणाऱ्या मालाचा दर्जा आणि सुरक्षिततेची जबाबदारी रिटेल कंपन्यांची असल्याने आपण विकणारे पदार्थ, अन्नधान्य आरोग्याच्या दृष्टीने चांगले व सुरक्षित असल्याची ते खात्री करून घेणार; अन्यथा व्यवसायावर अनिष्ट परिणाम होईल.

९)किरकोळ दुकानांचे आधुनिकीकरण : 'एफडीआय' मुळे किराणा मालाच्या दुकानदाराला गाशा गुंडाळावा लागणार नाही. अमेरिकेत आजही किरकोळ विक्रीची दुकाने आहेत. 'एफडीआय' मुळे किराणा मालाच्या दुकानाचे गचाळ स्वरुप बदलून त्यांना आधुनिकतेचे स्वरुप येईल. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी या दुकानदारांची मानसिकता बदलेल.

१०)ग्राहकांचा फायदा : किरकोळ व्यापार क्षेत्रातील विदेशी भांडवल गुंतवणुकीमुळे सर्वाधिक फायदा ग्राहकांचा होणार आहे. रिटेल कंपन्यांमध्ये आपआपसात स्पर्धा निर्माण होऊन ग्राहकांना कमी किंमतीत दर्जेदार वस्तू व सेवा उपलब्ध होतील.

**रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणुकीचे प्रतिकूल परिणाम :**

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेवर घाव: भारतातील रिटेल क्षेत्रात अन्नधान्य व भाजीपाल्याचा वाटा जवळपास ६३% आहे. कृषि व्यवसाय व छोटी दुकाने पाहता देशाच्या कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मोठा भाग या रिटेल क्षेत्रात आहे. त्यामुळे रिटेलमधील परकीय गुंतवणुकीचा प्रत्यक्ष परिणाम ग्रामीण भारताच्या अर्थव्यवस्थेवर व लोकजीवनावर होणारा आहे. बड्या गुंतवणूकदारांच्या दडपणाखाली सरकारचा रिटेल मधील थेट विदेशी गुंतवणुकीचा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेवर घाव घालणारा आहे.

२) रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणुकीचा चीनला फायदा : परकीय गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांनी ३०% माल लघु व मध्यम उद्योगातून विकत घेतला पाहिजे असा निर्बंध सरकारने घातला आहे. परंतु WTO च्या बंधनामुळे 'भारतीय' हा शब्द सरकारने त्यात घातलेला नाही त्यामुळे या कंपन्या जगभरातल्या कुठल्याही लघु उद्योजकांकडून ही खरेदी करू शकतात. सर्वात स्वस्त माल पुरविणाऱ्या चीनला याचा सर्वात जास्त लाभ मिळेल. भारतीय स्थानिक लघु-कुटिर व मध्यम उद्योगांना चीनच्या उत्पादनाशी स्पर्धा करणे कठीण जाईल. म्हणजेच भारतातील रिटेलमधील गुंतवणुकीचा फायदा चीनलाही मिळेल.

३) दुष्परिणामांची जबाबदारी राज्य सरकारांवर : रिटेल क्षेत्र खुले करताना भारत सरकारने 'अंतिम निर्णय राज्य सरकारनेच घ्यायचा आहे' असे कलम घातले; त्यामुळे अंतिमत: रिटेलच्या खुलेपणाचे जे दुष्परिणाम होतील त्याला राज्ये जबाबदार राहतील. निर्णय केंद्राचा पण अंतिम जबाबदारीतून नामानिराळे

राहण्याची सरकारची प्रवृत्ती योग्य नाही.

४) भांडवलाचे देशांतर : रिटेल क्षेत्रात थेट भांडवल गुंतवणूक करुन मिळणारा नफा विदेशी कंपन्या आपल्या मायदेशी पाठवतील त्याचा परिणाम आर्थिक अस्थैर्यात होईल. शिवाय भारतीय रुपयांचे डॉलरमधील मूल्य कमी होईल; त्यामुळे देशाची जागतिक पातळीवर पत घसरेल.

५) शेतमाल किंमतीची अनिश्चिता : भारतात शेतमाल किंमतीवर सरकारचे नियंत्रण असल्याने वेळप्रसंगी शेतकरी सरकारशी भांडण करुन हमीभाव मिळवितो. रिटेल क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांना परकीय कंपनी सुरुवातीला योग्य भाव देतील परंतु भविष्यात शेतमालाला किती किंमत देतील याची खात्री नाही.

६) छोट्या दुकानदारांची बेकारी : रिटेलक्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीमुळे प्रस्थापित छोटे किराणा दुकानदार, घाऊक व्यापारी वर्ग, हमाल असे ३० ते ४० लाख लोकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. या धोरणाद्वारे छोटे दुकानदार व्यवसायिकांची सरकार कोणतीही हमी देत नाही.

## सारांश :

भारत सरकारने किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीचा निर्णय घेऊन विदेशी गुंतवणुकीसाठी, पोषक वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला आहे. या निर्णयाद्वारे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांचा विकास होईल. भारतीय अर्थव्यवस्थेची सध्याची परिस्थिती पाहता सरकारने घेतलेला निर्णय योग्यच आहे. किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीचे अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांपेक्षा अनुकूल परिणाम अधिक आहेत.

## संदर्भ :


१) Govt. of India Press Note No. 4 & 5 (2012) series realized by Ministry of Commerce and Industry Dept. of Industrial Policy & Promotion.

२) Forgein Direct Investment - Wikipedia

३) www.fdi.com

४) Indian Economy, Pratiyogita Darpan (2012).

५) डॉ. विनायक गोविलकर, *रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणूक*, विकल्प वेध, जानेवारी २०१३.

६) गणेश पटारे, *'रिटेल क्षेत्रातील परकीय गुंतवणूक आणि भारतीय अर्थव्यवस्था एक विश्लेषण* - वाणिज्य विद्या', जानेवारी- मार्च २०१३.

७) दैनिक सकाळ, *सन्डे स्पेशल* - रविवार दि. २३ सप्टेंबर २०१२ पान नं. ९.

८) प्रा.डॉ. जे. एफ. पाटील, *'ऑल इज नॉट वेल'* सकाळ - सप्तरंग, रविवार २३ सप्टेंबर २०१२.

# आदिवासी जागल्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन

**दिलीप रामभाऊ जगताप, नंदुरबार,**
गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय,
भ्रमणध्वनी:९८२३६९२३६०.

भारतीय अर्थव्यवस्थेत जागल्यांचे योगदान मोलाचे आहे. परंतु या जागल्यांना मिळणारे तुटपुंजे उत्पन्न त्यांच्या जीवनावश्यक गरजाही भागवू शकत नाही. जागल्यांना दारिद्रय रेषेखालील हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. त्यांना गावकुसाबाहेर रहावे लागते. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ होते. जागल्यांच्या समस्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. जागल्यांकडे दुर्लक्ष करणे मानवतेच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजातील हजारो कुटुंबे सधन लोकांच्या शेती, कारखाने व घरांच्या बांधकामांवर जागल्याचे (रखवाली) काम करतांना आढळतात. या जागल्यांच्या कुटुंबांसमोर रोजगार, आरोग्य व शिक्षणाविषयक अशा अनेक आर्थिक व सामाजिक समस्या आहेत. तरी या समस्यांना जागले धीराने तोंड देत आपले काम इमाने - इतबारे पार पाडत आहेत. या आदिवासी जागल्यांचे अध्ययन केले असता त्यांना कोणीच वाली नाही असे दिसून येते. आदिवासींच्या उत्थानासाठी शासनामार्फत ३५० पेक्षा जास्त योजना आखल्या व राबविल्या जात आहेत. परंतु शासनाच्या अनेक योजना कागदावरच राहतात अथवा घोषणापर्यंतच मर्यादित राहतात. आदिवासी जागल्यांना शासनाच्या कोणत्याच योजनांचा लाभ मिळत नाही. जागल्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले जावे. जागल्याच्या समस्यांची जाणीव सर्वांना व्हावी म्हणून प्रस्तूत विषय अध्ययनासाठी निवडलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) आदिवासी कुटुंबाना जागल्याचे काम का करावे लागते? यामागची कारणे शोधणे.

२) जागल्यांची वैशिष्टे अभ्यासणे.

३) जागल्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती अभ्यासणे.

४) जागल्यांसाठी शासनाने केलेल्या कामगिरीचे परिणाम अभ्यासणे.

५) जागल्यांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

## अध्ययन पद्धती :

अध्ययनासाठी प्रामुख्याने प्राथमिक तंत्र अथवा सामग्रीवरच जास्त भर दिलेला आहे. यात मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची व निरीक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे दुय्यम सामग्रीत ग्रंथ, जर्नल्स मधिल लेख व विविध अहवालांचा व त्यातील माहितीचा वापर केलेला आहे.

संशोधन वस्तूनिष्ठ होण्यासाठी जागल्यांचे काम करणाऱ्या १५० कुटुंबाचे सर्व्हेक्षण केलेले आहे. नंदुरबार, नवापूर, शहादा, अक्कलकुवा व तळोदा या शहरांमध्ये सुरु असलेल्या घरांच्या / बांधकामाच्या ठिकाणी कारखाने तसेच गावकुसाबाहेर शेतांवर राहुन जागल्यांचे काम करीत असलेल्या कुटुंबांच्या मुलाखती घेऊन, त्यांच्याकडून प्रश्नावली अनुसूची भरुन घेऊन, निरीक्षण करुन मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

## जागल्या कोणास म्हणावे ?

"शेतमालकाच्या कृषीविषयक साहित्यावर, पिकांवर तसेच कारखान्यातील यंत्रे, साहित्य, तसेच बांधकामाच्या ठिकाणी रात्रंदिवस जागून राखण करणारा म्हणजे जागल्या होय."

"शेताशिवारात व उद्योगधंद्यात रखवालदारीचे काम करणाऱ्या आदिवासी बांधवांना जागल्या असे म्हटले जाते."

## जागल्याचे अर्थशास्त्र :

जागले त्यांना कामावर ठेवणाऱ्यांना मालक, कारभारी, पाटील, शेठ म्हणून मानाने संबोधतात. जागल्यांना एक प्रकारे शेतीवरील सालदाराचे काम करावे लागते. जागल्यांमुळे मालकांचा खुप फायदा होतो. कामाच्या ठिकाणी जागल्याचे संपूर्ण कुटूंब राबते. त्यामुळे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मजुर ठेवावे लागत नाहीत. ४ ते ५ मजुरांचे काम एकटा जागल्या करतो व त्यासोबत कुटुंबातील सदस्य म्हणजेच जागल्याची पत्नी व मुले सुद्धा काम करतात. मालकाच्या आर्थिक विकासात जागले हातभार लावतात. मालकाच्या आर्थिक फायद्याविषयी बोलावयाचे झाल्यास इतर सालदारांपेक्षा आदिवासी जागल्यांना कमी साल (वार्षिक मोबदला) दिले जाते. बिगर आदिवासी सालदारांना रु. २५,000/- पेक्षा जास्त साल द्यावे लागते. त्यामुळे मालकाचा भरपूर फायदा होतो. जागल्यांना सुद्धा फायदा होतो. त्यांची उपासमार टळते. हमीचे उत्पन्न व आगाऊ उत्पन्न मिळते, परंतु त्याचे शोषण होते.

## आदिवासी जागल्यांचे वयोगटा नुसार प्रमाण:

सारणी क्र.१ मध्ये सर्व्हेक्षित १५० निवेदक कुटुंबाचे वयोगटानुसार विश्लेषण केलेले आहे.

सारणी क्रमांक १ मध्ये २० वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या आदिवासी जागल्यांचे शेकडा प्रमाण ६% आहे. २१ ते ३० वयोगटात असणाऱ्या निवेदक जागल्यांचे शे.प्र.२३.६ आहे. ३१ ते ४० वयोगटातील जागल्या निवेदकांचे प्रमाण २० % आहे. ४१ ते ५० वयोगटातील निवेदक जागल्यांचे प्रमाण १४ % आहे. ५१ ते ६० वयोगटातील

सारणी क्रमांक १

जागल्यांचे वयोगटानुसार प्रमाण

| अ.क्र. | वयोगट | निवेदक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २० पेक्षा कमी | ९ | ६.० |
| २ | २१ ते ३० | ३५ | २३.६ |
| ३ | ३१ ते ४० | ३० | २०.० |
| ४ | ४१ ते ५० | २१ | १४.० |
| ५ | ५१ ते ६० | १६ | १०.७ |
| ६ | ६१ ते ७० | २५ | १६.७ |
| ७ | ७१ पेक्षा जास्त | १४ | ९.३ |
| | एकूण | १५० | १०० |

*स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन.*

जागल्यांचे प्रमाण १०.०७ % आहे. ६१ ते ७० वयोगटातील जागल्या निवेदकांचे प्रमाण १६.७% आहे. तर ७१ पेक्षा जास्त वय असलेल्या जागल्यांचे प्रमाण ९.३ % आहे. २१ ते ३० वयोगटातील जागल्यांचे काम करणाऱ्यांचे प्रमाण हे सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

**आदिवासी जागल्यांचे जमातीनुसार प्रमाण :**

सारणी क्र. २ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील जागल्यांचे काम करणाऱ्या निवेदकांचे प्रमाण दर्शवलेले आहे.

सारणी क्र. २ मध्ये जागल्याचे काम करणाऱ्या आदिवासी पावरा जमातीचे प्रमाण सर्वाधिक आहे. ते ५२ % आहे. त्याखालील भिल्ल जमातीच्या जागल्यांचे प्रमाण ३८.६७ % आहे. तर तडवी जमातीच्या जागल्यांचे प्रमाण ३.३३ % इतके आहे. जिल्ह्यात ३२ आदिवासी जमाती वास्तव्य करतात. परंतु भिल्ल व पावरा

सारणी क्रमांक २

जागल्यांचे जमातीनुसार प्रमाण

| अ.क्र. | जमात | निवेदक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पावरा | ७८ | ५२.० |
| २ | भिल्ल | ५८ | ३८.६७ |
| ३ | तडवी | ९ | ६.० |
| ४ | इतर | ५ | ३.३३ |
| | एकूण | १५० | १०० |

*स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन*

जमातीच्या लोकांचे प्रमाण जिल्ह्यात अधिक आहे.

**आदिवासी जागल्यांच्या शिक्षणाचे प्रमाण :**

सारणी क्रमांक ३ मध्ये जागल्यांचे काम करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या शिक्षणाचे प्रमाण दर्शवलेले आहे.

सारणी क्रं.३ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील जागल्यांचे निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. निरक्षर जागल्याचे प्रमाण ६५.४ % आहे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या निवेदक जागल्यांचे प्रमाण १७.३ % आहे.माध्यमिक शिक्षण घेतलेल्या निवेदक जागल्यांचे प्रमाण ७.३ % आहे.

सारणी क्रमांक ३

जागल्यांच्या शिक्षणाचे प्रमाण

| अ.क्र. | शिक्षण | निवेदक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ९८ | ६५.४ |
| २ | प्राथमिक | २६ | १७.३ |
| ३ | माध्यमिक | १४ | ९.३ |
| ४ | उच्च माध्यमिक | ९ | ६.० |
| ५ | उच्च पदवी | ३ | २.० |
| ६ | पदव्युत्तर | ० | ० |
| | एकूण | १५० | १०० |

*स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन*

माध्यमिक शिक्षण घेतलेल्या जागल्यांचे प्रमाण ९.३ % आहे. १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण ६ % आहे तर पदवीपर्यंत शिक्षण झालेल्याचे प्रमाण २ % आहे. तर पदव्यूतर शिक्षण घेतलेल्याचे प्रमाण शून्य आहे.

### आदिवासी जागल्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण :

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जागल्यांच्या १४ वर्षापर्यतंच्या मुलांच्या शिक्षणाची स्थिती सारणी क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली आहे.

सारणी क्रमांक ४

१४ वर्षापर्यंतच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण

| अ.क्र. | जमात | मुलांची एकूण संख्या | शिक्षण मिळालेले | शिक्षण न मिळणारे |
|---|---|---|---|---|
| १ | पावरा | ३१२ | ७३ (२३.४) | २३९ (७६.६) |
| २ | भिल्ल | २३२ | २६ (११.२) | २०६ (८८.८) |
| ३ | तडवी | ५४ | १२ (२२.२) | ४२ (७७.८) |
| ४ | इतर | १५ | १२ (८०.०) | ०३ (२०.०) |
| | एकूण | ६१३ | १२३ (२०.१) | ४९० (७९.९) |

स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन

सारणी क्र.४ मध्ये १५० सर्वेक्षित कुटुंबांना एकूण ६१३ मुले आढळून आली. त्यापैकी १२३ मुलांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध झालेली दिसते हे प्रमाण २०% आहे. तर ४९० मुलांना शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध होत नाही.

पावरा जमातीच्या ७६.६% मुलांना शिक्षण मिळालेले नाही. तर भिल्ल जमातीच्या सर्वाधिक म्हणजे ८८.८% मुलांना शिक्षण मिळत नाही. तडवी जमातीच्या ७७.८% मुलांना तर इतर जमातीच्या २०% पाल्यांना शिक्षण उपलब्ध होत नाही त्यांना शिक्षणापासून वंचीत रहावे लागते.

### आदिवासी जागल्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषण :

सारणी क्र.५ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जागल्यांचे उत्पन्न गटानुसार वर्गिकरण दर्शवलेले आहे.

सारणी क्रमांक ५

जागल्यांना मिळणारे उत्पन्न

| अ.क्र. | उत्पन्न गट | निवेदकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५००० ते १०००० | १८ | १२.० |
| २ | १०००० ते २०००० | ८२ | ५४.७ |
| ३ | २०००० पेक्षा जास्त | ५० | ३३.३ |
| | एकूण | १५० | १०० |

स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन

सारणी क्र. ५ मध्ये १0,000/-रु. वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या जागल्याचे प्रमाण १२% आहे. रु.१0,000 ते २0,000 दरम्यान वार्षिक उत्पन्न मिळविणाऱ्या जागल्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ५४.७% आहे तर सर्वाधिक रु.२0,000 पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न मिळविणाऱ्या जागल्यांचे प्रमाण ३३.३% आहे.म्हणजेच ६७% जागल्यांना रु २0,000 पेक्षा कमी उत्पन्न मिळते.

### जागल्यांच्या खर्चाचे विश्लेषण:

नंदुरबार जिल्ह्यातील जागल्यांना कराव्या लागणाऱ्या खर्चाचे विश्लेषण सारणी क्रं.६ मध्ये केलेले आहे.

सारणी क्र ६ वरुन स्पष्ट होते की जागल्या कुटुबांना दरवर्षी सरासरी २६९१0 रुपये खर्च करावा लागतो. एकूण खर्चापैकी ५४.५५% खर्च अन्नावर होतो. व्यसनांवर १८% तर सण उत्सव इ. सारख्या कार्यांवर २१% खर्च होतो. हा खर्च पूर्ण करण्यासाठी जागल्यांना कर्ज घ्यावे लागते.

सारणी क्रमांक ६

जागल्यांच्या खर्चाचे प्रमाण

| अ.क्र. | घटक | सरासरी उपभोग खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अन्न | १४६८० | ५४.५५ |
| २ | वस्त्र | ३२२.९२ | १.२ |
| ३ | घरदुरुस्ती | ० | ० |
| ४ | आरोग्य | २१५.२८ | ००.८ |
| ५ | शिक्षण | १६१.४६ | ००.६ |
| ६ | भगत | ४०३.६५ | १.५ |
| ७ | दारु, तंबाकू, गुटखा इ. | ४८४४ | १८.० |
| ८ | प्रवास | ० | ० |
| ९ | लाकुड, रॉकेल, वीज इ. | ४३८.० | १.६३ |
| १० | सण, जत्रा, जन्म, मृत्यु, लग्न इ. | ५६५१ | २१.० |
| ११ | इतर (भांडी चपला, करमणूक इ.) | १९३.६९ | ०.७ |
| | सरासरी उपभोग खर्च | २६९१० | १०० |

*स्त्रोत : प्रत्यक्ष पाहणीवरुन*

**आदिवासी जागल्यांना जागल्याचे काम करावे लागण्याची कारणे:**

**१) दारिद्र्य / गरीबी :**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बांधव अत्यंत गरीब आहेत.९०% पेक्षा जास्त आदिवासी बांधव दारिद्र्यरेषेखालील हलाखींचे जीवन जगण्यास अभिशापीत आहेत.

**२) उत्पन्नाचे साधन नाही :**

जिल्ह्यातील आदिवासी बांधवांकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही अनेक कुटुंबे भूमिहीन आहेत ज्यांच्याकडे थोडीफार जमीन आहे. ती नापीक किंवा पडीत आहे.तसेच या जमिनीला सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत.

**३) उद्योगधंद्यांचा अभाव :**

नंदुरबार जिल्ह्यात कोणत्याही प्रकाराचे उद्योगधंदे स्थापन झालेले नाहीत त्यामुळे रोजगार नाही.

**४) शासकीय योजनांची सदोष अंमलबजावणी :**

शासनामार्फत नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासीसाठी त्यांच्या उत्थानासाठी ३५० पेक्षा जास्त योजना राबविल्या जातात. परंतु या योजनांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो.

उदा. रोजगार हमी योजनांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो. ह्या योजनांचा लाभ गरजू लाभार्थीपर्यंत पोहोचतच नाही.

**५) शिक्षणाचा अभाव :**

बहुतांशी जागले अशिक्षित असतात. परिणामी वर्षानुवर्षे शेताची, बांधकामाची राखण करीत राहिल्यामुळे त्यांची मुलेही शिक्षणाच्या अभावामुळे अशिक्षित राहतात आणि तरुण झाल्यावर जागल्याचेच काम स्वीकारुन आपल्या कुटुंबाची गुजराण करतात.

**६) योजनांचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करता येत नाही :**

जागल्यांना एकाच मालकाकडे कायम काम

उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना वेळोवेळी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे त्यांना दारिद्र्यरेषेखालील दाखला, रेशनकार्ड इतर कामांसाठी लागणारे दाखले इ. कागदपत्र जमवता येत नाहीत. कागदपत्रांसाठीसुद्धा लाच द्यावी लागते.

७) अंधश्रद्धा रुढी - परंपरा :

आदिवासी जागले आपल्या रुढी - परंपरा/ अंधश्रद्धा बाळगून राहतात. त्यामुळे त्यांचा जास्तीत जास्त खर्च या कार्यावर होतो. प्रसंगी त्यांना कर्ज काढावे लागते. हे कर्ज फेडण्यासाठी त्यांना वेठबिगारी करावी लागते.

निष्कर्ष :

१) जागल्याचे काम करावे लागणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये पावरा व भिल्ल जमातीचे प्रमाण सर्वाधिक आहे. यात पावरा जमातीचे ५२ % तर भिल्ल जमातीचे प्रमाण ३९ % आहे.

२) जागल्याचे वयोगटानुसार विभागणीनुसार २१ ते ३० वयोगटातील जागल्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २४ % आहे. ६० पेक्षा जास्त वय असणाऱ्या जागल्यांचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. त्यांचे प्रमाण ५४ % पेक्षा जास्त आहे. याचा अर्थ ज्या काळात निवृत्त होऊन आराम करावयाचा असतो. त्या काळात वृद्ध जागल्यांना कष्टाचे काम करीत रहावे लागते. त्यांच्या हाल - अपेष्टा कमी होत नाहीत.

३) कामाच्या ठिकाणी जागल्यांच्या स्त्रियांना व मुलांनाही राबावे लागते. जागल्यांच्या कुटुंबातील ५ ते ६ व्यक्ती कामाच्या ठिकाणी राबत असल्याचे आढळून आले.

४) जागल्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ होत असल्याचे आढळून येते. जवळपास ६५ % जागले निरक्षर/अशिक्षित आढळून आले. तर ३५ % जागले शिक्षित असून त्यांना रोजगाराचे इतर साधन उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना जागल्याचे काम स्विकारावे लागले. सर्व शिक्षा अभियानतंर्गत शिक्षणाचा हक्क असूनही जागल्यांच्या ८० % मुलांना शिक्षणापासून वंचीत रहावे लागत आहे. शासनाच्या शिक्षण विषयक योजनांचा त्यांना लाभ मिळत नाही.

५) कामाच्या ठिकाणी जागल्यांना तुटपुंजे उत्पन्न मिळते त्यात ते आपल्या जीवनावश्यक गरजाही भागवू शकत नाहीत.१२% जागल्यांना १० ते १२००० इतकेच उत्पन्न मिळते.म्हणजेच जागल्यांचे आर्थिक शोषण केले जाते.

६) जागल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यसनाधिता आढळून येते. एकूण खर्चापैकी १८% खर्च व्यसनांवर केला जातो, व्यसनांमुळे त्यांच्या आरोग्यावर व कार्यक्षमतेवर परिणाम होतो त्यांची मुले ही अनुकरण करुन व्यसन करतात.

७) जागल्यांच्या शिक्षणाच्या अभावामुळे लहान कुटुंबाचे महत्व त्यांना कळालेले नाही त्यांना सरासरी ३ ते ४ मुले आढळून आली. ५ ते६ मुले असणाऱ्या जागल्यांचे प्रमाणही अधिक आहे.जास्त मुलांमुळे

त्यांच्या अपेष्टांमध्ये भर पडते.

उपाययोजना /शिफारशी :

१) जागल्यांसाठी तांत्रीक प्रशिक्षण संस्था जिल्ह्यात स्थापन करुन त्यांना तांत्रीक प्रशिक्षण द्यावे जेणेकरुन ते स्वयंरोजगार स्थापन करु शकतील.

२) रोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

३) जागल्यांच्या ४ ते १४ वर्षे वयाच्या मुलांसाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्या. त्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

४) वृद्ध झालेल्या जागल्यांना शासनाने निवृत्ती वेतन सुरु करावे अथवा त्यांना संजय गांधी निराधार योजनेचा फायदा मिळवून द्यावा.

५) शासकीय योजनेतून घरकूल पुरवावे.

६) शासनाने किमान वेतन कायदा राबवून अंमलात आणावा. त्यांचे आर्थिक शोषण होणार नाही याची काळजी घ्यावी.

७) वनजमिनी शेती कसण्यासाठी द्याव्यात.

८) जागल्यांमध्ये व्यसनाधिनता व अंधश्रद्धा दूर होण्यासाठी जनजागृती करावी.

९) जिल्ह्यात उद्योगधंदे निर्माण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावे.

१०) जागल्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य व शिक्षणाच्या मोफत सुविधा पुरवाव्यात.

संदर्भसूची :


1. Mehta B.H. *"Social and Economic Conditions of the Tribe"*, Several Society, Bengal (1934).

2. Tripathi S.N., *Tribal Migration*, Sonali Publications, New Delhi (2005).

३. अजमेरा सुर्यकांता व इतर (संपा)- *आदिवासी व ग्रामीण बिकास*, अथर्व पब्लिकेशन्स् धुळे, (२०१०).

४. गारे गोविंद, *आदिवासी प्रश्न व परिवर्तन* अमृत प्रकाशन औरंगाबाद (१९९४).

५. गारे गोविंद, *सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा*, कान्टिनेटंल प्रकाशन , पुणे.

६. जगताप. डी. आर., *नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासीच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर शासकीय विकास योजनांचे परिणाम एक विश्लेषणात्मक अध्ययन.* कालखंड - १९९८ ते २००८ (२०१२).

७. दै.सकाळ,लोकमत, देशदूत, पूण्यनगरी,इ.

# जागतिक अर्थव्यवस्थेत विकासासाठी सहकार

**पी.आर.पवार, कुंडल,**
प्राचार्य, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू
लाड महाविद्यालय, ता.पलुस, जि.सांगली.
भ्रमणध्वनी : ९४२१०४९९०९
ई-मेल: dr.prpawar.eco@gmail.com

खुल्या व जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी संस्था निष्प्रभ ठरत आहेत असे सर्वसामान्य मत बनू पहात आहे. परंतु सध्याच्या भांडवलशाही खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पूर्वीपेक्षाही सहकारी संस्थांची गरज जास्त आहे. नवसाम्राज्यवाद सहकारी संस्था मोडीत काढून त्यांना गिळंकृत करण्यासाठी आसुसलेला आहे. जागतिक कामगार संघटनेच्या अलिकडील अभ्यासावरुन असे दिसून आले आहे की, अलिकडच्या जागतिक आर्थिक पेच प्रसंगाना तोंड देण्यासाठी सहकारी संस्था या अधिक सक्षम व टिकाऊ (Sustainable) आहेत. आजच्या या गुंतागुंतीच्या व आव्हानात्मक जागतिकीकरणाच्या युगामध्ये सर्वसमावेशक विकासासाठी सहकारी संस्थांमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावण्याची क्षमता आहे.

जगभरातील अनुभव हेच सांगतो की, सुरवातीच्या काळामध्ये ज्या देशामध्ये सरकारचा सहकाराला धोरणात्मक पाठिंबा आहे अशा देशामध्ये सहकारी संस्था या अधिक सामर्थ्यशाली आहेत. भारत, चीन व अमेरिका या देशामध्ये सर्वात जास्त सहकारी संस्थांचे सभासद आहेत. भारतीय सहकार चळवळ ही आज विकास व सर्वसमावेशकतेचे एक प्रभावी आर्थिक साधन बनली आहे. तथापि आपण जगाच्या इतर देशाशी तुलना केली तर आपल्याला सहकारी चळवळीत अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. आव्हाने व समस्यांनी ग्रस्त असलेल्या भारतीय सहकारी चळवळीला पुनरुत्थानाची गरज आहे. सहकाराचे यश हे प्रामुख्याने सरकारचे नियंत्रण, सभासदांचा सहभाग, कुशल व त्यागी नेतृत्व यावर अवलंबून आहे. आजच्या या भांडवलप्रधान पिळवणुकीवर व तंत्रज्ञानाचे प्राबल्य असलेल्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये सहकाराची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढवणे आवश्यक आहे. त्यांनी व्यावसायिक व व्यापारीदृष्ट्या अधिक सक्षम व्हायला हवे, तरच त्या जागतिक स्पर्धेला तोंड देऊन विकासाचे व सर्वसमावेशकतेचे एक प्रभावी आर्थिक साधन म्हणून कार्यक्षमपणे काम करतील.

**अंत:प्रेरणादायी भारतीय सहकारी चळवळ:**

भारतीय सहकार चळवळ ही जगातील सर्वात मोठी चळवळ आहे. सध्या भारतामध्ये सहा लाखा पेक्षाही जास्त सहकारी संस्था असून ७१ टक्के ग्रामीण कुटूंबापर्यंत व ९९ टक्के खेड्यापर्यंत सहकार चळवळ पोहोचली आहे. या सहकारी संस्थांचे २४ कोटी सदस्य असून त्या लाखो गरिबांना रोजगार देण्याचे कार्य करतात. म्हणजेच सहकारी तत्त्वावर आधारित सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक सर्वसमावेशक विकास साध्य करण्याचे सहकार हे एक साधन आहे.

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरण या त्रिसुत्रीने सरकारचे सहकार विषयक धोरण बदलले व त्यानंतरच्या पंचवार्षिक योजनात मदतीचा ओघ कमी केला व सरकारने सहकारातून अंग काढून घेण्यास सुरुवात केली. भारतातील सहकारी चळवळीला शंभर वर्षाचा इतिहास आहे. सहकाराची शताब्दी देशभर साजरी करण्यात आली. या शंभर वर्षाच्या काळात सहकाराने अनेक क्षेत्रामध्ये सर्वस्पर्शी कार्य करुन अनेक क्षेत्रात नेत्रदिपक कार्य केले आहे. परंतु सहकार चळवळ स्वयंपूर्ण व स्वावलंबी झालेली नसून अजून सुध्दा मोठ्या प्रमाणावर सरकारी मदतीवर अवलंबून आहे. सरकारचे सहकार विषयक धरसोडीचे धोरण व सहकारातील स्वार्थी नेतृत्व सहकाराला अधोगती आणण्यास कारणीभूत आहे. असे असले तरी, युनोने (UNO) २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करुन जागतिकीकरणाच्या युगात सुध्दा सहकाराची भूमिका अत्यंत मोलाची ठरेल व तीच सामान्य माणसांच्या विकासाचे साधन असेल, हाच विश्वास दाखविला आहे.

**सर्वसमावेशक विकासासाठी सहकार:**

भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थांतील आर्थिक विकास आपल्याला हेच दर्शवितो की, विकास हा सर्वसमावेशक असेल तरच तो चिरंतन व टिकाऊ असतो. आधुनिक भांडवलशाही बाजारी अर्थव्यवस्था ही पिळवणूकीवर, वाढीव मुल्य निर्माण करण्यावर व अधिकचा हव्यास यावर आधारलेली असल्याने गरीब व श्रीमंत यांचेमधील दरी फार मोठ्या प्रमाणावर रुंदावत आहे. आर्थिक विषमता व सामाजिक अस्वस्थता वाढत चाललेली आहे. सामाजिक असंतोष धुमसत आहे व सामाजिक क्रांतीची बिजे येथेच पेरली जात आहेत. यातूनच नवीन अर्थव्यवस्थेचा उदय होईल व ती सहकारी व समाजवादी तत्त्वावर आधारित असेल. या भितीपोटी जगभरातील सरकारे आर्थिक विकास साधत असताना अस्वस्थ आहेत व सर्वसमावेशक विकासाचा स्वीकार करणे त्यांना भाग पडत आहे. सर्वसमावेशकतेचा साधा अर्थ म्हणजे जेथे विकासामध्ये गरिबांचे योगदान असेल व त्या विकासातून गरिबांना फायदा होईल असा होतो. म्हणूनच आजच्या जागतिकीकरणामध्ये सर्वसमावेशक विकासाचे प्रमुख साधन बनण्याची क्षमता सहकारामध्येच आहे.

सन २००७-२००८ मध्ये आलेल्या जागतिक आर्थिक संकटात मागील १५० वर्षापेक्षा जास्त काळ कार्यरत असलेल्या बँका दिवाळखोरीत बुडाल्या. परंतु जागतिक आर्थिक संकटाच्या काळात सुध्दा सहकारी संस्था समर्थपणे कार्यरत आहेत व सामान्य जनाचे उपजीविकेचे व कल्याणाचे कार्य समर्थपणे पार पाडीत आहेत. कारण सहकाराच्या उभारणीमध्येच

सर्वसमावेशकता आहे. कारण ती सर्व सभासदांची संस्था असते व अल्पकालीन मोठा नफा हे ध्येय नसून दिर्घकालीन टिकावूपणा व सर्वसमावेशक विकास हा सहकाराचा अंगभूत गुण आहे.

सहकारी बँका किंवा पतसंस्थांचा जर विचार केला तर त्या व्यापारी किंवा गुंतवणूक बँकींग सारखा भरमसाठ नफा मिळविण्याच्या मागे न लागता त्या मुलभूत बँकींगच्या कार्यावर भर देतात. कर्ज वाटप करताना त्या कर्जदाराच्या तारणाला जास्त महत्व देत नाहीत, कारण त्याचे मुल्य मोठ्या प्रमाणावर घसरु शकते. तर सहकारी बँकांना सभासद कर्जदाराबद्दल पूर्ण माहिती असते. त्या माहितीच्या आधारावरच कर्जदाराची पत ओळखून पतपुरवठा केला जातो म्हणून मूल्यावर आधारित सहकाराचे तत्त्वज्ञान असल्याने त्या जास्त यशस्वी होतात. जागतिक आर्थिक संकटाच्या काळात सुध्दा त्या सक्षमपणे कार्यरत आहेत. युनोचे जनरल सेक्रेटरी बान की मून यांच्या मते आंतरराष्ट्रीय समुदायाने हे लक्षात घेतले पाहिजे की, सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास व सामाजिक जबाबदारी एकाचवेळी पार पाडता येते.

सहकारी त्रिस्तरीय वित्त व्यवस्थेमध्ये ४०० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, त्यांच्या १३,००० शाखा, ३१ राज्य सहकारी बँका व त्यांच्या १००० शाखा आहेत. त्यांना सध्याचे सभासद व नवीन होऊ इच्छिणाऱ्या सभासदांची माहिती असते. अशाप्रकारचे सहकारी संस्थांचे मजबूत जाळे व ग्रामीण भागातील असंख्य लोक सहकारी बँकांचे सभासद असून देखील त्यांना आर्थिक समावेशक कार्यक्रमात (Financial Inclusion Programme) सहभागी करुन घेतले नव्हते. कारण आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी असणारे तंत्रज्ञान त्यांच्याकडे उपलब्ध नाही. नाबार्ड आता सहकारी बँकांमध्ये समान तंत्रज्ञान आणून त्यांना आर्थिकदृष्ट्या सबळ करुन सर्वसमावेशकता साध्य करणेकामी त्यांचा सहभाग वाढवणेसाठी प्रयत्नशील आहे.

### आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी सहकारी बँकांनी काय करायला हवे ?

व्यावसायिकता व व्यवस्थापन: सहकारी बँकांमध्ये व्यावसायिकतेचा अभाव आहे. व्यवस्थापनामध्ये बोर्डाचा हस्तक्षेप फक्त बोर्ड मिटींगच्यावेळी आढावा घेतेवेळीच असावा, प्रगती अहवालाचा अभ्यास करुन व माहिती घेऊन त्यांनी निर्देश देण्यास हरकत नाही. सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक पदावर योग्य व कार्यक्षम व्यक्तीच असायला हवी.

**परवाना निकष:** भारतातील एकूण ४०२ ग्रामीण सहकारी बँकांपैकी ३१ मार्च २००९ पर्यंत ३१? सहकारी बँकांकडे विना परवाना होता. भारतीय मध्यवर्ती बँक व नाबार्ड यांनी एकत्रित काम करुन व परवान्याचे निकष कमी करुन २७२ सहकारी बँकांना परवाने देण्यात आले. १ एप्रिल, २०१२ रोजी ४१ सहकारी बँका कमी निकषाची देखील पातळी गाठू शकत नव्हत्या. या ४१ बँकांना भारतीय मध्यवर्ती बँकेने नवीन ठेवी घेण्यापासून मज्जाव केला असला तरी जनतेच्या हिताच्या दृष्टीने त्यांना नियमित कामकाज करण्यास मनाई केली नाही.

### नवीन तंत्रज्ञानाचा अंगिकार व विश्वास:

आधुनिक बँकींगच्या कार्यक्षमतेमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा मोलाचा वाटा आहे. व्यापारी व इतर बँकांपेक्षा सहकारी बँका नवीन तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मागे पडल्या आहेत. आधुनिक

तंत्रज्ञान इतर व्यापारी बँकांशी स्पर्धा करणेसाठीच नव्हे तर आजचा ग्राहक ग्रामीण असो की शहरी त्याला नवीन तंत्रज्ञान, व्यवहारात गती व कार्यक्षमता हवी आहे.

### सभासदांचा वाढता सहभाग:

सहकारामध्ये सभासदांचा सहभाग वाढण्यासाठी त्यांचा संस्थांशी संपर्क वाढला पाहिजे. सातत्याने त्या संस्थांच्या संपर्कात येण्यासाठी सहकारी संस्थांनी आपल्या सेवा (Product Range) वाढवल्या पाहिजेत. त्यासाठी खरेदी-विक्री, शितगृहे, गोडावून, बी-बियाणे, रोपे, शेती औजारे भाडेतत्वावर देणे, इंटरनेट सुविधा, जमिनीचे रेकॉर्ड, हवामान विषयक माहिती केंद्र, शेती विषयक सल्ला केंद्र, शेतमालाच्या किंमती विषयक माहिती, विमा योजना, वाहतुक सेवा, लग्न समारंभासाठी हॉल इत्यादी अनेक प्रकारच्या सेवा व सुविधा सहकारी संस्थांच्या माध्यमातून सभासदांना पुरविल्या तर या जागतिकीकरणाच्या युगामध्ये माणुस माणसापासून दूर चालला आहे तो जवळ येण्यासाठी व स्नेहसंबंध वृध्दिंगत होऊन सर्वसमावेशकता जोपासण्यासाठी सहकाराची निश्चितपणे मदत होईल.

### ठेवींची सुरक्षितता व भागभांडवल:

अनेक सहकारी बँका व पतसंस्थांमधील सभासदांच्या ठेवी बुडाल्याच्या घटना घडल्या आहेत. सहकारी बँकांमधील आपल्या ठेवी सुरक्षित राहतील की बुडतील या भितीपोटी सभासद आपल्या ठेवी सहकारी बँकांमध्ये ठेवण्यास धजावत नाहीत. सभासदांची व ग्राहकांची सहकारी बँकांवरील विश्वासाहर्ता व श्रध्दा अत्यंत महत्वाची आहे. आजरोजी सहकारी बँकांचा व्यवसाय कमी होऊन तो व्यापारी बँका हस्तगत करत आहेत. सहकारी बँकांनी आपली विश्वासाहर्ता टिकवून कार्यक्षमपणे सेवा देणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या ठेवीना विम्याचे संरक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी ठेव विमा संरक्षण योजना शासनाने अंमलात आणली पाहिजे. सहकारी संस्थांची क्षमता वाढविण्यासाठी त्यांचे भागभांडवल वाढवण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

### सहकारी नेतृत्व:

सहकाराचे यश व प्रगती ही सहकारी नेतृत्वावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. काही अपवाद वगळता सहकारी नेतृत्व हे स्वार्थी वृत्तीचे दिसून येते. ते स्वत:ला सहकारी संस्थांचे सभासद व विश्वस्त न समजता मालक असल्यासारखे वागतात. हेच सहकारातील नेतृत्व ही सहकारी संस्था कशी बंद पडेल व ती विक्रीस निघाल्यानंतर स्वत: खरेदी करुन खाजगी मालकी प्रस्थापित करुन स्वत:चे साम्राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जातो. ही प्रवृत्ती सहकारास अत्यंत मारक आहे. अशा प्रवृत्तीमुळे सामान्य सभासद सहकारा पासून दूर जायला सुरवात झाली आहे. यामुळे सहकाराचे तत्वच मोडीत निघत आहे. सहकार टिकण्यासाठी व सहकाराच्या निकोप वाढीसाठी निस्वार्थी, त्यागी व समर्पित नेतृत्वाची आज खरोखरच गरज आहे.

### संदर्भसूची:

(१) सहकारी महाराष्ट्र, जुलै २०१३

(२) अर्थसंवाद, मार्च-एप्रिल २०१३

(३) Mukhi, H.R. (1987) *Cooperation in India and Aboard*, R.B.Pub., New Delhi.

(४)Reserve Bank of India, Bulletin, 2012.

# बांबू-प्रक्रिया एक महाउद्योग

एस. एस. कावळे, तळोधी (बाळापूर),
प्राचार्य, श्री गोविंदप्रभू कला वाणिज्य महाविद्यालय,
ता.नागभीड जि.चंद्रपूर
भ्रमणध्वनी: ९४२०१४३८१०

बांबुचे रुपांतर बुरडांनी विविध वस्तूत केले नसते तर बांबु ही अत्यंत उपयुक्त व महत्वाची वनस्पती आहे हे कदाचित कोणाच्याही लक्षात आले नसते. बुरडांचा व्यवसाय हा पूर्णपणे बांबुवर अवलंबून असतो. बुरड लोक बांबुशी एवढे एकजूट झालेले दिसून येतात की दोघांचे वेगळे अस्तित्व असू शकणार असे म्हणने वावगे नाही म्हणूनच 'जिथे बांबु तिथे बुरड' असे म्हटले जाते आणि *बांबुशिवाय बुरड म्हणजे 'पंखांशिवाय गरुड'* ही प्रसिध्द म्हण त्याचे महत्त्व पटवून देते.

बुरडकाम प्राचीन काळापासून बहूतेक सर्व समाजात चालत असलेला हस्तव्यवसाय आहे. विशेषत: आदिवासींसह इतरही समाजात अत्यंत प्राचीन व सार्वजनिक स्वरुपाचा हस्तव्यवसाय असून जगातील सर्व विद्यमान आदिवासी जाती-जमातीमध्ये बुरड व्यवसाय टिकून आहे. बुरड कामाचे प्राचीन नमुने त्याच्या नाशवंतपणामुळे उपलब्ध नसले तरी वाळवंटी प्रदेश व कोरड्या गुहा यातून काही नमुने आढळले आहेत.

पूर्वी शेणमातीने लिंपून बांबूपासून तयार केलेल्या वस्तूमध्ये द्रव पदार्थ सुध्दा साठवून ठेवण्यासाठी त्याचा वापर केला जात होता, हे नमुण्यावरुन आढळून येते. अमेरिकेत जेव्हाळा (इ.स.पूर्वी ९००० ते ७०००) आणि इजीप्त मधील जामा (इ.स.पूर्वी ५२७० ते ४६३०) हया ठिकाणी बांबूच्या वस्तूंचे नमुने आढळले आहेत.

अशा रितीने अगदी पाषाणयुगापासून तर आजपर्यंत बुरड व्यवसायापासून बनविलेल्या विविध वस्तू वापरात असल्याचे दिसून येते. भारतात २० लक्ष कुटूंब ह्या व्यवसायात गुंतलेले आहेत आणि ते कलाकुसरीच्या शोभेच्या वस्तू हस्तकलेद्वारे बनवितात एवढी मोठी लोकसंख्या यात गुंतलेली आहे. तरीपण बांबु व्यवसायाला दुर्देवाने सांस्कृतिक सन्मान मिळालेला नाही. कुठल्याही व्यवसायापेक्षा यातून अधिकाधिक वस्तू पुरविल्या जातात आणि अधिकाधिक

परिवारांचा उदरनिर्वाह यावर चालतो त्यामुळे ह्या कलेला 'महाउद्योग' म्हणवून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.

भारत हा असा देश आहे की, विविधतेने नटलेला मानव समाज यात दिसून येतो. जगातील फारच कमी देशात असा मानव समाज दिसतो. सुमारे १० लाख वर्षापूर्व पृथ्वीवर मानवाची निर्मिती झाली असे जीवशास्त्र मानतात. तेव्हापासूनच मानव आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी निसर्ग संपत्तीचा (वनसंपत्ती) वापर करतात. बुध्दीचा वापर करून हया पासून स्वत:च्या उपजीविकेसाठी विविध वस्तू आणि साहित्य निर्माण केलीत. नंतर संस्कृती ही रितीरिवाज व चालीरिती यातून विकसित होत गेली. प्रत्येक मानव समाजाच्या स्वभावानुरुप संस्कृतिमध्ये काही समानता आणि काही भेद दिसतात. आपल्या देशात समाजाची मुळ रचना जातीय पध्दतीवर आधारलेली आहे. जात ही माणसाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनावर आजही नियंत्रण ठेवते. मनुष्याची किंमत किंवा श्रेष्ठत्व हे दैनंदिन व्यवहारात जसे गुणावर व कृतीवर अवलंबून असते तसेच ते जातीवर व जन्मावर अवलंबून असते.

भारतात अनेक प्रांत अनेक भाषा अनेक संस्कृती आहे. त्यात अनेक जाती धर्मही आहेत. प्राचीन काळापासून बुरड ही जमात अस्तित्वात आली आहे. कारण की हिंदू समाजाची रचना ही कामाची विभागणी विचारात घेऊन केलेली आहे. उदा.कुंभार, लोहार, सुतार, नाव्ही, शिंपी, सोनार इत्यादी वेगवेगळया जाती निर्माण झाल्या. मातीची मडकी बनविणारा कुंभार, लोखंडाचे काम करतो तो लोहार, लाकडी वस्तू बनविणारा सुतार, हजामत करणारा न्हावी, कपडे तयार करणारा शिंपी, सोन्याचे काम करणारा सोनार हे व्यावसायिक नावे आहेत. समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या बांबूपासून विविध वस्तू तयार करतो ते 'बुरड'.

### बुरड कामगारांच्या उत्पत्ती पुराणकथा:

हिंदू धर्म जातीव्यवस्थेत प्रत्येक जातीजमातीच्या निर्मितीची विशिष्ट पुराणकथा सांगितली जाते. बुरड समाजाच्या पारंपरिक धंद्याविषयी एक लोककथा रुढ आहे. ती थोडक्यात पुढीलप्रमाणे-

देव लोक ाज्य करीत असतांना संक्रांतीच्या सणाविषयी पार्वती व शंकर आपसात चर्चा करीत असतांना पार्वतिला सुपल्यांची आठवण येते. वाण म्हणून देवादिकाला, मैत्रिणिला सुपल्या भेट म्हणून त्या दिवशी देणे महत्वाचे असते. पार्वतीने शंकराला विनंती केली की संक्रांतीच्या दिवशी माझ्या मैत्रिणीला सुपल्या द्यावयाच्या आहेत. तेव्हा शंकराने पार्वतीला संगितले की तू त्याची चिंता करु नकोस मी तुला मनाचा बुरड बनवून देतो आणि त्याला बांबू आणण्यास वनात पाठवितो. त्यापासून तो वाणाच्या सुपल्या तयार करुन देईल. नंतर शंकराने मनाचा बुरड तयार केला. त्याला शंकराने बांबू आणण्याकरीता वनात पाठविले. त्याने शंकराच्या आज्ञेप्रमाणे बांबू आणून सुपल्या तयार करुन दिल्या.

सुपल्या तयार केल्यानंतर भगवान शंकर संतुष्ट होतील आणि आपल्याला काही बक्षीस देतील असे बुरडास वाटते. त्या अपेक्षाने तो बक्षिसाची अपेक्षा करीत दारात उभा राहीला. वाणाच्या सुपल्या तयार केल्या म्हणून भगवान

शंकरही फार खुश झाले ते बाहेर येवून पाहतात तर तो बुरड दारात उभा होता. शंकराने बुरडाला पाटावर बसायला सांगितले आणि पार्वतीला पाटावर बसलेल्या इसमाला सुपभर मोहरा देण्यास सांगितले, नंतर पार्वती मोहरा देण्यास आपल्या सखीला सांगते.

बऱ्याच वेळ बुरड पाटावर बसून राहतो. तेवढ्यात एक ब्राम्हण भिक्षू येतो. बुरड नम्रपणे हात जोडून स्वतःचा पाट ब्राम्हणास बसण्याकरिता देतो. बुरड थोडया अंतरावर उभा राहतो. काही वेळाने पार्वतीची सखी सुपभर मोहरा घेवून येते व पार्वतीने सांगितल्याप्रमाणे पाटावर बसलेल्या व्यक्तीस संपूर्ण मोहरा देते. ब्राम्हण भिक्षू संतुष्ट होवून निघून जातो. बुरड मात्र बक्षिसाच्या अपेक्षाने तसाच ताटकळत उभा राहतो. थोड्या वेळाने शंकर - पार्वती बाहेर येतात. हात जोडून उभा असलेल्या बुरडाला पाहून शंकराला आश्चर्य वाटते. ते बुरडाला विचारतात की तुला मोहरा मिळाल्या का? त्यावर बुरड झालेली हकीकत नम्रपणे सांगतो. त्याचे संभाषण ऐकून शंकर-पार्वती म्हणतात की, ''तुझे नशिबच उलटे आहे, त्याला आम्ही काय करणार'' त्यावर बुरड शंकराला म्हणतो की 'हे प्रभू ! माझे नशिबच उलटे तर मी काय करावे ! ते सांगा.' तेव्हा पार्वती म्हणाली की, ''येथून पुढे बांबू तास (फोड) आणि पोट भर.''

या कथेचा आधार घेवून बुरड समाजाचे लोक आजही मोठ्या अभिमानाने सांगतात की, देवी पार्वतीच्या आज्ञेवरुन हा व्यवसाय आम्ही आजपर्यंत करीत आहोत. प्रस्तुत कथेत शंकर-पार्वतीचा संबंध आल्याने आणि त्यांनीच उपजीविकेचे साधन उपलब्ध करुन दिल्याने बुरड समाजात अत्यंत पवित्र आणि मानाचे श्रध्दास्थान शंकर-पार्वतीला सांगण्यात आले.

या लोकांचे बुरड आणि मराठी बोलणारे बुरड आणि मेडर किंवा लिंगायत आणि कन्नड भाषी बुरड असे मुख्य भेद आहेत. त्यांच्यात परस्पर रोटी-बेटी व्यवहार होत नाही. मराठी भाषा बुरड मुळात मराठा होते. ते आपल्या उत्पत्ती विषयी पुढील कथा सांगतात.

पार्वती ऋतुमती झाल्यावर तिची ओटी भरण्यात आली. ओटीतील गहू, नारळ, पान-सुपारी व फनी हया वस्तू ठेवण्यासाठी एक सुप पाहिजे म्हणून शंकराने बुरडाला बोलाविले व पार्वतीच्या बागेतील पाच बांबु तोडून त्याचे सुप बनविण्यास सांगितले. पण त्यांनी पाच ऐवजी दहा बांबु तोडले त्यामुळे शंकर रागावले आणि ते मराठा जातीतून बहिष्कृत झाले.

**बांबू गरीब व सामान्य माणसाचे लाकूडः**

बांबूलाच वेळू, कोरकू असेही म्हणतात. हा गरीब माणसाचा मित्र मानला जातो. बांबूचे विविध उपयोग आहेत. ग्रामीण व आदिवासी अर्थव्यवस्था विचार केला तर बांबू जनतेची केवळ निवाऱ्याचीच गरज भागवित नाही तर ग्रामोद्योगात त्याचा विविध प्रकारे उपयोग होतो. आजच्या परिस्थितीत बांबूची उपयुक्तता निवारा, सौंदर्यीकरण, वनीकरण किंवा निसर्गाची रमणीयता वाढविण्याकरीता राहीला नसून खाद्यान्न साठविण्यासाठी बांबूच्या विविध वस्तू शहरात व खेडयातील घरांमधून उपयोग होतो.

बांबू हा वनस्पती वर्गीकरणातील तृण (गवत) कुळातील आहे. भारतात बांबूच्या १२५ देशी आणि विदेशी प्रजाती आढळतात. भारतातील १०.०३ दशलक्ष हेक्टर म्हणजेच एकूण वनभूमीच्या १२.८८ क्षेत्रावर बांबू आढळतो.

पर्जन्यमान, तापमान समुद्र सपाटीपासूनची उंची व मातीचा प्रहार या गोष्टीवर बांबूची भौगोलिक व्याप्ती अवलंबून असते.

बांबू झाडाच्या बुडाकडील भागास कंद असे म्हणतात. यातूनच नवीन कोंबाची निर्मिती होते व त्यांची वाढ होवून बांबूचे मुख्य खोड किंवा कडक कलम तयार होते. १२ ते १५ कडकाच्या समुहास बांबूचे बेट असं म्हणतात. बांबूच्या कंदापासून टोकदार नाजुक असे कोंब पावसाळ्यात जुलै ऑगस्ट मध्ये तयार होतात. कंदापासून टोकदार नाजुक असे कोवळे बांबूचे कोंब ३ ते ४ महिन्यात भराभर वाटतात व पूर्ण लांबीचे होतात. नंतर त्यांना फांद्या फुटतात. साधारणपणे रोपांची पूर्ण वाढ होण्याकरीता ७ ते ८ वर्ष लागतात. त्यानंतर बांबूची तोड करण्यात येते. अशा रितीने बांबूच्या झाडाची ओळख सांगता येते.

**बांबूचे विविध उपयोग/बुरडांचा मित्र बांबू:**

बांबू हा गरीबांचा मित्र मानला जातो. बांबूची मजबूती, सरळपणा, हलकेपणा, आकारमानातील विविधता, पोकळपणा त्यापासून मिळणारा लांब धागा व हाताळण्यात आलेली सुलभता ह्या गुणधर्मामुळे बांबुचे विविध उपयोग आहेत आणि म्हणूनच बांबुचे १००१ उपयोग आहेत असे मानले जाते. भारतात घरबांधणीसाठी मानवेल व कटांग बांबुचा सार्वजनिक उपयोग केला जातो. तसेच टोपल्या बनविने, फर्निचर बनविने व शेतीच्या अवजारासाठीही उपयोग होतो. तसेच बांबुंचा उपयोग होळयांचे नांगर, बाण, फाटे, होळया, तराफे, धनुष्य, झाडू, ब्रश, लहान चुल, पाळणा, निरडी, शवपेटी, सामानाच्या टोपल्या, बासरी, फुलदानी, पंखे, कुंपण, बैलगाड्यांचे आस, बर्फात चालण्याच्या काठ्या, खुर्च्या, चपला (खडावा) पेन, सुट, अवजारांचे दांडे, ध्वजांचे दांडे व इतर असंख्य उपयोग आहेत.

बांबुच्या २० प्रमुख जातीमध्ये मजबुती व इतर भौतिक गुणधर्म दिसतात. विशेष घनता लवचिकपणा व आकर्षण क्षमता त्यामुळे त्यांचा वापर घरबांधणीसाठी फार प्राचीन काळापासून केला जातो. औषधीसाठी सुध्दा बांबू फार उपयोगी पडतो. अस्थमा, खोकला, थंडावादायक टॉनिक व इतर विविध रोगांवर औषध म्हणून तपशिल हा बांबुच्या पेरामधून स्त्रवणारा चिक्कट पदार्थ उपयोगात आणला जातो. दुर्गंधीनाशक म्हणूनही बांबुच्या पिकलेल्या पानाचा उपयोग होतो. मृदसंधारण, गृहसजावट, वनऔषध, गृहनिर्माण, जनावरांचे खादय, विविध वस्तुंचा कच्चा माल, कागदांचा लगदा इत्यादी साठी बांबू फार उपयुक्त आहे आणि साधारणतः ते सहज उपलब्ध होते. त्यासाठी फारशी किंमती मोजावी लागत नाही. बहूउपयोगामुळे त्याला गरीबांचा मित्र असे म्हणतात.

भारतात सर्वत्र बुरड मोठया प्रमाणात आढळून येतात. गावामध्ये आणि शहरामध्ये बुरड हमखास दिसतात त्यांना ओळखण्यासाठी विशेष मेहनत घ्यावी लागत नाही. ते नेहमी उघड्यावर खाली मान घालून काम करीत असतात. घरासमोर बास घेवून त्यापासून बेर काढतात आणि काढलेल्या बेरापासून विविध वस्तू नेहमीच तयार करतांना दिसतात. त्यांच्या घरासमोर नेहमीच दोन तीन बास ठेवलेले असतात. त्यांच्या व्यवसायाबद्दल त्यांना विचारले असता ते असे म्हणतात की *'बेर काढू तर पोट भरु'*.

माणूस जेव्हा भ्रमंतीचे जीवन संपवून

एका ठिकाणी स्थिर होतो. तेव्हापासून त्याच्या जीवनात कारागीरीचा प्रवेश होतो. व्यवहारिक उपयुक्तता आणि धार्मिक उपासना अशा दोन अंगांनी मानवी जीवनात कला-कौशल्याची वाढ होते. निवारा मिळविण्यासाठी घर बांधावयाचे पण तेवढ्यावरच संतुष्ट राहत नाही. आपले घर शोभिवंत बनवावे त्यात नव नवी उपकरणे निर्माण करावी त्यादृष्टीने मग तो कल्पना लढवू लागतो. समाजाच्या विकास क्रमात विविध व्यवसाय निर्माण होतात आणि त्यातही कला - कौशल्याला वाव मिळतो. धार्मिक कर्मकांड आणि देवतांच्या उपासना यातही विविध उपकरणांची गरज असते. त्यामुळे त्या अंगानेही समाजात कला-कौशल्याची वाढ होवू लागते. अशाप्रकारे कला-कौशल्य हे मानवी संस्कृतीचे एक महत्वाचे अंग बनते. किंबहूना एकदा मानव समाज ज्या प्रमाणात सुंदर व उपयुक्त अशा कारागीरीच्या विविध वस्तू निर्माण करतो त्याप्रमाणात त्यांच्या संस्कृतीचे मुल्यमापन होत असते. याच आधारावर भारतात बांबुपासून फार प्राचीन काळापासून विविध कलाकुसरीच्या वस्तू बनविल्या जातात. बायकांचे दागीने ठेवण्याचे व कुंकवाचे करंडे पूर्वी बांबूचे असत. बांबूच्या वस्तू आजही घरोघरी दृष्टीस पडतात. मुलांच्या खेळातही असल्या वस्तू असतात. बांबुचे तटे कुळासारखे उभे करुन झोपडीची भिंत तयार करण्याची पध्दती फार प्राचीन आहे. अलीकडे हया तट्यावर विशिष्ट द्रव्य लावून त्यापासून प्लाय बनवितात. वारा घालण्यासाठी लहान-मोठे पंखे आणि त्यावर भरतकाम, नक्षीकामही करतात.

**बांबुच्या वस्तू व त्यांचे धार्मिक महत्व:**

प्रत्येक व्यक्तिला एक विशिष्ट स्थान, महत्त्व आणि आयुष्य असते. विशिष्ट वेळीच त्याचा वापर होणे फार गरजेचे असते. बांबुंना सुध्दा एक विशिष्ट आयुष्य आहे. त्या आयुष्यात त्याचा वापर केला नाही तर त्यापासून जे अनेक फायदे आहेत ते तर मिळणार नाही परंतु त्यापासून नुकसान सुध्दा सहन करावे लागते. हे एका संशोधनात आढळून आले आहे.

प्रत्येक फूल हे आपापल्या ऋतूत फुलते आणि मनाला भुरळ घालते. पण जवळपास ३० ते ४० वर्षानंतर उमलणाऱ्या बांबुंच्या दुर्मिळ फुलाने मात्र चिंता निर्माण केलेली असते. या फुलांच्या उमलण्याबरोबर दुष्काळी स्थितीची शक्यता व्यक्त केली जाते. या झाडांना ३० ते ५० वर्षांनी एकदाच फुले येतात व फुले आल्यावर त्या झाडाचे आयुष्य संपते. पण तज्ज्ञांच्या मते ही फुले आल्यानंतर दुष्काळाची परिस्थिती निर्माण होवू शकते. ही परिस्थिती निर्माण होण्यामागे कारणेही तशीच आहेत. बांबुच्या फुलानंतर ज्या बिया जमिनीवर पडतात त्याच खाण्याकरीता लाखोच्या संख्येत उंदीर जमा होतात. बी खाऊन झाल्यानंतर ते आसपासच्या शेतीची नासाडी करतात. इतकेच नाही तर गोदाम आणि रस्त्यावरील इतर झाडांवरही हल्ला करतात. त्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. अशी परिस्थिती बऱ्याच वेळा निर्माण झालेली आहे. त्यामुळे बांबूचा वापर हा योग्य वेळीच होणे आवश्यक आहे.

भारतीय संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती असून एक विशिष्ट असा वारसा असलेली संस्कृती आहे. परंपरेनुसार यात विविध वस्तूंना फार धार्मिक महत्त्व आहे. परंपरेनुसार बांबुच्या विविध वस्तू वापरल्या जातात. अगदी जन्मापासून तर मृत्यूच्या शेवटच्या विधीत पार पाडण्यासाठी सुध्दा बांबुच्या

विविध वस्तू वापरुनच तो पूर्ण केला जातो. ज्या वेळी मुलाचा जन्म होतो त्यावेळी त्याला सुपात ठेवले जाते. तसेच त्यावेळी ब्राम्हणास जे दान दिले जाते त्याकरिताही सुपाचाच वापर केला जातो. तर मनुष्य मरण पावल्यानंतर त्याचा जो अंतिम विधी केला जातो त्यावेळी सुध्दा त्याला बांबूपासूनच तयार केलेल्या शिडीवर झोपवून नेले जाते. त्याच्या सोबत जे विशिष्ट धान्य नेले जाते ते देखिल बांबूपासून तयार केलेल्या सुपातच नेले जाते. त्याची शिदोरी म्हणुन ज्या पेटलेल्या गोवऱ्या एका नवीन भांड्यात भरुन नेतात. ते नेताना बांबूच्या कांबी काढून त्याची एक तिकडी तयार केली जाते व त्यावर मांडून नेली जाते. ही एक फार प्राचिन भारतीय परंपरा आहे. त्याचा वापर आजही केला जातो.

कोठेही यात्रेला जात असतांना त्याचा ध्वज बांबूच्या काठीला लावला जातो. कारण पुराणकथेत बांबूला 'शंकराची काठी' असे म्हटले आहे म्हणून त्या काठीवरच ध्वज लावला जावा ही परंपरा आजही कायम आहे. बांबुच्या झाडाचे देवादिकापासून ते मानव जातीपर्यंत धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्व दिले आहे व ते पूजनीय आहे. जसे तुळशीच्या झाडाला देवादिकांनी, साधूसंतांनी जपीतपी ऋषीमुनी यांनी जेवढे महत्वाचे प्रथम स्थान देवून तिची जेवढी मनोभावे पुजा करतात, तेवढेच महत्वाचे स्थान बांबूच्या झाडाला दिले आहे. जसे, असे मानतात की, तुळशीच्या झाडाखाली श्रीकृष्ण राहतो तसेच बांबुच्या झाडाखाली शंकर राहतात म्हणुन तो पुजनीय आहे. म्हणुनच बांबु आणि बांबुपासून तयार केलेल्या विविध वस्तू फार उपयोगी आणि त्यांना धार्मिक महत्त्व देण्यात आले आहे. बांबुच्या काही वस्तुला त्यांचे धार्मिक महत्त्व पुढीलप्रमाणे:

१. बांबुची ढाल:
आदिवासी समाजात आजही अशी पध्दत रुढ आहे की, बांबूपासून ढाली बनवितात आणि त्यांच्या कुळातील कोणी व्यक्ती मरण पावला तर त्याच्या नावाने ती ढाल कुलदैवत म्हणुन पुजतात. त्या समाजातील हा एक फार महत्वाचा धार्मिक विधी असतो.

२. बांबुचे घर:
फार प्राचिन काळापासून आपल्या भारतात बांबुपासून घरे बनविण्यात येतात. अलिकडे सुध्दा बांबुपासून मोठमोठे घरे बनविण्यात येत आहेत. नैसर्गिक स्त्रोतांचा ऱ्हास थांबविण्यासाठी आता दगडमातीचा वापर न करता बांबुचा उपयोग करुन घरे तयार करण्याची संकल्पना राबविला जात आहे. वर्धेपासून ७ किलोमिटर दूर असलेल्या सालोड येथे देशातील पहिली 'बांबु वसाहत' उभी होत आहे. यामध्ये ५० घरे मनोरंजन केंद्र, रुग्णालय, दुकाने आदि राहणार आहेत. नवी दिल्ली येथील नॅशनल मिशन फॉर बांबु अॅप्लीकेशन टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून ही वसाहत उभारली जात आहे. या वसाहतीचे नाव 'वेणू ग्राम' असे राहणार आहे. अप्पर वर्धा धरणांतर्गत वर्धा जिल्ह्यातील मिसापूर गाव बाधित झाले होते. या गावाचे पुनर्वसन करण्याकरिता शासनाने ग्रामस्थांना जमिनी उपलब्ध करुन दिल्या. परंतु ह्या जमिनीवर बांधण्यात येणारी घरे ही नेहमीप्रमाणे न बांधता येथे नवा प्रयोग करण्याचे योजण्यात आले आणि यातून बांबू वसाहतीची कल्पना पुढे आली. शेतीनंतर इमारतीचा व्यवसाय

हा देशातील सर्वात मोठा व्यवसाय आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत हा व्यवसाय महत्त्वाची भूमिका निभावतो या व्यवसायात लाकुड, लोखंड, उर्जा आणि चुनखडी या नैसर्गिक स्त्रोतांचा सर्वाधिक वापर होतो. नुकत्याच झालेल्या एका सर्व्हेनुसार इमारत बांधकाम व्यवसायात या नैसर्गिक स्त्रोतांची उपलब्धता अत्यल्प आहे. भारतात आज घरकुल नसणाऱ्या प्रत्येकास जर एका वेळेस घरकुल बांधावयाचे झाले तर ही नैसर्गिक स्त्रोत कमी पडतील या समस्येला पर्याय म्हणून आज बांबुकडे पाहिले जात आहे. गेल्या अनेक शतकापसून इमारत बांधकामात बांबुचा उपयोग होत आहे. मात्र आता संपूर्ण घरच केवळ बांबुचा उपयोग करुन बांधण्याची कल्पना पुढे आली आहे. इतर स्त्रोत उपयोगात आणण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करावी लागते मात्र बांबू हा सरळ उपयोगात आणता येतो. या बांधकामात केवळ पाया हा विटांचा असतो त्या व्यतिरिक्त कुठेही विटा वापरण्यात येणार नाही. घराचे स्तंभ बांबुचे राहतील. भिंतीही बांबूच्या राहतील. या भिंतीची जाडी सुमारे साडेतीन इंचापर्यंत राहील. छत सुध्दा बांबुपासून तयार केलेले राहील. मात्र त्यांच्याकडे बघितल्यानंतर यात बांबू कुठे वापरला गेला हे लक्षातही येणार नाही. घरांच्या भिंती बांबुने विशिष्ट प्रकारे वीण करुन तयार केल्या जात आहे. या भिंतीवर सिमेंटचे लिंपण लावले जाईल. पूर्ण तयार झालेले घर पाहिल्यानंतर एका टुमदार घराची संकल्पना सत्यात उतरलेली दिसेल. बांबूची घरे तापमानाचा समतोल राखण्यास मदत करतील भूकंपापासूनही बचाव करतील एवढेच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तिंनाही ही घरे परवडण्यासारखी आहेत. कारण सिमेंट काँक्रिटचे घर बांधण्यासाठी ३०० ते ३२५ रुपये वर्गफुट किंमत द्यावी लागते. बांबूच्या घराचे बांधकाम १२५ ते १३५ रुपये वर्गफुट या किंमती होवू शकते.

३. काव्ड :

पाण्याच्या घागरी अथवा एखादा जड पदार्थ नेण्यासाठी दोन टोकांना शिंक्याचे रचनेप्रमाणे दोऱ्या बांधून तयार केलेले एक साधन म्हणजे कावड होय. कावडीला धार्मिक महत्त्वही आहे. पूर्वी यात्रेकरु काशीच्या गंगेचे कावड भरुन ती रामेश्वराला वाहण्याकरिता पायी यात्रा करीत होते. कित्येक धार्मिक संप्रदायातील लोक आपले देव कावडीत घालून गावोगाव हिंडवितात. दक्षिणेत सुब्रम्हण्याच्या उत्सवात त्यांचे भक्त कावडी खांद्यावर घेवून नाचतात. श्रावणकुमाराने आपल्या वृध्द व अंध मातापित्यांना कावडीत घालून तिर्थयात्रेला नेले होते अशी कथा आहे. चैत्र महिन्यात गोदावरीचे पाणी आणून आपल्या गावातल्या ग्रामदेवतेला त्या पाण्याने स्नान घालण्याची प्रथा पैठणच्या आसपास आहे. पेशवाईत काशीहून व हरीद्वार येथून गंगोदकाच्या कावडी पुण्याला आणून त्या रामेश्वर पर्यंत नेण्याचा धंदा काही लोक करीत असत.

४. बासरी:

फार प्राचीन काळापासून बांबुपासून बासरी बनविण्याची परंपरा अस्तित्वात आहे.

भारतीय संगीत परंपरेत बासरीला फार महत्त्वाचे स्थान आहे. अगरी कृष्णलीला सुध्दा बासरीतून दिसतात. बासरी ही पोकळ बांबूपासून बनविली जाते. बासरीचे दोन प्रकार आहेत. १) आडवी बासरी, २) उभी बासरी. ६ ते ७ छिद्र पाडून बासरी बनविण्यात येते.

५. परडी:

फार प्राचीन काळापासून परडीचा वापर भारतात केला जातो. परडीसुध्दा बांबुपासूनच बनवितात. लग्नप्रसंगी बांबुपासून तयार केलेल्या दोन लहान व दोन मोठ्या परड्या वापरल्या जातात. मोठ्या परड्यांचा वापर वधू-वरांचे नवीन कपडे देण्याघेण्याकरीता तसेच वधू-वरांची आंघोळ केल्यानंतर जो लग्नमंडपाला तोरण लावतात त्या तोरणाला एकत्र करुन परड्यात घेऊन तो वधू वरांच्या वर धरुन त्यावर पाणी घालतात. ते पाणी वधू-वरांच्या अंगावर पडल्यास त्यांचे जीवन भरभराटीने वाढते, अशी समजूत आहे. हा एक धार्मिक विधी म्हणूनही लग्नप्रसंगी पार पाडला जातो. तसेच लहान परडयांचा वापर पुजेकरीता केला जातो. काजळतिज, तिळसंक्रांत, गौरी जन्माष्टमी, चतुर्थी इत्यादी प्रसंगी बांबुपासून तयार केलेल्या परड्यांचा वापर केला जातो. आर्थिकदृष्ट्या त्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.

## बांबुचा विविध व्यावसायिकांना उपयोग:

उपभोगातून उत्पादनाची प्रक्रिया सुरू होते. ते अर्थशास्त्राचे मुख्य तत्व आहे. वस्तूची आवश्यकता असल्याशिवाय ती वस्तू निर्माण केली जात नाही. याला बांबुच्या वस्तू अपवाद नाही. फार प्राचीन काळापासून म्हणजेच अगदी संस्कृतीच्या सुरूवातीच्या विकासाच्या अवस्थेपासून बांबुचा वापर केला जातो. अगदी जन्मापासून ते मृत्युपर्यंत मानवाच्या अंतीम विधीपर्यंत बांबुच्या वस्तुचे मानवी जीवनात महत्व आहे. सामाजिक रितीने विचार करता बांबुचे समाजात विविध उपयोगी आहेत.

अनेक व्यवसायात बांबु उपयुक्त ठरतो. खाणकाम असो की, मग बांधकाम असो त्यात बांबुपासून तयार केलेल्या वस्तूचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला जातो. उदा. बीडी उद्योगाला बिडयांचे पॉकेट ठेवण्यासाठी पेटीरे, फळ व्यवसायाला पेटारे, कुक्कुटपालन उद्योगाला कोंबडया ठेवण्यासाठी बेंडवे, धान्य साठवणुकीसाठी ढोल्या, मंडप डेकोरेशनाठी बांबुच्या चटया, बांधकाम व्यवसायाला टोपल्या व बांबुच्या लांब चटया, खाणकाम व्यवसायासाठी टोपल्या, गृहसजावट उपयोगासाठी आधुनिक कलाकुसरीच्या बांबुच्या विविध वस्तू यामुळे विभिन्न उद्योगात बांबुची उपयोगिता दिसून येते. त्यामुळे बांबू उद्योग हा इतर उद्योगांना चालना देणारा उद्योग होय. कागद कारखाण्यासाठी बांबुचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. शेकडयाचे धूरे, खाचराचे (रेगींचे) धूरे, रेगीची चाफ, पूर्वी पाटकांबीची चटई विणून खोलीच्या विभागणीकरीता त्याचा उपयोग केला जात असे सध्या त्याजागी प्लायवूड काम करते. माळी आपल्या विविध प्रकारची फुले ठेवण्यासाठी टोपल्यांचा उपयोग करतो. पतंग व्यवसायामध्ये बांबूचा उपयोग केला जातो. पातळ कांबी तयार करून ढिवर व्यावसायिकांना मासोळी ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारची टोपली (धुटी) शेतकऱ्यांना

शेतीव्यवसायासाठी बांबूच्या वस्तूंचा बराच उपयोग होतो. उदा. टोपल्या सुपे इत्यादी उपयोग होतो. बांबूच्या कचऱ्यातुन निर्माण केलेल्या शोभेच्या वस्तु, बांबुच्या कपडे लटकविण्यासाठी खुंट्या तयार केल्या जातात.

आजच्या आधुनिक युगात इलेक्ट्रीक उपयोगामध्ये टेबल लॅम्प बांबुपासून तयार केले जातात. सोफासेट, ऑफीस टेबल, खुर्च्या बांबुच्या होवू लागल्या आहेत. त्यामुळे बांबूच्या वस्तु इतर व्यावसायिकांसाठी किंवा व्यवसायासाठी उपयुक्त आढळून आल्या आहेत.

## संदर्भ सूची :


१) वनराई संस्था, सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य पुणे.

२) गडचिरोली जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन आणि प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखती.

३) बुरडांनी सांगितलेली लोककथा.

४) भारतीय संस्कृती कोष, खंड ६, संपादक पं.महादेव शास्त्री जोशी, पृ.२०६, २०७, २०८.

५) वनराई संस्था, *बांबू गरीब व सामान्य माणसाचे लाकुड,* संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य पुणे.
संकलन-यू.के.अग्रवाल (उपसंचालक) सहाय्यक: डी.सी.पटवर्धन (सहाय्यक संचालक)

६) नवराष्ट्र ११/११/२००३ चा अंक

७) लोकमत १६/११/२००३ चा अंक, लेखक: वैभव काळे,

९) भारतीय संस्कृती कोष खंड २, संपादक: पं.महादेव शास्त्री जोशी पृ.३१४,३१५.

१०) भारतीय संस्कृती कोष, खंड ६, संपादक: पं. महादेव शास्त्री जोशी पृ.१८४.

# दुग्ध व्यवसाय - एक शेतीवर आधारित उद्योग

निमसे शितल संपत, अहमदनगर,
डॉन बॉस्को कॉलेज,
भ्रमणध्वनी: ९४२१३३३३३८.

शेती विकास देशाच्या सर्वांगीण विकासाचा कणा आहे. भारतासारख्या विकसनशील देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने शेती विकासावरच अवलंबून आहे. शेती ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार मानला जातो. शेतीचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो. भारतीय शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण घटत असले तरी शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या सर्वात जास्त आहे. शेतीमधील महत्वाचा घटक शेतकरी हा अन्नदाता आहे. परंतु गेल्या दहा-पंधरा वर्षात भारतात २.५ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व इतर कारणांनी आत्महत्या केलेल्या आहेत. भारतीय शेती ही मान्सूनवर आधारित आहे. त्यामुळे त्याला अपेक्षित उत्पादनाची खात्री नसते. शेतमालाला मध्यस्थांचा हस्तक्षेप असल्याने योग्य किंमत मिळत नाही. पुरेसे वित्तीय सहाय्य मिळत नाही. देशाचा आधारस्तंभ असलेल्या शेतकऱ्यांपुढे अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःच प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी शेतीवर आधारित उद्योगांचा आधार घेतला पाहिजे. दुग्ध व्यवसाय हा शेतीवर आधारित मुख्य व्यवसाय होऊ शकतो. कारण शेतकऱ्यांना शेतीकामासाठी, मशागतीसाठी, वाहतुकीसाठी पशुधनाची आवश्यकता असते. त्यामुळे भारतात जवळ-जवळ बहुतांश शेतकऱ्यांकडे कमी-जास्त प्रमाणात जनावरे आहेत.

### दुग्ध व्यवसायाचा अर्थ:

दुग्ध व्यवसाय म्हणजे दुभती जनावरे उदा. गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या सांभाळणे व त्यांच्यापासून दूध मिळविणे, दूध व दुग्धजन्य पदार्थांचा उपभोग कुटुंबाच्या उपभोगाकरिता करणे व त्यांच्या विक्रीतून आर्थिक उत्पन्न मिळविणे होय.

दुग्ध व्यवसाय शेतीचा असा पूरक जोडधंदा आहे की, यामध्ये दुधाळ

जनावरांची शास्त्रीय पध्दतीने जोपासना करून दूध उत्पादन घेतले जाते व आर्थिक लाभ मिळविला जातो.

## शेती क्षेत्रावरील दुग्ध व्यवसायाचे अवलंबित्व:

शेती व्यवसायात अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळ, भूकंप यापासून नेहमीच धोके असतात. तसेच पिकांच्या उत्पादनाचा कालावधीही मोठा असल्याने शेतीतील उत्पादन विकल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात पैसे येतात. त्यामुळे शेती उत्पन्नातून नियमितपणे अर्थार्जन होत नाही. दैनंदिन खर्चासाठी शेतकरी नेहमीच अडचणीत येतो या परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांनी शेतीबरोबर संकरीत जनावरे पाळण्यास सुरुवात केली पाहिजे. कारण दुधाचे पगार दर १५ दिवसांनी होत असतात. त्यामुळे दैनंदिन खर्च दुधाच्या पगारातून सहज भागविता येईल. एकेकाळी शेती हा मुख्य व्यवसाय होता व दूध उत्पादन दुय्यम व्यवसाय पण आता काळ बदलला आहे. दूध उत्पादन व्यवसाय हा मुख्य व्यवसाय झाला आहे व दूध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा झाला आहे.

जनावरांच्या प्रजोत्पादनाचे व्यवस्थापन शास्त्रीय पध्दतीने केल्यास दूध उत्पादनाकडे असणाऱ्या जनावरापासून सतत उत्पादन करता येईल. दूध व्यवसायातून शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न मिळत राहील. दूध उत्पादक शेतकऱ्यांकडे दुभती जनावरे असल्यामुळे त्यांच्यापासून शेण नियमित मिळते व या शेणाचा वापर घराच्या शेतीसाठी करता येतो. शेणखत विकत घेण्यासाठी बरीच किंमत द्यावी लागते. घरचे शेणखत उपलब्ध झाल्यास पैशाची बचत होते. तसेच जनावरांचे पालन पोषण अन्नधान्य उत्पादन करताना निर्माण होणारा टाकाऊ भाग वैरण, कडबा, भातपिकांचे तूस, मक्याच्या धाट्या इत्यादीवर होतो. तसेच कोणत्याही प्रकारच्या हिरव्या चाऱ्यापासून मुरघास बनविता येतो. उदा. मका, ज्वारी, बाजरी, लसूणघास, हत्तीगवत, यशवंत गवत यापासून मुरघास बनविता येतो. जमिनीत खास तयार केलेल्या खड्ड्यात किंवा जमिनीवर बांधलेल्या कणगीसारख्या गोल जागेत पावसाळ्यात उपलब्ध असणारा जादा हिरवा चारा हवाबंद करून साठवून ठेवणे, याला मुरघास किंवा सायलेज म्हणतात. मुरघासमध्ये असलेल्या हिरवा चारादेखील शेतीमधूनच शेतकऱ्यांना उपलब्ध होऊ शकते. डोंगरावर येणारे गवतही कापून जनावरांना घालण्यात येते. तसेच ऊसाचा पाला व अन्य मनुष्यास खाण्यायोग्य नसलेला भाग हाच वैरण म्हणून वापरला जातो. शिवाय शेण हे खत व गोवऱ्या रुपाने, गोबर गॅस या स्वरुपात इंधन म्हणून वापरता येत असल्याने शेतकऱ्यांना दुभती जनावरे बहुउपयोगी वाटतात.

पाऊस पडल्यानंतर नैसर्गिक कुरणे वाढू लागतात. या कुरणांची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ही कुरणे वर्षातून ४ ते ५ महिने चाऱ्यासाठी उपलब्ध होतात. तसेच हवामान जमीन व पाण्याची उपलब्धता या गोष्टी विचारात घेऊन विविध प्रकारची गवते, वैरणीची पिके, झाडे-झुडपे वैगरे वाढविली जातात. त्यापासून देखील उत्कृष्ट प्रतिचा भरपूर चारा मिळतो. म्हणजे जनावरांचे पालनपोषण देखील शेतीक्षेत्रावरच अवलंबून आहे.

दुधाबरोबर मोठ्या प्रमाणात खत देण्याची क्षमता या दुभत्या जनावरांमध्ये असल्याने दुग्ध

व्यवसाय हा शेती आधारित उद्योग समजला जातो.

पूर्वी धार्मिक कार्यामध्ये व आहारामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांचा वापर करून अन्नाची गरज भागविणे शेतीकामासाठी बैल व रेडे मिळविणे, अन्न म्हणून मांस मिळविणे एवढाच उद्देश पशुपालनाचा होता. लोकसंख्या कमी असल्याने या व्यवसायाकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहिले जात नव्हते. पण नंतर लोकसंख्येत वाढ झाल्याने दुधाची गरज वाढली. यातूनच दूध उत्पादन व दुग्ध व्यवसायाला चालना मिळाली.

### भारतातील दुग्ध व्यवसायः

जगाचे २०११ मधील एकूण दूध उत्पादन ७२७.६ दशलक्ष टन इतके आहे. भारताचे २०११ या वर्षातील दूध उत्पादन १२१.८ दशलक्ष टन असून ते एकूण जागतिक दूध उत्पादनाच्या १६.७४ टक्के इतके आहे. १९९९ मध्ये जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश म्हणून भारत उदयास येत आहे. हे स्थान आजतागायत कायम आहे. परंतु एका दुभत्या जनावरापासून मिळणारे सरासरी दूध उत्पादन सरासरी १.८ ते २.० लिटर प्रतिदिन एवढेच आहे. हेच प्रमाण इस्त्राइल सारख्या वाळवंटी देशात ३१ लिटर तर नेदरलँड मध्ये ३६ लिटर आहे. म्हणजेच इतर राष्ट्रांच्या तुलनेने गाई-म्हशींची दूध उत्पादन क्षमता वाढविण्याची गरज आहे. भारतात ७० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. त्यांच्याकडे असलेली शेतजमीन सरासरी ५ एकरपेक्षा कमी आहे. आर्थिक उत्पन्न कमी असल्याने बरेचसे शेतकरी दारिद्र्य रेषेखाली आहेत. २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास दर २.५ टक्के इतका आहे. तसेच राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा २०११-१२ मध्ये १६ टक्के इतका आहे मात्र या दरम्यान राष्ट्रीय कृषी उत्पादनातील पशु व मत्स्य व्यवसायाचा वाटा २९.७ टक्के पर्यंत वाढला.

भारतातील पावसाच्या लहरीपणामुळे लहान शेतकऱ्यांचा शेतीबरोबरच पशुपालनाकडे, दुग्ध व्यवसायाकडे कल वाढत आहे. देशातील दूध उत्पादनातील वाढ ३ टक्के एवढी आहे. दूध उत्पादनातील ही वाढ २०२५ साली असलेल्या लोकसंख्येची गरज पूर्ण करू शकत नाही. त्यासाठी जागतिक दूध उत्पादनात पुढील १२ वर्षात अंदाजे २०० दश लक्ष टन दुधाची वाढ अपेक्षित आहे. हे लक्ष साध्य करण्यासाठी भारतातील दुग्धोत्पादनाचा दर ३ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर न्यावा लागेल. त्यासाठी प्रत्येक पशुपालकाने त्यांच्याकडील पशुधनापासून उपलब्ध होणाऱ्या दुधाच्या उत्पादनात किमान दुप्पटीने वाढ करावी लागेल. प्रत्येक पशुपालकाने जास्त दूध उत्पादन देणाऱ्या दुधाळ जनावरांचे संगोपन केल्यास दुग्धोत्पदानात वाढ होईल आणि कृषी व्यवसाया प्रमाणेच दुधाचा व्यवसाय हा मुख्य व्यवसाय म्हणून उदयास येईल. भारतातील दूध मुख्यत्वे ग्रामीण भागात उत्पादित होत असल्याने दुधाच्या उत्पादन वाढीने ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊन जीवनमान उंचावण्यास मदत मिळेल.

दुध उत्पादनात तूट असलेला देश ते जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश हे भारताचे स्थित्यंतर डॉ.वर्गीस कुरियन यांनी आणंद येथील सहकारी संस्थेमुळे झाली. डॉ. कुरियन यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास महामंडळाने (एनडीडीबी) ऑपरेशन फ्लड

(धवलक्रांती) सुरु केले आणि अवघ्या चार दशकातच भारत हा जगातील सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश बनला आहे. शासनाने १७ जिल्ह्यात ही योजना तीन टप्प्यांत राबविली. हरितक्रांतीने लक्षावधी भारतीयांना भाकरी दिली, परंतु धवलक्रांतीने त्यावर लोण्याचा गोळा ठेवला असे मानले जाते.

**भारतीय अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसायाचे महत्व:**

१) रोजगार वृध्दी :

शेती व्यवसाय हंगामी स्वरुपाचा असल्याने लोकांना मिळणारा रोजगार देखील हंगामी स्वरुपाचा असतो. दुग्ध व्यवसाय विकसित केल्यास लोकांना व्यवसाय उपलब्ध करून देणे शक्य होईल. कारण भारतात पुरुष शेतमजुराला एक वर्षात सरासरी १४५ दिवस तर स्त्री शेतमजुराला एका वर्षात सरासरी १२४ दिवस काम असते. इतर दिवस ते बेकारच असतात. दुग्धव्यवसायामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

२) उत्पन्न व राहणीमानात सुधारणा :

शेतीमधून मिळणारे उत्पन्न अनेक कारणांमुळे अल्प असते. त्यामुळे बहुसंख्य लोकांचे राहणीमान निकृष्ट प्रतीचे आढळते. दुग्धव्यवसायामुळे दुध उत्पादकांना दर १५ दिवसांनी उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते व त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे शक्य होते.

३) आर्थिक पुनर्वसन :

अल्प व अत्यल्प भूधारक आणि भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असते. या लोकांना दुग्धव्यवसायामुळे अधिक रोजगार व अधिक उत्पन्न मिळू शकले तर त्यांचे आर्थिक पुनर्वसन सहज शक्य होईल.

४) बचतीस प्रोत्साहन :

शेतीमधून मिळणारे उत्पन्न अपुरे असल्याने ग्रामीण भागातील लोकांची बचत शक्ती फारच मर्यादित असते. दुग्ध व्यवसायासारख्या पूरक व्यवसायामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने बचतीतही वाढ होऊ शकेल.

५) दुग्धजन्य पदार्थ निर्मिती उद्योग :

आजच्या आधुनिक काळात दुधापासून विविध प्रकारचे पदार्थ तयार करण्याच्या पध्दती विकसित झाल्या असून यंत्राच्या सहाय्याने दुधाचे पृथ्थकरण करून त्याचे घटक वेगवेगळे करणे यांत्रिक प्रक्रियेद्वारे दुधाची भुकटी, लोणी, खवा, योगर्ट, आईस्क्रीम, दही, ताक, तूप, चीज, श्रीखंड, मसाला दूध इत्यादी दुग्धजन्य पदार्थ निर्मिती उद्योग स्थापन झाले आहेत. त्यामुळे रोजगार निर्मिती झाली आहे.

६) पूरक व्यवसाय :

शेतकऱ्यांकडे शेतीकामासाठी जनावरे असतात. त्यामुळे दुग्धव्यवसाय सुरु करणे व्यवहार्य ठरेल. या व्यवसायाला लागणारा कच्चा माल म्हणजेच चारा व इतर पशुखाद्य शेतीमधून मिळते. तसेच शेण हे खत म्हणून शेतीसाठी वापरता येते.

७) सुलभ तंत्र :

दुग्धव्यवसाय सुरु करण्यासाठी फारसे उच्च तांत्रिक ज्ञान असावे असे नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना थोड्याफार तांत्रिक माहितीच्या आधारे दुध व्यवसाय व्यवस्थितपणे चालविणे शक्य होते.

**भारतातील राज्यनिहाय एकूण दूध उत्पादनः**

सन २०१०-११ मध्ये भारतात १,२१,८४८ हजार टन दुधाचे उत्पादन झाले. सर्वात जास्त दूध उत्पादन उत्तर प्रदेश या राज्यात झाले. ते एकूण दूध उत्पादनाच्या १७.२६ टक्के आहे तर सर्वात कमी दूध उत्पादन मिझोरम या राज्यात आहे. ते एकूण दूध उत्पादनाच्या ०.०१ टक्के इतके आहे. सन २०१०-११ मध्ये भारतात उत्तरप्रदेश खालोखाल राजस्थान (१०.८६ टक्के), आंध्रप्रदेश (९.१९ टक्के), पंजाब (७.७३ टक्के), गुजरात (७.६५ टक्के), महाराष्ट्र (६.६० टक्के), मध्यप्रदेश (६.१७ टक्के), तामिळनाडू (५.६१ टक्के), बिहार (५.३५ टक्के), हरियाणा (५.१४ टक्के), कर्नाटक (४.२० टक्के), पश्चिम बंगाल (३.६७ टक्के), केरळ (२.१७ टक्के), ओरिसा (१.३७ टक्के), जम्मू काश्मिर (१.३२ टक्के), झारखंड (१.२८ टक्के), उत्तरांचल (१.१४ टक्के), हिमाचल प्रदेश (०.९० टक्के), छत्तीसगड (०.८४ टक्के) इत्यादी राज्यात दुधाचे उत्पादन केले जाते. तसेच केंद्र संघीय क्षेत्रात म्हणजेच अंदमान निकोबार, चंदीगड, दादरा व नगर हवेली, दमण व दीव, दिल्ली, लक्षद्वीप व पाँडेचरी (०.५० टक्के), त्रिपुरा (०.०९ टक्के), नागालँड (०.०६ टक्के), मेघालय (०.०६ टक्के), मणिपूर (०.०६ टक्के), गोवा (०.०५ टक्के), मिझोरम (०.०१ टक्के) इतके दूध उत्पादन केले जाते.

सहकारी दुग्ध व्यवसायामुळे भारतामध्ये दूधाचे उत्पादन वाढले, दुधाचा प्रतिडोई उपभोग वाढला, दुध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या वाढली. तसेच दूध उत्पादक सहकारी संस्था वाढल्या. भारत सरकारने दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले. उदा. कृत्रिम रेतनाची सोय, पशु आरोग्य सुविधा, संकरित गाईची निर्मिती, दूध शीतकरण व प्रक्रिया केंद्र स्थापन करणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध खरेदीची हमी देणे, दुधाचे संकलन, वाहतुक, वितरण यासाठी गावपातळीवर, तालुका व जिल्हा पातळीवर सहकारी दूध संघ स्थापन झाल्याने दूध संकलनात एकसुत्रीपणा आला आणि त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढले आहे.

**दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र:**

प्रस्तूत प्रकल्प अहवालामध्ये दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र स्पष्ट केले आहे. हा अहवाल फक्त १० गायींसाठीच आहे. अहवालामध्ये ४ वर्षासाठी द.सा.द.शे. १४ टक्के व्याजदराने रु. ९,००,०००/- कर्ज म्हणून गृहीत धरले आहे. उत्पन्न व नफा हा पहिल्या वर्षासाठी आहे. प्रकल्प अहवालामधील किंमती त्या त्या जागेप्रमाणे व स्वतःच्या गुंतवणुकीप्रमाणे बदलू शकतात.

**प्रकल्प खर्च:**

अ) अनावर्ती खर्च - रु.७,१५,०००

गोठा - ३६० चौ. फूट (१,२५,०००) वासरांसाठी गोठा - १२० चौ.फूट (४५,०००), दुधाळ गायी (५,००,०००), कुट्टी यंत्र (२५,०००) किरकोळ साहित्य (२०,०००)

ब) आवर्ती खर्च - रु.४,७६,२००

खाद्य - हिरवी वैरण (रोज १५ कि. /जनावर) (२७,०००), सुकी वैरण (रोज ६ कि. जनावर) (२१,६००), खुराक - रोज ६ कि./जनावर (२,६०,०००), क्षार मिश्रण - रोज ५० ग्रॅम / जनावर (१०,८००), औषधे (१०,०००), विद्युत खर्च - रु. ४०० प्रतिमाह (४,८००), विमा (२०,०००), मजूरी - १ मजूर रु. ६,०००

प्रतिमाह (७२,०००), किरकोळ खर्च (५०,०००).

प्रकल्प उत्पन्न - रु.९,९१,०००

दूध उत्पादन - १० लि./जनावर प्रति दिवस (९,००,०००) वासरे १०- (५०,०००), शेण - ३६ टन (३६,०००), बारदाणा (५,०००)

एकूण उत्पन्न - एकूण आवर्ती खर्च + कर्जाची परतफेड =एकूण नफा

९,९१,००० - ४,४८,८००+२,९५,२००

=२,४७,०००

दूध उद्योगाचे शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन केल्यास पहिल्याच वर्षी दूध उत्पादकाला नफा प्राप्त होईल.

## निष्कर्ष:

दुग्ध व्यवसाय हा शेतीसाठी पुरक व्यवसाय न मानता मुख्य व्यवसाय म्हणून केला पाहिजे. कारण बुहसंख्य दुध उत्पादक शेतकरी असल्याने दुग्ध व्यवसाय शास्त्रीय पध्दतीने केला जात नाही, नियमित नोंदी ठेवल्या जात नसल्याने दूध उत्पादकांना उत्पन्न व खर्चाचा मेळ बसत नाही. म्हणूनच दूध व्यावसायिकांनी अति वेगवान बदलांनुसार बदलणे आवश्यक आहे, कार्यक्षम व्यवस्थापनाचा अवलंब केला पाहिजे, प्रक्रियेमध्ये सुत्रबध्दता, उपलब्ध सोयींचा उत्तम उपयोग आणि उत्पादन खर्चातील बचत ही कुशल व कार्यक्षम व्यवस्थापनाची मुलभूत तत्त्वांचा अवलंब करणे आवश्यक आणि ग्राहकांचे संपूर्ण समाधान ही मुख्य उद्दिष्टे आहेत, व्यवसायातील नोंदी योग्य रितीने ठेवल्याने योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते.

दुग्ध व्यवसाय हा देखील साखर उद्योग, ताग उद्योग, कापड उद्योग या शेतीवर आधारित उद्योगां इतकाच महत्त्वाचा आहे. कारण या दुग्ध व्यवसायात प्रत्यक्षपणे शेतकरीच अवलंबून असतात. कमी भाडंवल व कमी मनुष्यबळाच्या सहाय्याने दुग्ध व्यवसाय यशस्वी करता येऊ शकतो.

## संदर्भ सूची:


१) काटोले रविंद, *आधुनिक दूध व्यवसाय*, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे-९, २०१२.

२) काकडे सचिन, तोरडमल विश्वास, *पशुसंवर्धन पैदास, पोषण व व्यवस्थापन*, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे-९, २०११.

३) निकम तानाजीराव, *दुग्ध व्यवसाय विस्तार*. अजिंक्यतारा पब्लिकेशन्स, २००५.

४) काळे संभाजी व खंदारे विलास, *शेतकऱ्यांच्या आत्महत्या: वास्तव आणि उपाय*, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१२.

५) *अर्थसंवाद*, भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक, अंक १, खंड ३६, एप्रिल-जून २०१२.

६) आवंडकर सुधाकर व बदुकले दिलीप, *दुग्धोत्पादनातील पंचसूत्री*, गायत्री ॲग्रिकल्चर्स पब्लिकेशन्स, जळगाव, २०१२.

# भारतात शेती क्षेत्रात काळा पैसा: एक आव्हान

**नितीन वना जाधव**, अमळनेर,
सहयोगी प्राध्यापक,
व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकिग विभाग प्रमुख,
प्रताप महाविद्यालय, जि.जळगांव
भ्रमणध्वनी : ९९२१४६७४६३

आज भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला काळ्या पैशाच्या समस्येने ग्रासले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात आर्थिक नियोजनात अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. या योजना राबविणाऱ्या नोकरशहांपासून तर राजकीय पुढाऱ्यांपर्यंत सर्वांनी भ्रष्ट मार्गांनी पैसा गिळंकृत केला. त्यामुळे देशांत मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण झाला. याला सर्वसामान्य व्यक्ती सुध्दा अपवाद नाहीत. तेही करचुकवेगिरीच्या माध्यमातून काळा पैसा निर्मितीच्या प्रक्रियेला हातभार लावत आहेत. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राप्रमाणेच अमेरिका, रशिया, जर्मनी, इंग्लंड यासारख्या विकसित राष्ट्रात सुध्दा मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण झाला आहे. स्विस बँक व फ्रान्स बँका ही काळा पैसा सांभाळणारी जागतिक केंद्रे मानली जातात. देशी बँका सुध्दा कायद्यातील पळवाटांच्या माध्यमातून काळा पैसा निर्माण करण्यास मदत करतात.

काळ्या पैशाच्या समस्येने संपूर्ण जग आज चिंतीत आहे. त्यामुळे काळ्या पैशाच्या विरोधात जागतिक पातळीवर मोहीम सुरु झाल्याने काळ्या पैशाला आश्रय देणाऱ्या स्विस बँकेसारख्या जागतिक बँकांचे धाबे दणाणले. त्यांनी जागतिक दबावापुढे शरणागती पत्करली आणि आपल्याकडे काळा पैसा जमविणाऱ्यांची नावे जाहीर करण्याचे मान्य केले. परिणामी अशा बँकांमधील काळा पैसा अन्यत्र वळविण्याचे प्रयत्न जगभर सुरु झाले.

अलिकडे भारतीय लोकांनी विदेशी बँकांमध्ये ठेवलेला काळा पैसा भारतात परत आणून तो रिअल इस्टेटमध्ये गुंतविण्यास सुरुवात केली आहे. फ्लॅटस्, घरे, प्लॉटस्, शेती यांसारख्या वास्तव मालमत्तेत काळा पैसा गुंतविला जात आहे. भारतात बहुसंख्य काळा पैसा शेतीत गुंतविला गेला त्यामुळे

शेतीच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली. शेतीत एक नवश्रीमंत शेतकरी वर्ग तयार झाला. काळा पैसा शेतीत गुंतवून शेतीशी काहीच संबंध नसलेल्या नवश्रीमंत शेतकरी वर्गाने भारतातील शेती क्षेत्रच नव्हे तर संपूर्ण अर्थव्यवस्थेपुढे एक आव्हान निर्माण केले आहे.

**काळा पैसा म्हणजे काय ?**

पांढरा पैसा (White Money) आणि काळा पैसा (Black Money) अशी पैशाची दोन प्रकारात विभागणी केली जाते. व्यक्ती किंवा संस्थेला आपल्या उत्पन्नातून योग्य तो कर दिल्यानंतर मिळणारा पैसा हा पांढरा/गोरा पैसा होय. तर करचूकवेगिरीच्या माध्यमातून आपले उत्पन्न कमी दाखवून भ्रष्ट व अवैध मार्गाने मिळविलेला पैसा काळा पैसा म्हणून ओळखला जातो. याला आपल्या व्यवहारी भाषेत नंबर दोनचा पैसा असे म्हणतात. थोडक्यात-करचुकवेगिरी, भ्रष्ट व अवैध व्यवहारातून मिळविलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय.

**काळ्यापैशाची निर्मिती:**

जागतिक पातळीवर काळ्या पैशाची निर्मिती खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुध्दाच्या काळात झाली. युध्दावर गेलेल्या सैनिकांनी आपला पैसा स्विस बँकेत जमा केला. आपला स्विस बँकेत पैसा असल्यामुळे सैनिकांनी स्वित्झर्लंडवर आक्रमण करणे टाळले. युध्दात मारल्या गेलेल्या सैनिकांचा पैसा स्विस बँकेत राहिल्याने तो त्या बँकेलाच मिळाला. दुसऱ्या महायुध्दातुन स्वतंत्र झालेल्या अनेक देशांमधील भ्रष्ट नोकरशहा व राजकारणी पुढाऱ्यांनी करचुकवेगिरी अवैध व भ्रष्ट मार्गाने मिळविलेला पैसा स्विस बँकेत जमा केला. आपल्या बँक व्यवहारात स्विस बँका कमालीच्या गुप्तता पाळत असल्याने जगभरातील काळा पैसा जमविणारे लोक आपल्या जवळील काळा पैसा लपविण्यासाठी स्विस बँकांचा आश्रय घेऊ लागले. विशेष म्हणजे स्विस बँका या पैशावर मुळीच व्याज देत नाहीत. केवळ आपल्या व्यवहाराबाबत कमालीची गुप्तता पाळतात म्हणून जगभरातील काळा पैसा जमविणारे लोक काळा पैसा लपविण्यासाठी स्विस बँकांना प्राधान्य देतात. हा काळा पैसा स्विस बँकांनी आपल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून त्याच देशांमध्ये गुंतविण्यास सुरुवात केली यातून त्या कमालीच्या श्रीमंत बनल्या. म्हणून आज काळा पैसा म्हणजे स्विस बँक असे समीकरणच तयार झाले आहे. देशी बँका कायद्यांतील पळवाटा शोधून देशांतच काळ्या पैशाला आश्रय देतात.

भारतातही काळा पैसा निर्मितीची प्रक्रिया दुसऱ्या महायुध्दानंतरच सुरु झाली. देशात दुसऱ्या महायुध्दाच्या काळात वस्तुंचे भाव वाढले, व्यापारी लोक वस्तुंची कृत्रीम टंचाई निर्माण करु लागले. यातून व्यापारी वर्गाने मोठ्या प्रमाणात काळा पैसा जमविला. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्विकारलेले आर्थिक नियोजन समाजवादी समाजरचनेचा स्वीकार, कल्याणकारी राज्याची संकल्पना, जलद आर्थिक विकासाचे ध्येय यामुळे देशात विकास योजनांसाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करण्यात आला, जनतेच्या प्रतिनिधींनी नोकरशहांना हाताशी घेऊन विकास कामातील प्रचंड पैसा गिळंकृत केला. स्वातंत्र्योत्तर काळात

प्रत्यक्ष कर यंत्रणा कठोरपणे राबविण्यात आली. आयकराचे दर अतिरिक्तपणे आकारण्यात आले. यामुळे करचुकवेगिरी वाढत गेली यातून सर्वसामान्य लोक सुध्दा काळा पैसा निर्मितीला हातभार लावू लागले. व्यापारी वर्गाने सरकारकडून अनेक सवलती घेतल्या मात्र गैरमार्गाचा अवलंब करुन त्यांनी पध्दतशीरपणे कर चुकविला. थोडक्यात भारतात सर्वसामान्यांपासून ते उद्योजक, व्यापारी नोकरशहा व भ्रष्ट राजकारण्यांनी कमी अधिक प्रमाणांत काळा पैसा निर्मितीच्या प्रक्रियेला हातभार लावला. हा पैसा देशी बँका, स्विस बँक व फ्रान्स बँक यासारख्या विदेशी बँकांकडे जमा झाला. भारतात पांढऱ्या पैशाला समांतर अशी काळ्या पैशाची अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. थोडक्यात, काळा पैसा ही भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेली महाभयंकर कीड होय.

### भारतातील काळ्यापैशाविषयी अंदाज:

काळापैसा हा अनधिकृत मार्गांनी मिळविलेला पैसा असतो. त्यामूळे तो पांढऱ्या पैशाप्रमाणे दिसत नसल्याने त्याविषयी केवळ अंदाज बांधावे लागतात. याबाबत अनेक तज्ञ व्यक्ती व संस्थांनी आपल्या अहवालातून भारतातील काळ्या पैशाचे अंदाज वर्तविले आहेत. भारतातील काळ्या पैशाचा अंदाज घेण्यासाठी सरकारने वेळोवेळी अभ्यासगट नेमले होते. त्यामध्ये डॉ.एस.आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली १९८५ मध्ये नेमलेली *नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलीसी* (NIPFP) महत्त्वाची आहे या समितीच्या मते १९७५-७६ मध्ये देशाच्या एकूण उत्पन्नाच्या १५ ते १८% व १९८३-८४ मध्ये १९ ते २१% काळा पैसा होता. २००७ मध्ये स्विस बँक असोसिएशनच्या २००६ च्या रिपोर्टप्रमाणे स्विस बँकेत कोणत्याही देशातील नागरिकांपेक्षा भारतीयांचा पैसा जास्त (१४५६ अब्ज डॉलर्स म्हणजे ७२ लाख ८० कोटी रु.) एवढा काळा पैसा परदेशात नेण्यात आला ही बाब *ग्लोबल फिनान्शिअल इंटेग्रीटी* (GFI) या संस्थेने प्रसिध्द केली. या संस्थेच्या मते चालू दशकात १२३ अब्ज डॉलर एवढा काळा पैसा भारताबाहेर गेला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या सर्वेक्षणानुसार भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५०% एवढा काळा पैसा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

विश्व संपत्ती अहवाल २०१३ नुसार जगातील अतिश्रीमंत व्यक्तींची संख्या - १.२ कोटी झाली आहे. या लोकांच्या ताब्यात ४६,२०० अब्ज डॉलर्सची संपत्ती एकवटली आहे. अतिश्रीमंत व्यक्तींबाबत भारताने जगात दुसरे स्थान पटकावले आहे. भारतात अतिश्रीमंतांच्या संख्येत २२.२% नी वाढ झाली. ही वाढ भारतात अवैध मार्गाने काळा पैसा जमविण्याचे द्योतक होय. भारतासारख्या गरीब देशांत एकीकडे दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे मोठे प्रमाण असतांना दुसरीकडे अतिश्रीमंतांची संख्या वाढणे हे देशांतील आर्थिक विषमता व काळ्या पैशाचे प्रमाणच स्पष्ट करते. स्विस बँकेत भारतीयांचा सर्वात अधिक काळा पैसा आहे. ती जगभरातील काळा पैसा सांभाळणारी सर्वात भक्कम बँक होय, असा आरोप केला जातो. या पैशाच्या बळावर जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला

आपल्या तालावर नाचविण्याची ताकद स्विस बँकेत आहे.

### काळापैसा विरोधात मोहीम:

आज प्रत्येक देशांत कमी अधिक प्रमाणात काळा पैसा असून जगातील जवळ जवळ सर्वच देशात काळा पैसा निर्मितीची प्रक्रिया गतिमान झाली आहे. काळ्या पैशाच्या पांढऱ्या पैशाला समांतर अर्थव्यवस्थाच निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काळयापैशाच्या विरोधात आज प्रत्येक देशात जनमत तयार झाले आणि काळ्यापैशाच्या विरोधात जगभरातून मोहीम सुरु झाली. अमेरिका, जर्मनी, ब्रिटन यांसारख्या बलाढ्य राष्ट्रांचा काळा पैसा सांभाळणाऱ्या स्विस बँक व फ्रान्स बँकेसारख्या विदेशी बँकांवरील दबाव वाढत गेला. २००८ साली जर्मन सरकारने स्विस बँकेच्या एका निवृत्त अधिकाऱ्याला लाच देऊन एका सी.डी.द्वारे बँकेतील गुप्त खात्यांची माहिती मिळविली. तेथून स्विस बँकेतील काळा पैसा जगभर चर्चेचा विषय बनला आणि जगभरातील अनेक देशांच्या नजरा स्विस बँकेकडे वळल्या. जगभरातून स्विस बँकेवर दबाव वाढत गेला. स्विस बँकेने आपल्या बँक व्यवहारातील कमालीची गुप्तता असणाऱ्या कायद्यात दुरुस्ती करुन आपल्याकडे जगभरातील काळा पैसा असणाऱ्या खातेदारांची नावे जाहीर करण्याचे घोषीत केले. त्यामुळे जगभरातून स्विस बँकेकडे जाणाऱ्या काळ्या पैशाने आपला मार्ग बदलला हा काळा पैसा स्विस बँकेकडे न जाता कॅरेबियन देश, पनामा आणि सिंगापूरकडे जाऊ लागला. मात्र या देशांमध्ये फारशी पारदर्शकता नाही. तेथील कायदेही कडक नाहीत. त्यामुळे काळ्या पैशाने पुन्हा आपला मार्ग बदलविला असून सध्या काळा पैसा मोठ्या प्रमाणात रिअल इस्टेट (वास्तव मालमत्तेत) गुंतविला जात आहे.

### वास्तव मालमत्तेत काळा पैसा:

जगभर काळ्या पैशाबाबत जागरुकता निर्माण झाल्याने दररोज काळा पैसा लपविण्याचे नवनविन मार्ग शोधले जात आहेत. भारतात अण्णा हजारे व रामदेव बाबा यांनी काळ्या पैशाच्या विरोधात आंदोलन उभे केले. इतर काही संघटनांनी जनजागृती घडवून आणली. यामुळे भारतात काळ्या पैशाबाबत सजगता निर्माण झाली. स्विस बँक व इतर विदेशी बँकांनी काळ्या पैशाला आश्रय देण्याचे प्रमाण कमी केले. भारतात देशी बँकांबाबत सुध्दा कडक निर्बंध लादल्याने रिअल इस्टेट (वास्तव मालमत्तेत)काळा पैसा गुंतविला जात आहे. फ्लॅटस्, घरे, प्लॉट व शेत जमिन यांसारख्या रिअल इस्टेटमध्ये भारतात मोठ्या प्रमाणात काळा पैसा गुंतविला जात आहे. गुजरात, बंगलोर येथे अति उच्चभ्रू वस्त्यांमध्ये करोडो रुपये किंमतीच्या फ्लॅटस मध्ये आज काळा पैसा गुंतविला जात आहे. त्यामुळे या वास्तव मालमत्तेच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाली.

### शेतीत काळ्या पैशाची गुंतवणूक:

शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख क्षेत्र असून बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. एवढेच नव्हे तर भारतीय लोकांना शेतीचे कमालीचे आकर्षण आहे. म्हणून भारतात शेतीच्या किंमती कधीच कमी होत नाहीत. आज काळापैसा लपविणाऱ्यांनी शेतजमिनी खरेदीचा सपाटा लावला आहे. शेतीशी कोणतेच नातेसंबंध

नसलेला हा शेती खरेदी करणारा नवश्रीमंत वर्ग निर्माण झाला. केवळ गुंतवणूकीचे सुरक्षित क्षेत्र म्हणून हा वर्ग आपल्या जवळील काळा पैसा शेतीत गुंतवित आहे.

भारतात शेतीचे उत्पन्न करमुक्त आहे. काळापैसा शेतीत गुंतविणारा हा नवश्रीमंत शेतकरी वर्ग आपल्या शेतीचे उत्पन्न वारेमाप दाखवितो आणि आपल्याजवळील काळा पैसा सातत्याने पांढरा करतो. आज भारतीय शेती व्यवसाय काळा पैसा पांढरा करण्याचा उद्योग व्यवसाय बनला आहे. भारतात शेती व शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक कल्याणकारी योजना शासनाकडून राबविल्या जातात. त्यांचा फार मोठ्या प्रमाणात फायदा या नवश्रीमंत शेतकरी वर्गाने उचलला आहे.

आज भारतीय शेतीत दोन टोकांचा शेतकरी वर्ग स्पष्टपणे दिसुन येतो. एकीकडे शेती कसणे परवडत नाही, कर्जाचा बोझा असह्य झाल्याने अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तर दुसऱ्या बाजुला शेतीत काळा पैसा गुंतविणारा हा नवश्रीमंत शेतकरी वर्ग शेती न करता पडीत ठेवत आहे. याउलट आपल्याला शेतीत वारेमाप उत्पन्न मिळाले असे शासनाला दाखवितो आणि प्रत्येक वर्षी आपल्या जवळील काळा पैसा पांढरा करीत असतो असे हे शेतीचे वास्तव चित्र असून ते शेती व्यवसायाला अतिशय घातक ठरणार आहे.

**काळ्यापैशाचे शेतीवर होणारे दुष्परिणाम:**

देशांत काळापैशाची माया जमविणाऱ्यांनी शेतजमिनी खरेदी करुन त्यात काळा पैसा गुंतविला याचे प्रत्यक्ष जमिन कसणारा मुळ शेतकरी वर्ग, शेती क्षेत्र व संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दु:परिणाम झाले आहेत. यातील काही प्रमुख परिणाम खालीलप्रमाणे:

**१)शेती जमिनीच्या किंमतीत प्रचंड वाढ-**

काळा पैसा लपविणाऱ्यांनी शेती खरेदी करुन त्यात काळा पैसा गुंतविल्यामुळे शेतजमिनीच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे ही वाढ ५ ते ५० पटीपेक्षाही अधिक असल्याचे दिसून येते.

**२)शेतजमीन विकत घेणे अशक्य -**

आज प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला शेतजमीन विकत घेणे शक्यच नाही. कारण काळा ' ा शेतीत आल्याने शेत जमिनीच्या किंमतीत प्र ंड वाढ झालेली आहे. याउलट कर्जबाजारीपणामुळे मूळ शेतकरी वर्ग आपल्या शेतजमिनी विकत आहेत म्हणजे खरा शेतकरी आपल्या शेतीपासून लांब जात आहे.

**३)नवश्रीमंत शेतकरी वर्गाची निर्मिती -**

शेती व्यवसायाशी ज्यांचा काडीमात्र संबंध नाही, अशा शेतीत काळा पैसा गुंतविणारा एक नवश्रीमंत शेतकरी वर्ग ग्रामीण भागात निर्माण झाला. पूर्वीच्या जमिनदारांसारखे या वर्गाचे अस्तित्व आज जाणवते.

**४)काळा पैसा पांढरा करण्यासाठी शेतीचा वापर-**

हा नवश्रीमंत शेतकरी वर्ग शेती न कसता सुध्दा शेतीत वारेमाप उत्पन्न मिळाल्याचे सरकारला कागदोपत्री दाखवितो आणि प्रत्येक वर्षी आपल्याजवळ असणारा काळा पैसा पांढरा करतो. त्यामुळे या वर्गाचा शेती क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन काळा पैसा शेतीत सुरक्षीतपणे लपविण्याबरोबरच काळा पैसा सतत पांढरा करत राहणे हा देखील आहे.

५)शेतजमिनी पडीत ठेवण्याची प्रवृत्ती-

आज शेती कसणे मुळ शेतकऱ्याला सुध्दा परवडत नाही. त्यामुळे भारतात रोज अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु आहे. या नवश्रीमंत शेतकऱ्याला तर ते मुळीच परवडणारे नाही. त्यामुळे हे नवश्रीमंत शेतकरी शेती न कसता पडीत ठेवत आहेत. यामुळे आपल्या शेती व्यवसायाला व संपूर्ण अर्थव्यवस्थेला हानी पोहचत आहे.

६)शेती उत्पादनात घट-

या नवश्रीमंत शेतकरी वर्गामध्ये शेतजमिनी पडित ठेवण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याने शेती उत्पादनात सारखी घट होत आहे हे केवळ शेती व्यवसायाला नव्हे तर संपूर्ण अर्थव्यवस्थेला मारक ठरणार आहे.

७)शासनाच्या योजनांची गंगा नवश्रीमंत शेतकऱ्यांच्या घरात-

सरकारने शेती व शेतकऱ्यांसाठी आर्थिक विकासाच्या अनेक नवनवीन योजना सुरु केल्या आहेत. या योजनांमुळे शेतकऱ्यांना अनेक आर्थिक व आर्थिकेतर लाभ होतात या लाभांची गंगा मूळ शेतकऱ्यांऐवजी नवश्रीमंत शेतकऱ्यांच्या घरातच जाते. या योजना राबविण्याचा शासनाचा मूळ हेतूच निष्फळ होतो.

८)उद्योग क्षेत्रावरही विपरीत परिणाम-

शेतीचे उत्पादन वाढविण्याऐवजी घटत आहे. यामुळे भारतातील उद्योगक्षेत्राला वेळेवर कच्च्या मालाचा पुरवठा होत नाही शेती क्षेत्रातील या अनिश्चिततेचा फटका भारतातील कृषीप्रधान उद्योगांनाही बसला आहे.

९)निर्यातीत घट- भारताच्या निर्यातीत शेतीविषयक वस्तुंचाच वाटा मोठा आहे. या नवश्रीमंत वर्गाच्या बेफिकीर वृत्तीमुळे शेतीचे उत्पन्न घटल्याने त्याचा विपरीत परिणाम निर्यातीवरही झाला व भारताची निर्यात घटत गेली.

काळ्या पैशाचा शेती क्षेत्रात प्रवेश झाल्याने त्याचे शेती व्यवसायावर व संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दुरगामी परिणाम होत आहे.

उपाययोजना:

भारतात काळ्या पैशाचे शेती क्षेत्रात झालेले अतिक्रमण व त्यांचे "संपूर्ण अर्थव्यवस्थेवरील दुष्परिणाम थांबविण्यासाठी उपाय सुचविता येतील.

१) भारतातील शेतीविषयक कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
२) मूळ शेतकरी असल्याशिवाय शेती खरेदीस परवानगी देण्यात येऊ नये.
३) शेती खरेदी करतांना पॅनकार्डाची सक्ती करण्यात यावी.
४) शेती खरेदी व शेतीच्या धारण क्षेत्रावर कमाल मर्यादा घालण्यात यावी.
५) शेती खरेदी करणाऱ्याने स्वतः शेती कसलीच पाहिजे अशी सक्ती करण्यात यावी.
६) दोन वर्षापेक्षा अधिक काळ जमिन पडित ठेवल्यास ती शेतजमिन सरकारजमा करण्यात यावी.
७) भारतातील कर रचनेत योग्य त्या सुधारणा करुन कररचना अद्ययावत करण्यात यावी.
८) विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक शेतजमिन

धारण करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कर आकारण्यात यावा.

९) शासनाच्या विभिन्न शेतीविषयक योजनांचा लाभ या नवश्रीमंत शेतकऱ्यांऐवजी गरजू शेतकऱ्यांकडे कसा जाईल याची शासकीय पातळीवर काळजी घेण्यात यावी.

## निष्कर्ष:

१) भारतात मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण झाला आहे.

२) काळया पैशाच्या निर्मितीत सर्वसामान्यांपासून तर राजकारण्यांपर्यंत सर्वच हातभार लावत आहेत.

३) भारतीयांच्या काळ्या पैश्याला विदेशी बँकांबरोबरच देशी बँकांनी सुध्दा आश्रय दिला आहे.

४) भारताप्रमाणेच संपूर्ण जगभर काळा पैसा निर्मितीची प्रक्रिया गतिमान झाल्याने काळ्या पैशाच्या विरोधात जगभर मोहीम सुरु झाली.

५) देशी व विदेशी बँकांनी काळ्या पैशाला आश्रय देणे कमी केल्याने काळा पैसा वास्तव मालमत्तेत गुंतविला जात आहे.

६) भारतात प्रामुख्याने शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणांत काळ्या पैशाची गुंतवणुक झाल्याने भारतातील शेती व्यवसाय, प्रत्यक्ष जमिन कसणारा शेतकरी व संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम घडून येत आहेत.

## संदर्भ सूची:


१) Agrawal A.N. - Indian Economy - *Problem of development of planning* Wishwa Prakashan & Division of New Age International (P) Limited Publisher New Delhi - 1990.

२) Ingale B.D. - *Impact of Black money on Indian Economy*, Global Economic Research - 2012.

३) R.Datta, K.P.M. Sundaram 2011 - Indian Economy

४) Girish Sharma - *Black Money and its disastrous influence of Indian Economy.*

५) Mishra & Puri - Indian Economy

६) डॉ.लिला पाटील, *भारतीय अर्थव्यवस्था*, फडके प्रकाशन, कोल्हापूर

७) देसाई - भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था*, निराली प्रकाशन (२००६) पुणे

८) र.पु.कुरुळकर (१९९३) *भारतीय अर्थव्यवस्था*, विद्या प्रकाशन, नागपूर

९) दैनिक वर्तमानपत्र, अर्थसंवाद, योजना, प्रतियोगिता दर्पन

१०)डॉ.वामन पाटील व बालाजी घुटे - *काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम*, मैत्री प्रकाशन, लातुर

११) इंटरनेट.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा !

### जानेवारी-मार्च २०१४ अंकासाठी त्वरित लेख पाठवा

*सारं जगच पैशामागं धावतयं..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातयं... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं... तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा.
- PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# वित्तीय समावेशन: प्रगती व आव्हाने

निरगुडे आय. ए., श्रीरामपूर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आर.बी.एन.बी.कॉलेज, जि.अहमदनगर
भ्रमणध्वनी: ८८८८६५०२१७.

भारतात दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सहा दशकात दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी विकासाचे धोरण आखले गेले; दारिद्र्य कमी करण्यासाठी व रोजगारात वाढ करण्यासाठी अनेक योजना कार्यरत आहेत. दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने या योजनांना महत्त्व आहेच. अशाही स्थितीत भारताने नेत्रदिपक प्रगती केली आहे.

अलिकडे भारतात सर्वसमावेशक वृध्दीच्या उद्दिष्टाला अधिक महत्त्व दिले जात आहे. विशेषत: ११ व्या पंचवार्षिक योजनेत या उद्दिष्टाला महत्त्व दिले गेले. सर्व समावेशक किंवा समावेशी वृध्दी (Inclusive growth) म्हणजे सर्वांना सामावून घेणारी वृध्दी होय. दारिद्र्य रेषेखालील लोक विशेषत: अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्याक यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यासाठी आर्थिक वृध्दी त्यांच्यापर्यंत पोहोचणे होय. परंतु हे उद्दिष्ट वित्तीय समावेशनाशिवाय अपूर्ण आहे. म्हणून अलिकडे रिझर्व्ह बँक व सरकार वित्तीय समावेशनाला सर्वाधिक महत्त्व देत असल्याचे दिसून येते. भारतात वित्तीय समावेशनाकडे एक चळवळ म्हणून पाहिले जाते. त्यादृष्टीने अलिकडे प्रत्येक व्यक्तीचे बँकेत खाते असणे व त्याला बँकेच्या सुविधा मिळणे हा मुलभूत हक्क समजला जात आहे. म्हणून सर्वसामान्य माणसांपर्यंत संघटित वित्तीय सेवा पुरविण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. यासाठी जेथे बँकांच्या सुविधा नाहीत अशा ठिकाणी संघटित बँकांच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे.

**वित्तीय समावेशन** (Financial Inclusion)

देशातील कमी उत्पन्न गटातील लोक व दुर्बल घटक यांना वेळेवर, वाजवी किंमतीत आणि पुरेशा प्रमाणात बँकेच्या सेवा उपलब्ध करुन देणे म्हणजे वित्तीय समावेशन होय.

वित्तीय समावेशन ही एक अशी प्रक्रिया आहे जी समाजातील सर्व घटकांना व विशेषत: कमकुवत वर्गातील व कमी उत्पन्न गटातील लोकांना वित्तीय सेवा वाजवी किंमतीला पुरेशा प्रमाणात आणि पारदर्शक पध्दतीने उपलब्ध करुन देते.

वित्तीय समावेशनात इतरही अनेक सेवांचा समावेश होतो. जसे बचत, गुंतवणूक, विमा, पैसे जमा करण्याबरोबरच पैसे एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी पाठविणे, पतसुविधा इ. सेवा वित्तीय प्रणालीमार्फत उपलब्ध करुन देणे होय.

### वित्तीय समावेशनाचे महत्त्व:

भारतासारख्या विकसनशील देशात बँका या बचत गोळा करणे आणि उत्पादक व गुंतवणुकीसाठी कर्ज पुरवठा करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. एक मध्यस्थ संस्था म्हणून बँका देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. देशातील बँकांकडे समाजात संपत्तीचे पुनर्वाटप करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी क्षमता आहे. परंतु देशात अनेक लोक असे आहेत की जे बँकांच्या सेवेचा उपयोग करुन घेत नाहीत. समाजातील दुर्लक्षित लोकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने निश्चितपणे काही प्रयत्न केले आहेत. जसे भारतात सहकारी चळवळ सुरु केली आहे. तसेच व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. शिवाय प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना केली आहे. परंतु सर्व लोकांपर्यंत व विशेषत: ग्रामीण भागातील सर्व लोकांपर्यंत बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात मात्र जेवढे म्हणावे तेवढे यश आलेले नाही, म्हणून अलिकडे वित्तीय समावेशनाला अधिक महत्त्व दिले जात आहे.

१) भारतासारख्या विकासाकडे वाटचाल करणाऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेत वित्तीय समावेशनाला विशेष महत्त्व आहे. अर्थव्यवस्थेतील मोठा गट साधारण वित्तीय व्यवस्थेत समाविष्ट करण्यासाठी याला महत्त्व आहे. विशेषत: पहिल्या टप्प्यात सर्व लोकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने वित्तीय समावेशनाला महत्त्व आहे. शिवाय बँकिंग सेवा या समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक असतात.

२) वित्तीय सेवा कमी अंतरावर पाहिजे त्यावेळी व वाजवी दरात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने वित्तीय समावेशानाला विशेष महत्त्व आहे.

३) वित्तीय समावेशनाचा गुणकासारखा परीणाम अर्थव्यवस्थेवर होईल. कारण साधारण बचतीच्या सुविधा तळातील मोठ्या गटाला उपलब्ध झाल्या तर गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल.

४) तळातील मोठ्या गटाला वित्तीय प्रणालीमार्फत वित्तीय सेवा उपलब्ध करुन दिल्या तर त्यांना बचतीची सवय लागेल तसेच त्यांच्या वित्तीय स्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल. त्यामूळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होईल.

५) वित्तीय समावेशन सरकारच्या दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे. कारण कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाची रक्कम लक्ष्य गटापर्यंत वित्तीय प्रणालीमार्फत पोहोचविता येईल.

६) वित्तीय समावेशन रिझर्व्ह बँकेच्या दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे. कारण अर्थव्यवस्थेतील अधिकाधिक घटक वित्तीय प्रणालीत सहभागी झाले, तर चलनविषयक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे शक्य होईल.

७) पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविण्याच्या दृष्टीने देखील वित्तीय समावेशनाला महत्त्व आहे. जर बँकेच्या सुविधा उपलब्ध झाल्या तर पैसे कमी खर्चात व कमी वेळेत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविता येतील. बँकेच्या सुविधा नसतील तर मात्र अधिक खर्चीक मार्गांचा अवलंब पैसे पाठविण्यासाठी करावा लागेल.

८) ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना वाजवी व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने देखील वित्तीय समावेशनाला महत्त्व आहे. बँकेच्या सुविधा उपलब्ध नसतील तर या भागातील लोकांना सावकारांकडून जास्त व्याजदराने व प्रतीकुल अटीवर कर्ज घ्यावे लागेल. परिणामी त्यांची पिळवणूक होईल.

९) वेळेवर पुरेशा प्रमाणात व पारदर्शक पध्दतीने बँक व्यवसायामार्फत कर्जपुरवठा जर उपलब्ध झाला तर उद्योजकता वाढीस लागण्यास मदत होईल. त्यामुळे उत्पादकता व समृध्दी यात वाढ होण्यास मदत होईल.

### वित्तीय समावेशनाची प्रगती:

वित्तीय समावेशनाच्या प्रगतीसाठी रिझर्व्ह बँकेने अनेक पावले उचलली आहेत. त्यात मार्गदर्शन, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे इत्यादी. वित्तीय समावेशनाच्या प्रगतीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) *ग्रामीण भागात व बँक सुविधा नसलेल्या ठिकाणी बँकांच्या शाखा:* अलीकडील काही वर्षात रिझर्व्ह बँक वित्तीय समावेशनाला सर्वाधिक प्राधान्य देत आहे. यासाठी रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात व बँक सुविधा नसलेल्या ठिकाणी बँकेच्या शाखा उघडाव्यात यासाठी प्रोत्साहित करते. २००९-१० मध्ये देशातील व्यापारी बँकांनी २८१ शाखा अशा ठिकाणी उघडल्या ज्या ठिकाणी बँकेची सुविधा नव्हती. २०१०-११ मध्ये ही संख्या ४७० इतकी होती.

जनगणना अहवालानुसार २००१ मध्ये देशातील लोकसंख्येपैकी ३५% लोकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध होत्या. २०११ मध्ये हे प्रमाण ५९% इतके झाले. एकूणच अधिकाधिक लोकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे २००१ मध्ये दर बँक शाखेमागे १५६०० लोकसंख्या असे

प्रमाण होते ते २०१२ मध्ये १२५०० इतके झाले आहे.

२) *के.वाय.सी. बाबत सवलत* - बँकेत खाते उघडतांना ग्राहकांना केवायसी ची पुर्तता करावी लागते. अलिकडे लहान खातेदारांसाठी सवलत देण्यात आली आहे. खाते उघडण्यासाठी जॉब कार्डस किंवा आधार कार्ड असेल तर ते ग्राह्य धरण्यात येते. लहान खातेदारांसाठी खाते उघडण्याची पध्दती सोपी व सुटसुटीत करण्यात आली आहे. परिणामी अधिक लोक बँकेत खाते उघडून बँक सुविधांचा फायदा घेऊ लागले आहेत.

गरीब व्यक्तींना कोणतीही रक्कम न भरता किंवा नाममात्र रक्कम भरुन बँकेत खाते उघडता येते. देशातील सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका आणि परकीय बँकांना अशाप्रकारचे खाते उघडण्यास सांगण्यात आले आहे.

३) *लघुवित्त, स्वयं सहाय्यता बचत गट व बँका*- लघुवित ही अलिकडील एक महत्त्वपूर्ण प्रगती मानली जाते. स्वयं सहाय्यता बचत गट व बँका यांच्यात एक दुवा निर्माण करण्यात आला आहे. त्याद्वारे लघुवित्त उपलब्ध करुन दिले जाते. याची अंमलबजावणी विभागीय ग्रामीण बँका (RRB's) आणि सहकारी बँका यांच्यामार्फत केली जाते.

४) *अति लहान शाखा* - ग्रामीण व अति दुर्गम भागात बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ही व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. अगदी १००-२०० चौ. फूट जागेत ही शाखा काम करते. निर्धारित दिवशी नियुक्त अधिकारी लॅपटॉप घेवून जातो व बँकेच्या सेवा उपलब्ध करुन देतो. जवळपास ४०,००० इतक्या अती लहान शाखा देशात उघडण्यात आल्या आहेत.

५) *वित्तीय साक्षरता* - वित्तीय समावेशनासाठी वित्तीय साक्षरता ही महत्त्वाची व आवश्यक आह. जे लोक बँकिंग सुविधेपासून वंचीत आहेत त्यांना योग्य ते वित्तीय प्रशिक्षण दिल्यास ते बँकेत खाते उघडून आपले आर्थिक व्यवहार करु शकतील. बचतीचा योग्य विनीयोग करण्याच्या दृष्टीने वित्तीय साक्षरता अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकते. वित्तीय साक्षरतेते वाढ घडवून आणण्यासाठी रिझर्व्ह बँक अनेक उपक्रम राबवित असल्याचे दिसून येते. वित्तीय समावेशन व वित्तीय साक्षरता हे दोन आधारस्तंभ आहेत किंवा परस्पर पूरक आहेत असे म्हणता येईल. त्यातील वित्तीय समावेशन हे पुरवठ्याच्या बाजूने कार्य करते तर वित्तीय साक्षरता मागणीच्या बाजूने कार्य करते. जी वित्तीय साधनांसाठी व सेवांसाठी मागणी निर्माण करते.

६) *अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा* - वित्तीय समावेशनाचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँक अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याबाबत आग्रही दिसते. अग्रक्रम क्षेत्राला बँकांनी ४०% कर्जपुरवठा करावयाचा आहे.

अग्रक्रम क्षेत्रात शेती, लघु उद्योग, किरकोळ व्यापार लघुवित्त, शिक्षण आणि गृहवित्त इत्यादींचा समावेश होतो.

७) बँकिंग सेवा उपलब्धतेच्या बाबतीत असणारी प्रादेशिक असमानता दुर करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासाठी रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना असा सल्ला देते की, जेव्हा ते वार्षिक शाखा विस्ताराचे नियोजन करतील तेव्हा कमीत कमी २५% शाखा ग्रामीण भागातील बँक नसलेल्या ठिकाणी शाखा उघडण्याचे नियोजन करावे.

८) ए.टी.एम. द्वारे देखील बँकेच्या सेवा उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे. त्यामूळे ए.टी.एम. ची संख्या वाढविण्यावर भर दिला जात आहे. परिणामी २००९-१० मध्ये दर ए.टी.एम. मागे १९७०० लोक असे जे प्रमाण होते ते २०१०-११ मध्ये १६२४३ पर्यंत कमी झाले.

९) वित्तीय समावेशनासाठी इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड यांचा वापर वाढविण्यावर भर दिला जात आहे.

वित्तीय समावेशनाचे मापन वित्तीय समावेशन निर्देशांकाद्वारे केले जाते. यात एकूण लोकसंख्येपैकी किती लोकांचे बँकेत खाते आहेत. याचे प्रमाण विचारात घेतले जाते. तसेच बँकेच्या सेवांची उपलब्धता विचारात घेतली जाते. शिवाय लोक बँकेच्या सेवांचा किती उपयोग करतात हेही विचारात घेतले जाते. त्याचप्रमाणे ठेवी, कर्जपुरवठा देखील विचारात घेतला जातो.

वित्तीय समावेशन निर्देशांकाच्या मूल्यानुसार भारतातील राज्यांचे वर्गीकरण तीन गटात केले जाते ते म्हणजे उच्च, मध्यम व कमी असे होय. पाहणी अहवालानुसार उच्च गटातील केरळ, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात वित्तीय समावेशन दिसून येते. मध्यम गटात तामिळनाडू, पंजाब, आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश, सिक्किम, हरियाना या राज्यांचा समावेश होतो. अतिशय कमी वित्तिय समावेशन ईशान्य आणि पूर्वेकडील राज्यात दिसून येते. यात आसाम, नागालँड, मनिपूर, हरियाणा, ओरिसा, बिहार, प. बंगाल, गुजरात, उत्तर प्रदेश, त्रिपुरा, राजस्थान, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मध्य प्रदेश, मेघालय इत्यादी राज्यांचा समावेश होतो. वित्तीय समावेशनाच्या मापनाच्या आधारे वित्तीय समावेशनात झालेली प्रगती पुढील पानावर तक्ता क्र.१ मध्ये दर्शविली आहे.

जानेवारी २००६ मध्ये रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मध्यस्थांची किंवा सहाय्यकांची मदत घेण्याची परवानगी दिली आहे. अलिकडे प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण याला महत्त्व प्राप्त होत आहे. या कामी वित्तीय समावेशनाला महत्त्व आहे.

२०११ च्या जागतिक बँकेच्या पाहणी अहवालानुसार भारतात बँकेत साधारण खाते असणाऱ्या प्रौढ लोकसंख्येचे प्रमाण ३५% इतके आहे. जगातिक सरासरी ५०% इतकी आहे. तर विकसनशील देशांची सरासरी ४१% इतकी आहे.

तक्ता क्र.१

## वित्तीय समावेशन - प्रगती

| घटक | भारत | | | पूर्व प्रदेश | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २०१२ | २००१ | २०११ | २०१२ |
| १) बँकेची सेवा उपलब्ध असणारी कुटुंबे (%) | ३५.२ | ५८.७ | -- | २८.८ | ४७.३ | -- |
| २) प्रति बँक शाखेमागे लोकांचे प्रमाण (000) | १५.६ | १३.३ | १२.५ | १९.५ | १८.१ | १७.३ |
| ३) दर १००० लोकांमागे बँक खात्यांची संख्या | ४१६ | ६६१ | ७३४ | ३२१ | ४७६ | ५४० |
| ४) दरडोई ठेवी (रु. 000) | ९.२ | ४४.५ | ४९.४ | ५.५ | २२.८ | २६.५ |
| ५) दरडोई कर्ज वाटप (रु. 000/-) | ५.२ | ३३.७ | ३९.१ | २.0 | १२.१ | १३.९ |

संदर्भ - RBI Bulletin - June 2013

वरील पार्श्वभूमीवर भारतात वित्तीय समावेशनाच्या बाबतीत अनेक आव्हाने आहेत.

### वित्तीय समावेशन - आव्हाने:

रिझर्व्ह बँक वित्तीय समावेशनाला अधिक महत्त्व देत आहे. तसेच त्याच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करीत आहे. असे असले तरी वित्तीय समावेशनाच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी येत आहेत. तसेच अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्या आव्हानांचे अधिक स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१) वित्तीय समावेशनाचा भाग म्हणून वित्तीय सेवा कमी वेळेत, कमी किंमतीत उपलब्ध करुन देण्यासाठी बँका तंत्रज्ञानाचा वापर करु लागल्या आहेत. परंतू तंत्रज्ञान, मशीन, स्मार्ट कार्ड व इतर साधने देशाच्या अनेक भागात व्यवस्थित कार्य करीत नाहीत. कारण ग्रामीण व दुर्गम भागात तांत्रिक सेवा पुरविणाऱ्यांची संख्या नगण्य आहे.

२) देशाच्या अनेक भागात विशेषत: ग्रामीण व दुर्गम भागात वीजपुरवठा नियमित उपलब्ध होत नाही. त्यामुळे मशीनच्या वापरावर मर्यादा येतात. तीच अडचण इंटरनेटच्या बाबतीत देखील येते.

३) ग्रामीण भागातील लोकांना बँकेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या भागात बँकेच्या शाखा उघडण्यात आल्या आहेत. परंतु या शाखा फायदेशीर ठरत नसल्याचे दिसून येते. कारण या भागात पुरेसे व्यवहार होत नाहीत.

४) ज्यांच्यासाठी वित्तीय सेवा उपलब्ध करुन

देण्यासाठी वित्तीय समावेशनाची चळवळ राबविली जाते त्यांच्यातच इच्छा शक्तीचा अभाव दिसतो.

५) बँकेत खाते उघडणाऱ्यांची संख्या निश्चितपणे वाढलेली आहे. परंतु अनेक खात्यांवर नियमित व्यवहार होत नसल्याचे दिसून येते.

६) भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या व भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या देशात वित्तीय समावेशनाचे काम हे एक आव्हानच आहे.

**सारांश:**

वित्तीय समावेशनाच्या प्रगतीसाठी रिझर्व्ह बँक महत्त्वाची भूमिका बजावीत आहे. भारतासारख्या विकासाच्या मार्गावर असणाऱ्या व सर्वसमावेशक वृध्दीला महत्त्व देणाऱ्या देशात वित्तीय समावेशनाला विशेष महत्त्व आहे. वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या कामी व्यापारी बँकांची भूमिका महत्त्वाची आहे. परंतु एकट्या व्यापारी बँका हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट गाठू शकणार नाहीत. त्यासाठी इतर घटकांचे योगदानही महत्त्वाचे आहे परंतु वित्तीय समावेशनाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

**संदर्भ सूची:**


१) *भारतीय अर्थव्यवस्था* - रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन.

२) *RBI Bulletin* - August 2012

३) *RBI Bulletin* - June 2013

४) *अर्थसंवाद* - एप्रिल - जून २०१२ (भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक)

५) *अर्थसंवाद* - एप्रिल - जून २०१३

६) *RBI Bulletin* - October - 2013

# जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम

अविनाश कुलकर्णी, पुणे,
कृष्णा रेसिडेन्सी, सुस रोड,
पाषाण, पुणे ४११०२१
भ्रमणध्वनी: ९८२२२०३१८७

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात योजनाबद्ध आर्थिक विकास घडवून आणण्याच्या राष्ट्रीय ध्येयधोरणाच्या चौकटीत राहून, आर्थिक विकास व विकेंद्रित सामाजिक न्याय याची गती वाढविण्याच्या कार्यात बँकिंग क्षेत्र महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. बँकांच्या कार्याची व्याप्ती एकसारखी वाढत चालली आहे. वाढत्या शहरीकरणाच्या वाढत्या गरजा व त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने बँकांचा विकास झाला. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या (खा-उ-जा) पार्श्वभूमीवर भारताच्या अर्थव्यवस्थेतील ह्या महत्त्वपूर्ण घटकाच्या विकासाचा आढावा घेताना सर्वप्रथम भारतातील परंपरागत बँक व्यावसाची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहू.

**पार्श्वभूमी :**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात समाजातील गरजू अर्थात गरीब, व्यापारी व कारागीर यांना ज्या ज्या वेळी रोख पैशांची गरज भासे त्यावेळी समाजातील भांडवलदार वर्ग म्हणजेच सावकार विविध लोकांना कर्ज पुरवठा करत असत. या परंपरागत वा एतद्देशीय बँकींग व्यवसायातच आजच्या आधुनिक बँक व्यवसायाची पाळेमुळे आहेत.

"भारताचा अंतर्गत व बाह्य व्यापार मोठा होता. सर्व व्यापाऱ्यांना पैसे देणे, त्यांच्याकडून येणे वसूल करणे वगैरे कामे पूर्वीपासूनच या देशात चालू होती. हे सर्व करण्यासाठी व्यापारी, सर्वसामान्य ग्राहक व इतर लोक भारतातील सावकारांची आवश्यक तेव्हा मदत घेत. भारताच्या खेड्यापाड्यातूनसुद्धा अगदी प्राचीन काळापासून लहानमोठे सावकार पसरलेले होते. मोठ्या शहरातून व राजधानीच्या शहरातून तर ते फारच मानमान्यता पावलेले होते. प्रांत-भिन्नत्वानुसार हे सावकार वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात. उदा. सराफ, श्रॉफ, चेट्टी, शेठ, सावकार, महाजन, खत्री, खोत, मालगुजार, गुजर, कोठीवाले इ. या सर्वांचा 'एतद्देशीय

बँका' असा उल्लेख करावयास हरकत नाही.'' आधुनिक काळातील बँका जी कामे करतात ती बहुतेक सर्व कामे हे सावकार किंवा पेढीवाले करत असत. ह्या एतद्देशीय बँकांसुद्धा आजच्या काळाप्रमाणेच, ''ठेवी स्वीकारणे, चलनाची अदलाबदल करणे, हुंड्यांचा व्यवहार करणे, स्थानिक लोकांना कर्जे देणे - यात व्यापारी, शेतकरी, जमीनदार वगैरे लोकांना त्यांच्या गरजांनुसार लहानमोठ्या रक्कमांची व कमी-जास्त मुदतीची कर्जे देण्याचे काम या सावकारी पेढ्या करत.''

ह्या परंपरागत बँकींग व्यवसायाच्या वाटचालीतूनच ब्रिटिशकालीन भारतात अठराव्या व एकोणिसाव्या शतकात आधुनिक पद्धतीच्या बँका स्थापन व्हावयास सुरुवात झाली. आधुनिक बँक व्यवसाय हा संयुक्त भांडवली संस्था या प्रकाराच्या संघटनात सुरू झाला आणि त्याची मुळे कलकत्ता येथील अभिकर्ता गृहात आहेत. भारतातील आधुनिक बँक व्यवसायात प्रथम ईस्ट इंडिया कंपनीच्या अमलाखालील बंगाल, मुंबई, आणि मद्रास असे तीन इलाखे होते, ह्या इलाख्यात इलाखा बँका स्थापन झाल्या. त्यांची नावे अनुक्रमे बँक ऑफ बंगाल (१८०९), बँक ऑफ बॉम्बे (१८४०), आणि बँक ऑफ मद्रास (१८४३) होत. भारतात इलाखा बँका स्थापन झाल्यानंतर अनेक बँका स्थापन झाल्या व आधुनिक बँक व्यवसायाची सुरुवात झाली.

जगभर व्यापार आणि हक्काच्या बाजारपेठा काबीज करण्यासाठी युरोपातील पोर्तुगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश इत्यादींनी वसाहतवादी साम्राज्यविस्तार केला आणि त्यांच्या व्यापाराच्या वृद्धीसाठी त्यांनी वसाहतींमधील राष्ट्रांमध्ये आधुनिक सोयीसुविधा निर्माण केल्या. त्यापैकीच आधुनिक बँक व्यवसाय एक होय. त्यामुळे असे म्हणता येते की, मुक्त व्यापार, जागतिकीकरण, उदारीकरण ह्या संकल्पना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील असल्या तरी त्याची मुळे ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारांमध्ये दिसून येतात.

आर्थिक विकास आणि व्यावसायिक विकास करणे हा मानवाचा गुणधर्म त्यास देशाच्या सिमा बंधने घालू शकत नाहीत. मग ॲडम स्मिथ असो वा डंकेल यांसारख्या विचारवंतांच्या विचारांमध्ये मुक्त व्यापार, जागतिकीकरण, उदारीकरण यांसारख्या संकल्पनांना महत्त्व असल्याचे दिसून येते. गॅट करार आणि जागतिकीकरण याचा स्वीकार जगातील बहुतेक राष्ट्रांनी केला आहे. त्या अनुषंगाने आपल्या देशातील औद्योगिक धोरणात व बँकींग विषयक धोरणात वेळोवेळी बदल केले जात असल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने बँकींगविषयक केलेल्या बदलांचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

## जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम:

सन १९९१ पर्यंतच्या आर्थिक वर्षात बँकांच्या आर्थिक लेख्यात (वार्षिक ताळेबंदात) वाटप केलेल्या कर्जावरील व्याज जे कमविलेले परंतु प्रत्यक्षात वसुल न झालेले व्याज उत्पन्नात जमा घेण्यात येत होते. या कागदावरील नफ्याचे वाटप प्रत्यक्षात रोख स्वरूपात (लाभांश) केले जात होते. नफ्यातून निर्माण झालेला निधी इतर ठिकाणी गुंतविला जात होता. वसूल न होणारी कर्जे ताळेबंदाला दाखविली जात होती व आर्थिक लेख्याची पारदर्शकता नष्ट केली जात होती. त्यामुळे अर्थमंत्रालय भारत सरकार यांनी १४ ऑगस्ट १९९१ रोजी एक उच्चस्तरीय समिती रिझर्व्ह बँकेचे

माजी गव्हर्नर एम. नरसिंहम यांचे अध्यक्षतेखाली नेमली. बँकींग क्षेत्रातील सुधारणांची शिफारस करण्याची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली. या समितीने दि.१६-११-१९९१ रोजी अहवाल सादर केला. या अहवालात एन.पी.ए. (अनुत्पादक मालमत्ता किंवा अनुत्पादित कर्जे) निकष संदर्भात सूचना करण्यात आल्या आहेत. एन.पी.ए.चे निकष हे आंतरराष्ट्रीय आहेत. त्यानुसार बँकांच्या मालमत्तांचे वर्गीकरण करण्यात येते. उत्तम मालमत्ता, चांगली मालमत्ता, संशयित मालमत्ता, आणि बुडीत मालमत्ता. मालमत्तेच्या या वर्गीकरणानुसार बँकांना त्यांच्या संशयित व बुडीत मालमत्तेसाठी त्यांनी मिळविलेल्या नफ्यातून तरतूद करावी लागते. सर्वात प्रथम एन.पी.ए.चे निकष खासगी व राष्ट्रीयीकृत बँकांना लागू करण्यात आले. त्यानंतर एन.पी.ए.चे निकष सहकारी बँकांना दि. ३१ मार्च १९९३ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आले. अशाप्रकारे बँकांच्या ताळेबंदाची आणि आर्थिक पत्रकांची पादर्शकता निर्माण करण्याच्या हेतूने महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या हा जागतिकीकरणाचा महत्त्वपूर्ण परिणाम बँकिंग क्षेत्रावर झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एन.पी.ए. चे निकष लागू केल्यानंतर बँकांची सुरुवातीला आर्थिक स्थिती ढासळली. परंतु कालांतराने बँकांच्या आर्थिक लेख्यात पारदर्शकता निर्माण झाली. बँका सुदृढ होण्यास मदत झाली. या एन.पी.ए.चे प्रमाण लक्षात घेऊन अशक्त बँका व आजारी बँका यांचे वर्गीकरण करण्यात आले. ज्या बँकांचे भांडवल पर्याप्तता रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा ७५% हून कमी आहे किंवा ज्यांचे अनुत्पादक कर्जाचे (एन.पी.ए.) प्रमाण १०% हून अधिक आहे अशा बँकांना अशक्त बँका तर ज्या बँकांचे अनुत्पादक कर्जाचे (एन.पी.ए.) प्रमाण १५% हून अधिक आहे त्यांना आजारी बँका म्हणून वर्गीकृत करण्यात येऊ लागले.

या अनुत्पादक मालमत्तेचा (एन.पी.ए.) बँकांवरील महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे, अशा एन.पी.ए. कर्जखात्यावरील व्याजाचे उत्पन्न बँकांना मिळालेले नसल्याने बँकांच्या उत्पन्नात घट होते. तसेच अशा एन.पी.ए. कर्जखात्यासाठी बँकांना मिळालेल्या उत्पन्नातून तरतूदसुद्धा करावी लागते. म्हणजेच मिळालेल्या उत्पन्नात आणखी घट होते. त्यामुळे बँकांच्या नफाक्षमतेवर या एन.पी.ए.चे दुहेरी परिणाम होतात. त्याचबरोबर या थकीत कर्ज खात्यात बँकेचे खेळते भांडवल अडकून पडते, त्यामुळे बँकेची भांडवल पर्याप्ततासुद्धा कमी होते. त्यामुळेच सुरुवातीच्या काळात या एन.पी.ए.च्या निकषांमुळे बँका अडचणीत आल्या. अनेक सहकारी बँका बंद पडल्या. त्यांचे दुसऱ्या बँकांमध्ये विलिनीकरण करण्यात आल्याने अस्तित्व संपुष्टात आले. परिणामी भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील सहकारी बँकांच्या संख्येत घट झाली म्हणजेच सहकारी बँकांवर संख्यात्मक परिणाम झाला. तर नफाक्षमता कमी झाल्याने बँकांवर गुणात्मक परिणामही झाला असल्याचे दिसून येते.

बँकांवरील जागतिकीकरणाचा परिणाम म्हणजे एन. पी. ए. आणि आर्थिक मंदीमुळे बँकांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येते. पुण्यातील काही सहकारी बँकांच्या अहवालात असे म्हटले आहे की, ''आर्थिक मंदीमुळे नवीन चांगले कर्जदार मिळू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.''

सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत देशातील
अशक्त नागरी सहकारी बँकांच्या विलिनीकरणाचा तक्ता
(३० जून २०१० रोजी)

| अ.क्र. | राज्य | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ५ | ६ | ११ | ६ | १० | ३८ |
| २ | गुजरात | ५ | ५ | ६ | ३ | ४ | २३ |
| ३ | आंध्र प्रदेश | २ | १ | ३ | १ | ३ | १० |
| ४ | कर्नाटक | | ३ | २ | १ | १ | ७ |
| ५ | गोवा | १ | | | | | १ |
| ६ | पंजाब | | १ | | | | १ |
| ७ | मध्य प्रदेश | | १ | २ | १ | २ | ६ |
| ८ | उत्तराखंड | | | २ | | | २ |
| ९ | छत्तीसगड | | | | १ | | १ |

(स्रोत- http://www.rbi.org.in/ Trend and progress of Banking in India, accessed on 11-5-2011)

तसेच ''जागतिक मंदीचा परिणाम कर्ज मागणी कमी झाली.'' जागतिक आर्थिक मंदीचा परिणाम भारतातील अगदी लहान आकाराच्या नागरी सहकारी बँकांच्या व्यवसायावरही झाला असल्याचे बँकांच्या अहवालातून म्हटले आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणाचा परिणाम आणि प्रभाव भारतातील बँकांच्या व्यवसायावर होत असल्याचे दिसून येते. हा परिणाम फक्त भारतातील बँक व्यवसायावरच होतो आहे असे नाही तर अमेरिकेतील बँकांच्या व्यवसायावरही परिणाम झाला असल्याचे पुढील संदर्भातून स्पष्ट होते.

अमेरिकेत २०१० मध्ये ११८ बँका बुडाल्या - अमेरिकेतील बँकिंग व्यवसाय अजूनही पेचप्रसंगातून सावरला नसून दर महिन्याला किमान पंधरा अमेरिकी बँका बुडीतखाती निघत आहेत, त्यात काही छोट्या तर काही मध्यम आहेत. कारण लोकांकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे नाहीत. ऑगस्टमध्ये बुडालेल्या बँकांची संख्या आठ झाली आहे. सन २०१० प्रमाणेच सन २०११ या वर्षात तब्बल ६४ अमेरिकन बँका तेथील सरकारला बंद कराव्या लागल्या असून, सरासरी दर महिन्याला आठ बँका असे बंद होण्याचे प्रमाण असल्याचे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होते.

भारतातील बँकांच्या एकूण वितरित कर्जांच्या तुलनेत अनुत्पादित कर्जे (एन.पी.ए.) यांचे प्रमाण २०००-०१ मधील १२ टक्क्यांवरून २००७-०८ पर्यंत २.४ टक्के असे सुधारले खरे, परंतु डिसेंबर २०१२ पर्यंत ते पुन्हा ३.७ टक्के असे उंचावले आहे. प्रारंभी विदेशी आणि खासगी क्षेत्रातील बँका आणि सध्या राष्ट्रीयीकृत बँकांमधील वाढती एन.पी.ए.ची मात्रा चिंताजनक असल्याचे रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. जगातील प्रगत राष्ट्रांमधील एन.पी.ए.ची मात्रासुद्धा सरासरी ३ टक्क्यांच्या आसपास असल्याचे

पुढील आकडेवारीतून दिसून येते.

जर्मनी ३.०%, जपान २.४%, ब्रिटन ४.०%, अमेरिका ३.९%, ब्राझील ३.५%, रशिया ६.०%, भारत ३.६%, चीन १.०%, दक्षिण अफ्रिका ४.०%, या एन.पी.ए.च्या आकडेवारीवरून लक्षात येते की, एन.पी.ए.ची संकल्पना लागू केल्यामुळे त्याचे परिणाम विविध देशातील अगदी प्रगत देशातील बँकींग क्षेत्रावर होत आहेत. यामध्ये लहान आकाराच्या बँकांवर मात्र एन.पी.ए.मुळे व्यावसायिक अडचणी निर्माण झाल्याने त्या बंद करून त्याचे विलिनीकरण करण्यात आल्याने अस्तित्व संपुष्टात आले. त्यामुळे बँकांची संख्यात्मक घट झाली असल्याचे सर्वत्र दिसून येते.

बँकांचे विलिनीकरण आणि बंद पडण्यामुळे विविध बँकांमध्ये काम करणारे कर्मचारी बेकार झाले. काही कर्मचाऱ्यांना विलिनीकरण करण्यात आलेल्या बँकांच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात आले. परंतु त्यांची सेवाज्येष्ठता ग्राह्य न धरता त्यांना नविन नियुक्ती देऊन कमी पगारावर ते राहात असलेल्या गाव अथवा शहराऐवजी दुसऱ्या शहरात अगदी परराज्यातसुद्धा नियुक्त करण्यात आल्याने अशा बंद झालेल्या बँकांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अन्याय झाल्याचे पुण्यातील नागरी सहकारी बँकांच्या अभ्यासातून दिसून आले आहे. पुण्यातील दि.श्री. सुवर्ण सहकारी बँक लि., नवजीवन सहकारी बँक लि., सिटिझन्स को.ऑप. बँक लि. इत्यादीसारख्या वेगवेगळ्या बँकेतील कर्मचाऱ्यांवर विलिनीकरणामुळे परिणाम झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम म्हणजे छोट्या आकाराच्या बँकांचे अस्तित्व धोक्यात आले आणि त्या बंद पडल्यामुळे कर्मचाऱ्यांवर बेकारी किंवा कमी पगारावर नियुक्ती, परराज्यात नियुक्ती अशाप्रकारचे अन्यायकारक परिणाम झाले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील या विपरित परिणामांबरोबरच काही चांगले परिणामसुद्धा झाले आहेत. यात मुख्यत्वे बँकांच्या ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या सेवा व सुविधा उपलब्ध झाल्याने बँकींग व्यवहार वाढले असल्याचे लक्षात येते. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून बँकिंग क्षेत्रात निर्माण झालेल्या स्पर्धात्मक वातावरणामुळे बँकांना त्यांच्या ग्राहकांसाठी कधीही त्यांच्या खात्यातील पैसे काढण्याची, हस्तांतर करण्याची, दुसऱ्या शाखेत पैसे पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली. अर्थात ए.टी.एम., मोबाईल बँकिंग, नेट बँकिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्याने ग्राहकांना बँकेच्या शाखेत बँकेच्या कामकाजाच्या वेळेत येण्या-जाण्याच्या अडचणींपासून मुक्तता मिळाली. ग्राहकांना मिळणाऱ्या या सोयी-सुविधांबरोबरच बँकांच्या कामकाजातही काही सुधारणा व प्रगती झाली असल्याचे आढळून आले आहे.

बँकिंगच्या अत्याधुनिक सेवा-सुविधा शहरी तसेच काही ग्रामीण लोकांच्या अंगवळणी पडल्या त्यापैकी सर्वात महत्त्वपूर्ण सेवा म्हणजे मोबाईल बँकिंग होय. त्याचप्रमाणे बँकांमधून पैसे काढण्यासाठी आता जास्तीत जास्त ए.टी.एम.चा वापर केला जाऊ लागला आहे. त्यामुळे बँकिंग सेवेच्या वेळेची बंधने ग्राहकांना बँकिंग व्यवहार करण्यात अडचणीची ठरत नाहीत. बँकांनी वेगवेगळ्या कारणांकरिता उपभोक्ता कर्जे वाटप करण्यावर भर दिल्यामुळे बँकिंग ग्राहकांना त्यांच्या

वेगवेगळ्या उपभोग्य कारणांकरिता कर्जे घेण्याची आणि हप्ते भरण्याची सोय झाल्याने आता पर्यटनासाठीसुद्धा कर्जे घेण्याचे भारतीय ग्राहकांना अप्रुप वाटत नाही. म्हणजेच पाश्चिमात्त्य राष्ट्रांप्रमाणे विशेषत: अमेरिकेत सर्व कारणांकरिता कर्जे मिळतात, आणि सर्व उपभोग्य वस्तू हप्त्यावर मिळतात. आता भारतातसुद्धा सर्व कारणांसाठी कर्जे मिळतात व वस्तुसुद्धा हप्त्यांवर मिळतात. अशाप्रकारे भारतात मिश्र अर्थव्यवस्थेकडून बाजार व्यवस्थेकडे अर्थात भांडवलशाहीकडे परिवर्तन घडत असल्याचे दिसून येते.

अत्याधुनिक यंत्रतंत्राबरोबरच ग्राहकांना वेगवेगळ्या कारणांसाठी सन २००० च्या दशकात कर्जे देण्यासाठी बँकांनी पुढाकार घेतल्याने ग्राहकांना त्याच्या राहणीमानात सुधारणा करता आली. सन २००५ ते २००८ या कालावधीत तर कमीत कमी व्याजदरात गृहकर्ज वाटप करण्याची स्पर्धा असल्याचे दिसून येते. यात स्टेट बँकेबरोबरच इतरही राष्ट्रीयीकृत बँकांचे गृहकर्जाचे स्पर्धात्मक व्याजदर ८ टक्क्यांच्या आसपास होते. तर आयसीआयसीआय, आयडीबीआय, एचडीएफसी यासारख्या बँकांचे गृहकर्जाचे व्याजदर ७ ते ८ टक्क्यांच्या दरम्यान होते. तसेच वाहन कर्ज, व घरगुती वापराची उपकरणे यासाठी कर्ज वितरणात बँकांनी आघाडी घेतल्याने अनेकांचे कारचे स्वप्नसुद्धा साकार झाले. लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली.

बँकांच्या विकासाबाबत सांगावयाचे झाल्यास सन २००१ पासूनच्या ११ वर्षांत भारताच्या बँकिंग क्षेत्राची एकंदर कार्यात्मकतेत वाढ आणि वित्तीय सर्वसमावेशकतेच्या दिशेने लक्षणीय प्रगती दिसून आली आहे. बँकांचा प्रति कर्मचारी व्यवसाय २००१ मधील २.१ लाख रुपयांवरुन, २०१२ मध्ये ८.३ लाख रुपये असा सुधारला आहे. शाखांची संख्या वाढली तर प्रति शाखा सरासरी व्यवसायही २००१ सालातील रु. ३४.७ लाखांवरून आर्थिक वर्ष २०१२ अखेर ९९.३ लाखांवर गेला आहे. प्रत्येक १००० लोकसंख्येमागे ठेव खातेदार संख्याही गेल्या ११ वर्षांत ४१६ वरुन ७३४ अशी वाढली आहे. प्रत्येक १००० लोकसंख्येमागे कर्ज खातेदार संख्या ही २००१ सालातील ५१ वरून २०१२ मध्ये १०६ अशी दुपटीने वाढली आहे. २००१ सालात लोकसंख्येमागील प्रत्ये क बँक शाखेच्या प्रमाणाची राष्ट्रीय सरासरी १५,६०० होती, ती २०१२ सालात १२,५०० अशी खालावली आहे. गुंतविलेल्या मालमत्तेवरील परतावा २००१ सालातील ०.५४% वरुन २०१२ सालात १.०५% सुधारला आहे. अगदी जागतिक वित्तीय अरिष्टाच्या काळातही बँकांनी सरासरी १% परतावा मिळवून नफाक्षमता कायम राखली आहे.

परंतु सन २००९ पासून भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिक मंदीचे परिणाम दिसू लागले. रिझर्व्ह बँकेने पतनियंत्रणाच्या साधनांद्वारे बँकांच्या कर्ज वाटपावर नियंत्रण राखण्याच्या धोरणामुळे गृहकर्जांच्या व्याजदरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सन २०११-१२ मध्ये गृहकर्जाचे व्याजदर १२ ते १३ टक्क्यांच्या दरम्यान असल्याने बँकिंग व्यवसायावर जागतिक मंदीचा परिणाम झाला असल्याचे दिसून आले आहे. त्याचप्रमाणे वाहन कर्जेसुद्धा महाग झाल्याने वाहन उत्पादन क्षेत्रात मंदी निर्माण झाल्याचे सन २०१२-१३ या वर्षातील वाहन विक्रीच्या आकडेवारीतून दिसते. महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा या वाहन उत्पादन कंपनीने

जुलै २०१३ पासून सप्ताहातील एक दिवस उत्पादन बंदचे धोरण आखले आहे. परिणामी भारताचा विकास दर सन २०१२-१३ मध्ये कमीत कमी झाल्याचे आढळून आले आहे. अशाप्रकारे जागतिक आर्थिक मंदी आणि जागतिकीकरणाचा भारतीय बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाला असल्याचे स्पष्ट होते.

### जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम:

बँकिंग क्षेत्रावर परिणाम होण्यामागील कारणांमध्येही जागतिक पातळीवर काही प्रमाणात साम्य असल्याचे दिसून येते. यामध्ये अनुत्पादक मालमत्तेत वाढ होण्याच्या कारणांमध्ये कायदेशीर तरतुदींमधील त्रुटी अथवा उणिवा हे प्रमुख कारण जपान, चीन, थायलंड, भारत इ. आशियाई देशांमध्ये आढळून येते. या कारणाबरोबरच राजकीय हस्तक्षेप किंवा राजकीय कारणांमुळे अनुत्पादक मालमत्तेत वाढ होत असल्याचे भारतासह पूर्व आशियाई देशांमधील एक कारण असल्याचे अभ्यासातून दिसून आले आहे. घर, जमीन इ. सारख्या (रिअल इस्टेट) मालमत्तांच्या गुंतवणुकीतून अनुत्पादक मालमत्तेत वाढ झाल्याचेसुद्धा आशियाई तसेच अमेरिकेसारख्या देशाच्या अनुत्पादक मालमत्तेच्या कारणांमध्ये आढळून आले आहे.

रिअल इस्टेटमधील गुंतवणूक आणि अनुत्पादक मालमत्ता यासंदर्भात पुण्यातील एका प्रसिद्ध चार्टर्ड अकाऊंटंट यांच्याशी चर्चा करताना ते म्हणाले की, अमेरिकेतील अनेक बँकांनी मालमत्तांच्या किंमती ह्या नेहमी वाढतच राहतात असे गृहित धरले त्यामुळे त्यांनी वाटप केलेली कर्जे सुरक्षित आहेत असे समजून कर्जदाराची परतफेडीची क्षमता लक्षात न घेताच अगदी मॉलमध्ये कमी पगारावर काम करणाऱ्या कामगारांनासुद्धा घर घेण्यासाठी मोठ्या रक्कमांची कर्जे दिली. परिणामी जागतिक आर्थिक मंदीमुळे अमेरिकेत वा जगात अनेकांवर बेकारीचे संकट ओढावले आणि कर्जे परतफेड करण्याची क्षमताच संपुष्टात आल्याने अनुत्पादक मालमत्तेत वाढ झाली. परिणामी अमेरिकेतील अनेक बँका बंदसुद्धा पडल्या असल्याचे आढळून आले आहे.

बँकिंग व्यवसाय करताना कर्जे वाटप करून नफा मिळविणे ही व्यवसायिकता खूप महत्त्वपूर्ण असतानाच पुण्यातील व इतरत्र असणाऱ्या काही सहकारी बँकांनी कर्जे अनुत्पादक होऊ नये म्हणून चांगले कर्जदार मिळाले नाहीत म्हणून कर्ज वाटपात घट झाली असल्याचे त्यांच्या वार्षिक अहवालांमधून म्हटले आहे. चांगले कर्जदार मिळविणे किंवा कर्जदारांना चांगले कर्जदार घडविणे ही बँकिंग क्षेत्राची जबाबदारी असल्याचे हे या बँका विसरल्या असल्याचे दिसून येते. म्हणजेच बँकांमध्ये व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव असल्याचे दिसून आले आहे.

कर्जे वाटप केल्यानंतर कर्जदार स्वत:हून बँकेत येऊन कर्ज हप्ता भरणा वेळेवर करेल असे गृहीत धरून बँकेचे कामकाज परंपरागत पद्धतीने चालू असल्याचेही आढळून येते. वास्तविक कर्जदारास त्याच्या कर्जाचा हप्ता अधिक व्याज आकारणी भरण्याची अंतिम मुदत असलेले एखादे बिल प्रत्येक महिन्याला पाठवून कर्जदारास बील भरण्याची सवय लावण्याची पद्धत कोणत्याही बँकेने अवलंबिलेली दिसत नाही. भारतीय जीवन विमा निगम (एल.आय.सी.) वीमा धारकास त्याच्या वीमाच्या हप्त्याची देय तारीख असलेले

स्मरणपत्र वजा बिल नियमितपणे पाठवित असते. अशाप्रकारे बँकांनीसुद्धा व्यावसायिक व्यवस्थापनाचा अवलंब करणे महत्त्वपूर्ण असल्याचे आढळून येते.

व्यवसायिक व्यवस्थापनाच्या अभावा बरोबरच भारतीय बँकिंग व्यवस्थेमध्ये संरचनात्मक असंतुलन असल्याचे एका संशोधन लेखात म्हटले आहे. संरचनात्मक असंतुलनामुळे दीर्घ मुदतीच्या ठेवी संकलनास प्रोत्साहन मिळत नाही, तर बँका अल्प मुदतीच्या ठेवींवरच अवलंबून असल्याचे दिसून येते. परिणामी बँकाचा पतपुरवठ्याचा दर संथ गतीने कमी होतो. बँका दीर्घ मुदतीच्या ठेवींना प्रोत्साहन देऊन संरचनात्मक असंतुलन कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु हे फक्त मोठ्या बँकांच्याबाबतच घडते आहे.

काही खासगी व्यापारी बँकांनी त्यांनी वाटप केलेल्या कर्ज वसुलीसाठी खासगी अभिकर्त्यांची (एजंट) नेमणुक केली होती. परंतु या अभिकर्त्यांकडून कर्जदारांना धमकाविण्याचे प्रकार, तसेच कर्जदाराच्या कौटुंबिक सदस्यांशी असभ्य वर्तन केल्याने व काही दुर्दैवी घटनासुद्धा घडल्याने अशाप्रकारे वसुलीसाठी रिझर्व्ह बँकेने नियमावली लागू केली. कर्जदारास धमकाविण्याच्या किंवा अशाप्रकारच्या तक्रारी अल्यास बँकेवर परवाना रद्द करण्याची तरतूदसुद्धा या नियमावलीत करण्यात आली. त्यामुळे आता अशा अभिकर्त्यांमार्फत कर्जे वसुली होत असल्याचे सहजपणे दिसून येत नाही.

### निष्कर्ष व सूचना:

जागतिकीकरण आणि भारताचे नवे औद्योगिक धोरण त्याचबरोबर बँकिंग क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुधारणा घडवून आणण्यासाठी सन १९९१ पासून धोरण आखण्यात आले व त्याची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे औद्योगिक सुधारणा आणि बँकिंग सुधारणा याबाबतचे बरे-वाईट परिणाम आता दृष्टिक्षेपात आले आहेत.

बँकिंगविषयक सुधारणांमध्ये थकीत कर्जे किंवा थकीत मालमत्ता याचे वर्गीकरण करून अनुत्पादक मालमत्तेचे निकष लागू करण्यात आल्याने सुरुवातीच्या काळात बँकांच्या उत्पन्नात घट झाली. परिणामी बँकांच्या कर्ज वाटपावर आणि एकूणच व्यवसायावर त्याचे विपरित परिणाम झाले. तथापी बँकांचे आर्थिक व्यवहार समृद्धीसाठी ही पद्धत आवश्यक होती हे कोणीही नाकारणार नाही. परिणामस्वरुप बँकांच्या आर्थिक लेख्यात पारदर्शकता निर्माण झाली. बँका सुदृढ होण्यास मदत झाली.

बँकांच्या निव्वळ एन.पी.ए. मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे म्हणजेच निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण कमी झाले आहे. परंतु याचा अर्थ बँकांच्या थकीत कर्जाच्या वसुलीमध्ये वाढ झाली असे मात्र निश्चितच नाही. आघाडीच्या राष्ट्रीयकृत बँकांनी व्यापारी बँकांच्या सहकार्याने 'आरसील' नावाची एक ए.आर.सी.(Asset Reconstruction Company) ११ फेब्रुवारी २००२ रोजी पब्लिक लि. कंपनी म्हणून स्थापन केली. थकीत कर्जे अथवा अनुत्पादक मालमत्ता या कंपनीला विकून त्याबदल्यात बँकांनी या कंपनीचे भाग, ठेवी याद्वारे गुंतवणुक आपल्या ताळेबंदाला दाखविली. त्यामुळे बँकांच्या निव्वळ एन.पी.ए.मध्ये घट झाल्याचे दिसून येते. म्हणजेच निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण बँकांच्या वार्षिक अहवालात कमी दिसत असले तरी बँकांच्या थकीत कर्जाच्या वसुलीमध्ये उत्तम प्रकारे वाढ झाली आहे

असे निश्चितच नाही हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष दृष्टोत्पत्तीस येतो.

सहकारी बँकांच्या बाबतीत मात्र अशी थकीत कर्जे एखाद्या कंपनीला विकून एन.पी.ए.चे प्रमाण कमी करण्याची सोय मात्र अजुनही उपलब्ध नसल्याने सहकारी बँकांच्या एन.पी.ए.चे प्रमाण राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांच्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याचा निष्कर्ष दिसून येतो. परंतु सहकारी बँकांनीसुद्धा थकीत कर्जाच्या वसुलीच्या ऐवजी झालेल्या उत्पन्नातून किंवा नफ्यातून एन.पी.ए.साठी तरतूद केल्यामुळे अनेक सहकारी बँकांच्या निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण शून्य टक्के झाले आहे आणि बँका त्याबाबतच्या जाहिरातीसुद्धा करत आहेत. म्हणूनच असे स्पष्टपणे म्हणता येते की, बँकांच्या थकीत कर्जाचे किंवा अनुत्पादक मालमत्तेचे आणि त्याच्या वसुलीबाबतचे खरे वास्तव त्यांच्या निव्वळ एन.पी.ए.च्या प्रमाणावरून नव्हे तर ढोबळ एन.पी.ए.च्या प्रमाणावरुनच स्पष्ट होते.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि स्पर्धात्मक वातावरणात सहकारी बँकांची राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांशी स्पर्धा होऊ शकत नाही. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँका आणि व्यापारी बँका त्यांच्या ग्राहकांना ज्या अत्याधुनिक सोयी-सुविधा देत आहेत, त्या सर्व सहकारी बँकांना आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देणे आर्थिकदृष्ट्या सहजासहजी शक्य नाही. उदा. ए.टी.एम., नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, कोणत्याही शाखेतून बँकिंग व्यवहार करणे इ. सारख्या सोयी-सुविधा सहकारी बँकांना शक्य नाहीत.

ज्या बँका आर्थिकदृष्ट्या अशक्त बँका किंवा आजारी बँका आहेत अशा बँकांचे मोठ्या आकाराच्या व नफ्यातील बँकांमध्ये विलिनीकरण करण्याचे रिझर्व्ह बँकेचे धोरण आहे. त्यामुळेच मागील १२ वर्षाच्या काळात अनेक नागरी सहकारी बँकांचे मोठ्या आकाराच्या विशेषतः अनुसूचित नागरी सहकारी बँकांमध्ये विलिनीकरण झाल्याचे आढळून येते. पुण्यातील श्री. सुवर्ण सहकारी बँक लि. या एकमेव सहकारी बँकेचे इंडियन ओव्हरसीस बँक या राष्ट्रीयीकृत बँकेत विलिनीकरण झाल्याचे अद्वितीय उदाहरण (Unique case)आढळून येते. परंतु अडचणीतील बँकांचे सरसकट विलिनीकरण करणे हा एकमेव उपाय न योजता बँकांना व्यवसायाची परवानगी देऊन त्यांच्या व्यवसायात सुधारणा घडवून आणणे अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले आहे. विलिनीकरणामुळे बँकेचे सभासद, कर्मचारी यांच्यावर प्रामुख्याने विपरित परिणाम झाले आहेत.

त्यामुळे जागतिकीकरणचा बँकिंग क्षेत्रावरील मुख्य परिणाम म्हणजे छोट्या आकाराच्या बँका ज्या स्पर्धा करू शकत नाहीत आणि ज्यांची आर्थिक स्थिती ढासळलेली आहे अशा बँकांचे अस्तित्व संपुष्टात येऊन त्यांचे मोठ्या आकाराच्या बँकांमध्ये विलिनीकरण करण्यात आले आहे. म्हणजेच आर्थिक दुर्बलांवर सबलांचे वर्चस्व स्थापन झाले आहे. त्यामुळे सर्व घटकांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे अर्थात समतेचे तत्त्व आणि मिश्र अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट या ऐवजी भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दिशेने कूच करण्यात आल्याचा महत्त्वपूर्ण निष्कर्ष दिसून येतो.

वरील निष्कर्षांच्या अनुषंगाने सूचना करताना

सर्वप्रथम सर्व प्रकारच्या बँकांनी पारंपरिक पद्धतीनेच व्यवसायाचे व्यवस्थापन करण्यात धन्यता न मानता व्यवसायातील अडचणी सोडविण्यासाठी किंवा व्यवसायाच्या प्रगतीसाठी सतत नवनवीन प्रयोग केले पाहिजेत म्हणजेच व्यावसायिक व्यवस्थापनाचा स्विकार केला पाहिजे.

एन.पी.ए. आणि त्याच्या परिणामांची धास्ती न बाळगता बँकांनी व्यवसायात वाढ करण्यासाठी चांगले कर्जदार उपलब्ध होण्याची वाट पाहण्यापेक्षा नवनवीन कर्जदारांना चांगले कर्जदार कसे करता येईल यासाठी सतत अनेक उपाययोजनांद्वारे प्रयत्नशील असले पाहिजे. व्यावसायिक वाढ केल्याशिवाय एन.पी.ए.च्या अडचणीतून मुक्तता नाही हे व्यावसायिक व्यवस्थापनाचे तंत्र आत्मसात केले पाहिजे. उदा. पुण्यातील ज्या नागरी सहकारी बँका एन.पी.ए.च्या परिणामस्वरुप अडचणीत आल्या त्या बँकांचे ताळेबंद पाहता सहजपणे लक्षात येते की, बँकांच्या ठेवींमध्ये वाढ झाली नाही. बँकांच्या कर्ज वितरणात वाढ झाली नाही. म्हणजेच बँकेच्या व्यवसायात वाढ न झाल्याने आणि अनुत्पादक मालमत्तेत रक्कम अडकून पडल्याने भांडवल आणि व्यावसायिक वाढ यांच्या कमतरतेमुळे बँकांचे उत्पन्न घटले आणि बँकांचे अस्तित्व धोक्यात आले.

कर्ज वितरणात वाढ करतानाच कर्ज वितरण ज्या कारणासाठी केले आहे त्याच कारणासाठी त्याचा विनियोग होतो आहे की नाही ? यावर सतत बँकांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. तसेच कर्ज वितरणानंतर कर्जदार हप्ता स्वत:हून बँकेत येऊन नियमितपणे भरणा करेल यावर बँकांनी अवलंबून न राहता कर्जदारास त्याच्या कर्ज हप्त्याची अंतिम तारीख असलेले स्मरणपत्र, इंटरनेट, मोबाईल यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर करून कर्ज परतफेड नियमितपणाने करण्यास प्रोत्साहन देऊन चांगले कर्जदार निर्माण करणे आवश्यक आहे.

सोन्यामध्ये गुंतवणूक करणाऱ्या भारतीय समाजाला बँकिंगमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या योजनांद्वारे आकर्षित करणे व व्यवसायात वाढ करणे आवश्यक आहे. सोने आयातीसाठी विदेशी चलनाची उपलब्धता आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा असमतोल कमी करण्यासही उपयुक्त ठरणार असल्याने बँकिंग गुंतवणूक वाढणे आवश्यक आहे.

संरचनात्मक असमतोल दूर करण्यासाठी बँकांनी सेवा निवृत्त अथवा ज्येष्ठ नागरिकांसाठी दिर्घ मुदतीच्या ठेवी अथवा विम्यासारख्या योजना, तसेच करदात्यांकरता कर सवलतीचे दीर्घ मुदतीचे बाँड उपलब्ध करणे उपयुक्त ठरणार आहे.

व्यावसायिक व्यवस्थापनाचा स्विकार करून सतत नवनवीन प्रयोगशीलता करत बँकिंग क्षेत्राचा विकास साधल्यास जागतिकीकरणाचा भारतातील बँकिंग क्षेत्रावर विपरित परिणाम निश्चित होणार नाही तर स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक वातावरण निर्माण होण्यास उपयुक्त ठरणार आहे.

**संदर्भ सूची:**


१) जाधव श्रीकांत, *एन.पी.ए. व्यवस्थापन आणि निकष*, एप्रिल २००५, अश्वमेध प्रकाशन, सांगली.

२) डॉ. मुकुंद महाजन, *भारतीय बँक प्रणाली*, जून २००५, निराली प्रकाशन, पुणे.

३) सन्मित्र सहकारी बँक लि., हडपसर, पुणे वार्षिक अहवाल २००९-१०.

४) राजर्षी सहकारी बँक लि., पुणे वार्षिक अहवाल २००९-१०.
५) मुलाखत- संजय पी. जोशी, चार्टर्ड अकाऊंटंट, पुणे.
६) दै. लोकसत्ता, दि. ११-६-२०१३.

## 'अर्थसंवाद' : *आर्थिक महाराष्ट्र विशेषांक*

***अर्थसंवादः एप्रिल-जून २०१४*** हा ***आर्थिक महाराष्ट्र विशेषांक*** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ५/६ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे.

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणि संरचनात्मक बदल, २) महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक, ३) महाराष्ट्रातील उर्जा संसाधन, ४) महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग, ५) महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील वाटचाल, ६) महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा, ७) महाराष्ट्रातील लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास, ८) महाराष्ट्राची आर्थिक वाटचाल, ९) महाराष्ट्रातील बँकिंग क्षेत्र १०) महाराष्ट्रातील बेकारी व दारिद्र्य, ११) महाराष्ट्रातील जलसिंचन व शेतीविकास, १२) नवीन आर्थिक धोरणाचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम १३) महाराष्ट्रातील शहरीकरण व विकास, १४) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल, १५) महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाः विविध पैलू.

शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी पृष्ठ क्र.१५७ वरील चौकट पहावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरुप व उपाय योजना

गवारे एन. बी, पाटोदा,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, जि.बीड
भ्रमणध्वनी: ९४२३४७३९५१

ब्रिटिशांच्या सत्ता काळामध्ये लहान मोठे २५ हून अधिक दुष्काळ पडले होते. १७७०च्या बंगालच्या दुष्काळाने प्राण गमावणाऱ्यांची संख्या ३५ ते ४० लाख होती. महाराष्ट्रात१९६२ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. त्यानंतर सर्वांच्या आठवणीत राहणारा दुष्काळ म्हणून १९७२ चा दुष्काळ आठवतो. १९७२च्या दुष्काळात महाराष्ट्रात पावसाची नोंदलेली सरासरी ५२३ मि.मि. होती आणि राज्याचे १००% क्षेत्र अवर्षण पिडीत झाले होते. गेल्या १२५ वर्षात अशीच बिकट परिस्थिती १८७७ ला १८९९ ला आणि १९१८ ला निर्माण झाली होती असे उपलब्ध नोंदीवरुन कळते. २०१२-१३ चा पाऊस सरासरीच्या ९२% आहे आणि सर्वात कमी पाऊस म्हणजे ४८% जालना जिल्ह्यात झालेला आहे. अशीच अवघड परिस्थिती थोड्याफार फरकाने नंदूरबार, धुळे, जळगांव, नाशिकचा पूर्व भाग, नगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम व बुलढाण्याचा पश्चिम भाग, पुणे, पूर्व सातारा व सांगली भागात आहे. पर्जन्यछायेत येणारा राज्याचा हा उत्तर दक्षिण पट्टा ५०% भाग व्यापत आहे. आपल्या देशाची पावसाची वार्षीक सरासरी ११५० मि.मि. आहे. त्यापैकी ७३% पाऊस १०० दिवसात कोसळून मोकळा होतो. हे पाणी साठवण्याची व्यवस्था आपण निर्माण करू शकलेलो नाही. वितरण विषम आहे. शासकीय पातळीवर हा धोरणाचा दुष्काळ आहे व समाजाची उदासीनता तेवढीच घातक आहे. वेगवेगळ्या अभ्यासातून असे दिसून येते की, आपल्या देशाला पाऊस व हिमनग वितळून दर वर्षी ४ हजार अब्ज घन मिटर पाणी मिळते तरी देशातील तब्बल २० कोटी लोकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळू शकत नाही. पिण्याच्या पाण्याच्या दरडोई उपलब्धते बाबत भारत जगात १०८ क्रमांकावर आहे. इतकी भीषण परिस्थिती आहे. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषीक विजेते अमर्त्य सेन यांच्या मते, ' माणसाची क्रय शक्ती कमी होते तेव्हा दुष्काळ निर्माण होतो.' परंतु महाराष्ट्रातील दुष्काळ ग्रस्त भागातील लोकांची

क्रयशक्ती चांगली आहे.

**अभ्यासाचा उद्देश:**

सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील १८५ तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळाच्या स्वरुपाचा अभ्यास करणे हा प्रमुख उद्देश आहे. त्यातुन दुष्काळाची कारणे शोधणे व दुष्काळ निर्मुलनासाठी दिर्घकालीन उपाय सुचविणे हा अभ्यासाचा उद्देश आहे.

**महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरुप:**

सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यामध्ये जी दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे त्याचे स्वरुप पाहताना असे दिसून येते की, प्रामुख्याने पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, फळबाग वाचविणे, प्रत्येकाला रोजगार देणे, वन्यप्राणी पक्षी यांना वाचविणे हे प्रश्न निर्माण झाले आहेत. महाराष्ट्रात १५ एप्रिल २०१३ पर्यंत ८४६ चारा छावण्या सुरु होत्या. त्यात ६ लाख ५२ हजार ४४९ जनावरे होती. चारा डेपोसाठी ३६६ कोटी७५ लाख रुपये व छावण्यासाठी ३८२ कोटी २४ लाख रुपये असे एकूण ७४८ कोटी ९९ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. दुष्काळी गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी ४१३ कोटी ९८ लाख रु इतका निधी वितरित करण्यात आला होता. तसेच दुष्काळ निवारणासाठी राज्याच्या आकस्मित निधीतून आता पर्यंत ३८० कोटी ३९ लाख रुपये देण्यात आले होते. मराठवाड्यात ऑक्टोबर ते जानेवारी २०१३ या कालावधीत १६ फुट भूजल पातळी खाली गेली होती. पुढे मे अखेर पर्यंत काय परिस्थिती असेल याची कल्पनाही करता येत नाही. फेब्रुवारी २०१३ मध्ये मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पा पैकी ६ प्रकल्प कोरडे पडले आहेत. उर्वरीत ५ प्रकल्पात अवघा १० % जलसाठा शिल्लक होता. सर्वात मोठ्या जायकवाडी धरणाची परिस्थिती अत्यंत नाजुक आहे. १५ एप्रिल २०१३ पर्यंत मराठवाड्यातील जायकवाडी, सिध्देश्वर, निम्नदुधना, माजलगाव, मांजरा, निम्नतेरणा, निम्न कोळेगाव या सात मोठ्या प्रकल्पात शून्य टक्के जलसाठा होता. पुर्णा येलदरी १२ द.ल.घ.मी (१%), उर्ध्वपेन गंगा २६८ द.ल.घ.मी(२८%), मानार १४ द.ल.घ.मी (१०%), विष्णुपुरी १९ द.ल.घ.मी (२३%) एवढे होते. बंगळुरच्या सरपंच परिषदेमध्ये पोपटराव पवार म्हणाले " मराठवाड्यात पाणी, पर्यावरण व शेतीचे योग्य नियोजन नाही. कागदावर २ % जंगल शिल्लक आहे. विंधन विहीरींची संख्या वाढत असताना. पाणी पातळी खोल गेली आहे. खोल विंधन विहीरीचा मराठवाड्याला धोका आहे. त्यामुळे लवकर सावध होऊन पाणी, जमीन व पिकांचे नियोजन करुन दुष्काळाच्या झळा कमी करा अन्यथा मराठवाडा धोक्यात येईल." प्रत्येकाला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे हे जरी सरकारचे काम असले तरी खाजगी स्तरावर काही नागरिक स्वत:चे पाणी मोफत देत आहेत. तसेच काही स्वयंसेवी संस्थाही पाणी व चारा उपलब्ध करुन देत आहेत. त्यामध्ये भारतीय जैन संघटनेच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यात पाच छावण्या सुरु केलेल्या आहेत तसेच पशु पक्षी यांनाही पाणी उपलब्ध केले जात आहे. त्यामध्ये शिरुर कासार, सिल्लोड तालुक्यातील काही स्वयंसेवी संस्था व शाळा यांनी पुढाकार घेऊन झाडावर पक्षांना पाण्याची सोय केली आहे. मराठवाड्यामध्ये दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक

आले होते त्यांनी जिल्ह्यातील काही निवडक गावांना भेटी दिल्या व पाहणी केली व सरकारच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

उपाययोजना:

महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यामध्ये जी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यावर निश्चित मात करता येईल कारण या संदर्भात विविध गावात अनेक प्रयोग झालेले आहेत. त्यामध्ये राळेगण सिध्दी, हिवरेबाजार, शिरपुर पॅटर्न, राजस्थानातील काही गावांच्या यशोगाथा यांचा समावेश आहे. म्हणून याही दुष्काळावर लोकसहभागातून, सरकार, संस्था, स्थानिक लोक, शाळा यांच्या मदतीने मात करता येईल. तरीही काही उपाय योजना सुचविता येतील.

१) गांव पातळीवर नियोजन:

आज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बीकट बनत चालला आहे. सरकार टॅंकर, विंधनविहीर, विहिर अधिग्रहण याद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे तरीही हा उपाय तात्पुरता आहे. कायम स्वरूपाचा उपाय म्हणून प्रत्येक गावाचे नियोजन के ले पाहिजे. गावाचा भौगोलिक अभ्यास करुन जलसंधारणाची कामे करता येतील. आज विंधनविहीर घेण्याकडे सर्वांचा कल आहे. त्यावर कोणाचेही कसलेही नियंत्रण नाही. म्हणून पाणी पातळी खाली जात आहे. यासाठी कठोर कायदयाची गरज आहे. गावपातळीवरील नियोजनाद्वारे पाणी प्रश्न सोडविता येतो. हे समाजसेवक अण्णा हजारे, पोपटराव पवार, राजस्थानामध्ये २०० गांवात यशस्वी प्रयोग करणारे राजेंद्रसिंह यांनी दाखवून दिले आहे.

२) चारा छावण्या:

महाराष्ट्रात १५ एप्रिल २०१३ पर्यंत ८४६ चारा छावण्या सुरू होत्या व या छावण्यामध्ये ६ लाख ५२ हजार ४४९ जनावरे होती. तसेच काही खाजगी संस्थानीही स्वखर्चाने छावण्या सुरू केलेल्या आहेत. आज काही शेतकऱ्याकडे चारा आहे परंतु पाणी नाही म्हणूनही जनावरे छावणीत दाखल होत आहेत. सरकार गरज आहे त्याठिकाणी चारा छावण्या सुरू करत आहे परंतु तेथेही जनावरांची स्वच्छता, आरोग्य यांचेही प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून सरकारला फार काळजी घ्यावी लागेल. पशुधन वाचविण्यासाठी बीड जिल्ह्यात वर्ल्ड सोसायटी ऑफ ॲनिमल संस्थेने पशुधनासाठी निवारा आणि पुरक खनिजद्रव्ये असलेला आहार उपलब्ध करून दिला आहे.

३) वन्य प्राणी, पक्षी यांचे संगोपन:

दुष्काळाची झळ फक्त मानवालाच बसते असे नाही तर वन्यप्राणी, पक्षी यांनाही बसत आहे. दुष्काळी भागात आधीच जंगलाचे प्रमाण नगण्य आहे म्हणून वन्यप्राणी हरीण, ससा, मोर, रानडुक्कर, वाघ इतर सर्व पशु पक्षी हे पाण्या अभावी मरत आहेत. त्यांना पाणी उपलब्ध झाले पाहिजे तरच त्यांचे अस्तित्व राहील नसता ते नामशेष होतील. खाजगी संस्था, व्यक्ती यांनी पक्ष्यांना झाडावर पाणी उपलब्ध करून दिले आहे. परंतु हे प्रमाण नगण्य आहे. राजस्थान मध्ये नगर गावात पक्षासाठी 'चिडीयाघर' ही जागा राखून ठेवली आहे. लोक त्यांना पाणी, चारा देतात. तसेच लापोदिया या गावात ही 'कबूतरखाना' आहे तेथे पक्षी जमा होतात. वन्य जिवासाठी 'चरागा' ही जागा राखीव आहे. असे प्रयोग महाराष्ट्रात कधी होतील याचा गांभीर्याने विचार झाला पाहीजे.

४) गाळ काढणे:

पूर्वी खेडयामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक विहीर, आड, बारव ही साधने होती. कालांतराने त्याची जागा विंधनविहीर, पाझर तलाव, नवीन विहीर, बंधारे यांनी घेतली. जुनी साधने जवळजवळ बंद आहेत. नवीन साधनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचला आहे. म्हणून या दुष्काळामुळे गाळ काढण्याची चांगली संधी निर्माण झाली आहे. आज विहीर, तलाव, नालाबंड, मोठा तलाव, मध्यम प्रकल्प यामधील गाळ काढण्याची संधी निर्माण झाली आहे. म्हणून स्थानिक ठिकाणी लोकांनी तर सार्वजनिक ठिकाणी सरकारने जनतेच्या सहभागातून गाळ काढण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला आहे. यासाठी सरकार अनुदान उपलब्ध करून देत आहे. त्याचे परिणाम पुढील काळात निश्चित दिसतील यात शंका नाही.

५) पाझर तलाव व शेततळे उभारणे:

दुष्काळावर कायम स्वरुपी मात करावयाची असेल तर पाझर तलाव व शेततळ्याशिवाय पर्याय नाही. प्रत्येक गावात शक्य त्या ठिकाणी पाझर तलाव, माती नाला बंड हा कार्यक्रम राबविला पाहिजे. तसेच शेत तळे हाही प्रयोग शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्याला गती दिली पाहिजे. विशेषतः फळबागा, भाजीपाला यासाठी हे पाणी देणे शक्य आहे. दोन्ही प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठवुन गरजेच्या वेळी वापरता येईल. म्हणून सरकारने याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

६) पिक पध्दतीत बदल करणे:

दुष्काळावर मात करण्यासाठी शेतीमधील पीक पध्दतीत बदल करणे आवश्यक झाले आहे. एकच पीक पध्दतीमुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होते. तसेच ऊस, केळी, कापूस या पिकांना मोठ्या प्रमाणात पाणी लागते म्हणून ही पिके घेऊ नये असे नाही परंतु या पिकासाठी ठिबक व तुषार सिंचन या आधुनिक पध्दतीचा वापर करणे आवश्यक झाले आहे. हवामान, जागतिक तापमानवाढ या बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली पाहिजे. तसेच दुष्काळात तग धरणारी नविन पिकाचे वाण यांचे संशोधन झाले पाहिजे. या संदर्भात कृषी हवामान शास्त्रज्ञ डॉ. रामचंद्र साबळे म्हणतात की, " मान्सुनचा पॅटर्न बदलत असल्याने आणि हवामान बदलामुळे पिक पध्दती बदलली पाहिजे. गेल्या बारा वर्षात मान्सुन मध्ये बदल झाला आहे या वर्षीही तीच परिस्थिती आहे म्हणून शेतीबाबत विचार करायलाच हवा. जून-जुलै मध्ये पाऊस कमी असेल तर तूर, मका, घेवडा, सोयाबीन ही पिके घेता येतात. मराठवाडा विदर्भात शेतकरी कापूस घेतात. ब्रिटिशांपासून हे चालत आले आहे. तेव्हा त्यांना गरज होती. ते गेले पण तिच पीक पध्दती कायम आहे. म्हणून पर्यायी पिकांचा विचार व्हायला हवा". श्रीनिवास खांदेवाले यांच्या मते, "कमी पाण्याच्या पीक पध्दतीचा अवलंब करावा यासाठी शेतकऱ्यामध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी अडविणे आणि ज्या ठिकाणी पाणी साठे आहेत. तेथुन शेतीच्या बांधापर्यंत पोहोचण्याच्या योजना सरकारने राबविल्या पाहिजेत."

७) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम:

दुष्काळावर मात करण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचा उल्लेख करता येईल. जल स्त्रोताचे बळकटीकरण करताना केवळ जल संवर्धनाचा

विचार होतो. त्या ऐवजी मृदसंधारण व जलसंधारणाचा एकत्रित विचार व्हावा. एका पाणलोटातील कालवे, वितरीका,नाले, ओढे आदिचे एकात्मिक व शास्त्रीय नियोजन हवे. पाणलोट क्षेत्रा मध्ये अभ्यास करून माथ्यापासून पायथ्यापर्यंत विविध कामे केली जातात. जमिनीचे सपाटीकरण, बांध टाकणे,चर खोदणे, सपाट वाफे, सरी वरंबे, बंदिस्त वरंबे, पाझर तलाव, नाला बंड इ. कामे करता येतात. पावसाळ्यामध्ये डोंगरावर झाडे लावावीत. अशा पध्दतीने संपूर्ण पाणलोट क्षेत्र विकसित केले पाहिजे. राज्यातील प्रत्येक गावात ही कामे झाली पाहिजेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ही कामे करता येतील. त्यातुन रोजगाराचा प्रश्न सुटेल व खेड्यातील लोकांचे स्थलांतर ही थांबेल.

८) जल साक्षरता:

पाण्याचे संवर्धन, व्यवस्थापन, वितरण व्यवस्था, पारंपरीक आणि अपारंपरीक स्त्रोताची जपवणूक आणि पाणी वापर यासाठी लोकांमध्ये जल साक्षरता महत्त्वाची आहे. पाण्याचे पुनर्भरण ही काळाची गरज आहे. त्यासाठी विहीर, विंधनविहीर या ठिकाणी पुनर्भरणाचा कार्यक्रम राबविता येईल. रेन वॉटर हार्वेस्टींग देखील करावे लागेल. तसेच पाण्याचा पुनर्वापर देखील काळाची गरज आहे असे जल तज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांनी म्हटले आहे. युरोप मध्ये सहा वेळा पाण्याचा पुनर्वापर केला जातो. आपल्याकडे एकदा ही पाण्याचा पुनर्वापर केला जात नाही. याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. तसेच पाणी व्यवस्थापन हा विषय शालेय व महाविद्यालयीन स्तरावर समाविष्ट केला पाहिजे. त्याच प्रमाणे पाणी अंकेक्षण ही संकल्पना रुढ झाली पाहिजे.

समारोप:

पाणी हे संसाधन निसर्गाने मानवाला विनामूल्य दिले आहे. त्याचा वापर नियोजन बध्द न झाल्यामुळे बेसुमार उपसा झाल्यामुळे दुष्काळा सारखी आपत्ती आली आहे. दुष्काळ महाराष्ट्राला नवीन नाही. दुष्काळ निसर्ग निर्मित किंवा मानव निर्मित आहे या वादात मी पडत नाही, पण या संकटाचा सामना करताना सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. या दुष्काळामध्ये प्रामुख्याने पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, लोकांना रोजगार हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. सरकार, स्वंय सेवी संस्था, व्यक्तीच्या सहकार्यातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु ह्या दुष्काळाकडे पाहतांना केवळ तात्पुरते उपाय नको आहेत. शाश्वत उपाय हवे आहेत. मानवाने निसर्गाला अक्षरश: ओरबाडण्याचे काम केले आहे. स्वत:चा स्वार्थ पाहिला आहे. भविष्यात पुन्हा अशी संकट येऊ द्यावयाची नसतील तर निसर्ग संवर्धन झाले पाहिजे नसता निसर्ग मानवाला कदापी माफ करणार नाही.

संदर्भ सूची:


१) गोडवा, अंक - ३, मार्च २०१३
२) दैनिक लोकमत - जानेवारी ते एप्रिल २०१३ मधील विविध अंक
३) दैनिक लोकसत्ता - जानेवारी ते एप्रिल २०१३ मधील विविध अंक
४) दैनिक महाराष्ट्र टाईम्स - जानेवारी ते एप्रिल २०१३ मधील विविध अंक
५) दैनिक सकाळ सप्तरंग पुरवणी - २४ फेब्रुवारी, ७ एप्रिल, १५ एप्रिल२०१३
६) सकाळ ॲग्रोवन - २४ फेब्रुवारी, २६ फेब्रुवारी व २१ एप्रिल २०१३.

# ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना

**अशोक खाचणे**, जळगाव,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९४२१५२१४४१

उत्पादन प्रकियेत उत्पादनाच्या वृध्दीला अप्रत्यक्ष साह्यभूत ठरणाऱ्या सामाजिक (सरकारी) भांडवलाला आधारभूत संरचना असे म्हणतात. ज्या व्यवस्थेत किंवा पध्दतीने विशिष्ट भागात राहणारे लोक आपल्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतूने वस्तुंचे किंवा सेवांचे उत्पादन करण्यासाठी जाणीवपूर्वक व संघटितपणे एकमेकांमध्ये सहकार्य करुन सर्व साधनांचा वापर करुन जीवन जगतात त्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेची संरचना उपयुक्त ठरते.

ग्रामीण आधारभूत संरचनेचे ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. मूलभूत/आधारभूत संरचना ह्या समाजाचे भांडवल असते व त्याद्वारे आर्थिक योजना कार्यान्वीत होतात. पायाभूत संरचना म्हणजे सामाजिक दृष्ट्या उपयुक्त अशा उपक्रमांमध्ये/योजनांमध्ये करण्यात आलेली गुंतवणूक होय. उत्पादनाच्या प्रक्रियेला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे साह्यभूत ठरणाऱ्या विविध सामाजिक भांडवलाला आधारभूत संरचना असे म्हणतात. विकासाची प्रक्रिया विस्तारित व गतिमान करण्यासाठी ग्रामीण पायाभूत संरचना महत्त्वाची भूमिका बजावत असते. भारतात कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्यानंतर शासनाकडून ग्रामीण संरचनेच्या विकासासाठी गुंतवणूक करण्यास सुरुवात झालेली आहे. भारताने १९९१ ला नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. तेव्हापासून पायाभुत संरचनेच्या निर्मितीत सहकारी/सार्वजनिक क्षेत्राबरोबरच खासगी क्षेत्राचा सहभाग ही मोठ्या प्रमाणात वाढला व त्यामुळेच आज देशात संरचनात्मक सोयी सुविधांमध्ये झपाट्याने वाढ झालेली दिसते. तसेच या सुविधांमध्ये परिवर्तनही मोठ्या प्रमाणात झालेले दिसते.

**अभ्यासाची गृहितके:**

१. महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात पायाभूत सुविधांचे महत्त्व तपासणे.

२. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांची माहिती मिळविणे.

३. ग्रामीण महाराष्ट्रातील पायाभूत संरचनेतील रचनात्मक बदलांचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण महाराष्ट्रातील विकासात आधारभूत संरचनेची भूमिका तपासणे.

प्रस्तृत शोध निबंधात आधारभूत संरचनामधून महाराष्ट्रातील शिक्षण, रस्ते वाहतूक, दळणवळण या तीन पायाभूत सुविधांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**शिक्षण:**

परिवर्तनाचा मुलमंत्र म्हणजे शिक्षण असे म्हटले जाते. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास होतो. कोणत्याही राष्ट्राचा सर्वांगिण विकास हा त्या राष्ट्रात असलेल्या शैक्षणिक सुविधांवर अवलंबून असते. महाराष्ट्र राज्य हे शैक्षणिक दृष्ट्या प्रगतीशिल राज्य आहे व म्हणून शैक्षणिक दृष्ट्या एक अग्रेसर राज्य म्हणून त्याचा उल्लेख होतो. भारताच्या साक्षरतेचे प्रमाण २००१ ला ६४.८४% एवढे होते तर महाराष्ट्रात हेच प्रमाण ७६.८८% एवढे होते. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, वय वर्ष ०६-१४ वयोगटातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण, शैक्षणिक गळतीवरील निर्बंध, प्रौढ व निरंतर शिक्षण कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान इ. विविध उपक्रमांद्वारे शैक्षणिक विकास झाल्याचे दिसते.

राज्यात सर्वत्र मोफत प्राथमिक शिक्षण असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, विविध व्यावसायिक अभियांत्रिकी व आरोग्य विषयक महाविद्यालये यांची संख्या महाराष्ट्रात भरपूर आहे. शिक्षणात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात सर्वच स्तरावरील शिक्षणसोयी वाढतांना दिसत आहे.

१९८०-८१ मध्ये प्राथमिक शिक्षण संस्था ५१,०४५ एवढ्या होत्या तर २००६-०७ मध्ये यांची संख्या वाढून ६९,३३० पर्यंत वाढली म्हणजे या २६ वर्षाच्या कालखंडात या संस्थांच्या संख्येत जवळ जवळ ७३% वाढ झालेली दिसते. तर विद्यार्थी संख्या याच काळात ८,३९,२०० वरुन ११,६८,८००० एवढी वाढली म्हणजेच या २६ वर्षाच्या कालखंडात प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत जवळ जवळ ७१% वाढ झालेली दिसते. प्राथमिक शिक्षकांची संख्या सुध्दा या काळात २,२२,००० वरुन ३,४०,००० पर्यंत वाढली अर्थ असावी या २६ वर्षात प्राथमिक शिक्षकांची संख्या जवळ जवळ ६५% वाढली.

१९८०-८१ मध्ये माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या ६११९ होती तर २००६-०७ मध्ये ही संख्या २०,३३९ पर्यंत वाढली म्हणजे या २६ वर्षाच्या कालखंडात ही संख्या जवळ जवळ २३४% वाढलेली दिसते तर माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याच काळात ३,३०,९००० वरुन ११,०६,३००० पर्यंत वाढली. म्हणजेच या २६ वर्षाच्या कालखंडात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळ जवळ २३४% वाढलेली दिसते. माध्यमिक शिक्षकांची संख्या सुध्दा या कालखंडात १,१४,००० वरुन २,९१,००० पर्यंत वाढलेली दिसते. म्हणजेच या कालखंडात माध्यमिक शिक्षकांची संख्या जवळ जवळ १५५ % पर्यंत वाढलेली दिसते.

१९८०-८१ मध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या ७३९ एवढी होती, हीच संख्या २००६-०७ मध्ये १,६७७ पर्यंत वाढलेली दिसते. अर्थ असाकी या २६ वर्षाच्या कालखंडात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या जवळ जवळ १२७% वाढलेली दिसते. याच कालावधीत

उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५,८९,००० वरुन ११,४९,००० पर्यंत वाढलेली दिसते म्हणजे या २६ वर्षाच्या कालखंडात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळ जवळ ९५% वाढलेली दिसते.

**रस्ते वाहतूक:**

ग्रामीण आधारभुत संरचनेत वाहतूक क्षेत्रास अत्यंत महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यात रस्तेबांधणी, दुरुस्ती व त्यांची डागडुजी इत्यादी स्वरुपाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत, जिल्हा परिषद, नगर पालिका, रस्ते विकास मंडळ इत्यादी कडून केली जातात. महाराष्ट्र राज्यास स्वतंत्र राज्य म्हणून दर्जा मिळाल्यानंतर राज्यात रस्ते बांधणीस वेग आलेला आहे हे पुढील बाबी वरुन स्पष्ट होते. १९६५-६६ ते २००९-१० या ४५ वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्रात राष्ट्रीय महामार्गाची लांबी २,३६४ कि.मी. वरुन ४,३७६ कि. मी. पर्यंत वाढलेली आहे. म्हणजेच जवळ जवळ दुप्पट वाढलेली आहे. तर याच कालखंडात राज्य महामार्गाची लांबी जवळ जवळ ३.२५ पट वाढलेली आहे. तसेच मुख्य जिल्हा रस्त्यांची लांबी सुध्दा या काळात जवळ जवळ ४ पटीने वाढलेली आहे. इतर जिल्हा रस्त्यांची लांबी या कालखंडात जवळ जवळ ५.५० पट वाढलेली आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांची (गाव रस्ते) लांबी या कालखंडात जवळ जवळ ६ पटीने वाढलेली आहे. एकूण रस्त्यांच्या लांबीचा विचार करता वरील कालखंडात सर्वच रस्त्यांची एकूण लांबी जवळ जवळ ४.७५ पटीने वाढलेली आहे.

२०१० पर्यंत महाराष्ट्रातील एकूण खेडेगावांपैकी जवळ जवळ ९८% खेडी ही रस्त्यांनी तालुक्याशी वा जिल्ह्याशी जोडलेली होती. महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना झाल्यापासून (१९९६) बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) तत्त्वावर रस्ते बांधणीस वेग आला आहे. आज जवळ जवळ १८ ते १९ प्रकल्प सुरु असून त्यावर जवळ जवळ ७,११० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र ६५२० कोटी रुपये खर्च झालेला आहे. येथे एक बाब प्रकर्षाने दिसून येते की, एकूण रस्ते लांबीत खेडेगाव पातळीवरील रस्त्यांची लांबी सर्वात अधिक असून त्यात गेल्या ४५ वर्षाच्या कालखंडात सर्वात वेगाने वाढ झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जवळ जवळ प्रत्येक गाव मुख्य तालुका वा जिल्ह्याशी जोडले गेले आहे. परिणामी अल्पकाळात गावकऱ्यांना या मुख्यालयाशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. त्यामुळे शेती, लघु व कुटीरोद्योग, शिक्षण आरोग्य इत्यादीत वेगाने वाढ घडून आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना व पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत सातत्याने गाव पातळी वरील रस्त्यांमध्ये वाढ व सुधारणा घडून येत आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील रस्त्यात कच्च्या रस्त्यांचे प्रमाण असून इतरही रस्त्यांचा दर्जा फारसा चांगला नाही. आज ही अनेक खेड्यांना बारमाही रस्ते उपलब्ध नसल्यामुळे अशा गावांचा पावसाळ्यात संपर्क तुटतो. महाराष्ट्रातील २ ते ३% खेडेगावांचा पावसाळ्यात इतर जगाशी संपर्क तुटतो. जवळ जवळ ०.५% खेड्यांना (२३५) आजही कोणतेच रस्ते उपलब्ध नाहीत. याचा अर्थ असा की एक विकसित राज्य म्हणून मिरवणाऱ्या महाराष्ट्राला रस्ते वाहतुकीवर विशेषत: ग्रामीण रस्ते वाहतुकीवर विशेष लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे.

**दळणवळण:**

अर्थव्यवस्थेचा सर्वांगिण विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो. त्या घटकांपैकी एक महत्त्वाचा घटक म्हणून दळणवळण व्यवस्थेस स्थान आहे. दळणवळणात तार, टपाल, दूरध्वनी इ. सेवांचा समावेश होतो. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे व या क्षेत्रात खाजगी क्षेत्राच्या प्रवेशामुळे आज या सेवांचा लाभ नागरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील लोकांना सुध्दा मिळत आहे. त्यामुळे ग्रमीण भागातील लोकांच्या जीवनमानावर त्याचा सकारात्मक परिणाम होतांना दिसत आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोक संपर्कासाठी मागील अनेक वर्षापासून टपाल सेवेचा उपयोग करीत आहेत. अर्थ असा की, हे माध्यम संपर्काचे अतिशय पूर्वापार चालत आलेले आहे. आधुनिक संपर्क साधनांच्या वापरापूर्वी ग्रामीण महाराष्ट्रात माहितीच्या देवाण घेवाणीसाठी पोष्टाच्या पत्राशिवाय दुसरे साधन नव्हते. महाराष्ट्र राज्यात २०१०-११ ला एकूण १२,८५३ पोस्ट कार्यालये होते. त्यापैकी ग्रामीण भागात ११,५२४ कार्यालये होते. अर्थ असा की, एकूण कार्यालयांपैकी जवळ जवळ ९०% पोस्ट कार्यालये ग्रामीण महाराष्ट्रात होते. २०१०-११ ला महाराष्ट्रात एकूण टपाल पेट्यांची संख्या ५२,५८४ एवढी होती. यापैकी ग्रामीण भागात ४२,६५५ टपाल पेट्या म्हणजे एकूण टपाल पेट्यांपैकी जवळ जवळ ८१% टपालपेट्या ग्रामीण महाराष्ट्रात होत्या. तसेच २०१०-११ ला महाराष्ट्रात एकूण पोस्टमनची संख्या ७९२० होती यापैकी ग्रामीण महाराष्ट्रात ५६० पोस्टमन कार्यरत होते. म्हणजे एकूण पोस्टमन पैकी जवळ जवळ ७.०७% एवढेच पोस्टमन ग्रामीण भागात कार्यरत होते. तसेच २०१०-११ ला महाराष्ट्रात एकूण तार सेवाकेंद्रे १९२० होती. त्यापैकी १५२४ तारकेंद्रे ग्रामीण भागात कार्यरत होती. अर्थ असा की, एकूण तार सेवाकेंद्रांपैकी जवळ जवळ ८०% तारसेवा केंद्रे ग्रामीण भागात कार्यरत होती.

वरील सर्व माहितीवरुन एक बाब लक्षात येते की, ग्रामीण भागाची संपर्क व्यवस्थेची पूर्ण मदार आज ही पोस्ट व तार खात्यांवर अवलंबून आहे. असे असले तरी ग्रामीण भागात काम करणाऱ्या पोस्टमनची संख्या अत्यल्प असल्यामुळे आजही ग्रामीण भागात पत्र वा संदेश वेळच्या वेळी पोहचत नाही. यात वाढ करणे गरजेचे आहे.

अलिकडच्या काळात दूरध्वनी व भ्रमणध्वनी याचा वापर ग्रामीण भागात हळूहळू वाढतांना दिसत आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा इतर भागांशी संपर्क वाढला आहे. ही सेवा सध्या फारच कमी खर्चात सहज उपलब्ध होणारी वेगवान सेवा असल्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेला विशेषतः शेतकऱ्यांना त्याचा चांगलाच फायदा होत आहे. त्यांना शेतमाल बाजारपेठांची माहिती विनामूल्य घरपोच मिळते त्यामुळे उत्पादना विषयीचे अचूक निर्णय घेणे शेतकऱ्यास शक्य होत आहे.

**निष्कर्ष:**

१. महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार जिल्हा पातळीवरुन तालुका व ग्रामीण भागापर्यंत पोहोचला असला तरी तो विषम प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती अतिशय गंभीर आहे त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

२. शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी वर्गीकृत जाती जमातीच्या शिक्षणाकडे अजूनही हवे तेवढे लक्ष ग्रामीण भागात दिले जात नाही.
३. महाराष्ट्रात व्यवसायभिमूख शिक्षणाची दालने खुली झालेली असली तरी ती फक्त शहरी भागापर्यंतच मर्यादित आहे. ग्रामीण भागात आजही परंपरागत शिक्षणच दिले जात आहे.
४. प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या संख्येत व विद्यार्थ्यांच्या संख्येत ज्या प्रमाणात वाढ झाली त्या प्रमाणात शिक्षकांच्या संस्थेत वाढ झालेली दिसत नाही. त्यामुळे शिक्षकांवर ताण पडून शिक्षण व्यवस्था सैल होत आहे.
५. राज्यातील प्राथमिक शाळांना पुरेशा इमारती नाही २०१० पर्यंत राज्यात सर्व शाळा मिळून ७५,००० खोल्यांची कमतरता होती. ही कमतरता लवकरात लवकर दूर झाली पाहिजे.
६. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात गळतीचे प्रमाण चिंताजनक आहे. दोन्ही मिळून हे प्रमाण जवळ जवळ ९५% आहे. याचा अर्थ असा की केवळ ५% विद्यार्थी महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेऊ शकतात.
७. महाराष्ट्र राज्यात १९६० पासून रस्ते विकास प्रारंभ झाला असला तरी रस्त्यांची स्थिती फार समाधानकारक नाही.
८. ग्रामीण भागात रस्त्यांच्या लांबीचे प्रमाण सर्वात जास्त असले तरी यात कच्च्या रस्त्यांचे प्रमाण जास्त आहे. जे काही पक्के रस्ते आहेत त्यांची स्थिती फार चांगली नाही व यासर्व गोष्टींचा विपरित परिणाम ग्रामीण भागाच्या वाहतुकीवर पडताना दिसत आहे.
९. अपूर्ण व कच्चे रस्ते ग्रामीण भागाच्या विकासातील अडसर बनत असून अनेक गावे रस्त्याशिवाय विकासाची वाट बघत आहेत.
१०. ग्रामीण महाराष्ट्राची दळणवळणाची संपूर्ण मदार पोस्ट कार्यालयावर आधारित आहे.
११. असे असले तरी ग्रामीण भागात काम करणाऱ्या पोस्टमनची संख्या खूपच कमी आहे. त्यात वाढ करणे गरजेचे आहे.
१२. ग्रामीण महाराष्ट्रात अत्याधुनिक (दुरध्वनी व भ्रमणध्वनी) संपर्क साधनांचा उपयोग वाढत आहे. ही अतिशय सकारात्मक बाब आहे.

संदर्भ सूची:


१. *लोकराज्य*- सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र विशेषांक मे २०१०.
२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २००९-१०
३. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था- डॉ. अशोक खाचणे
४. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - डॉ. र.पू. कुरुलकर
५. अर्थविश्व - 'स्मरणिका' मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन.

# महाराष्ट्रातील असंघटीत क्षेत्र व कामगार कल्याण एक व्यष्टी अध्ययन

पी.एम.कडुकर, मुंबई-१२,
अधिव्याख्याता(राजपत्रित),
कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था
(महाराष्ट्र शासन),डी.सी.मार्ग,परेल.
भ्रमणध्वनी:९३७१६०४६९४

वर्ष २०११ च्या जनगणना अहवालानुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१.१ कोटी आहे. त्यापैकी महाराष्ट्राची लोकसंख्या देशाच्या लोकसंख्येच्या ११.२३ कोटी (९.३%) आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४५ टक्के लोकसंख्या ही श्रमशक्ती म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासामध्ये श्रमिक वर्गाचे योगदान अमुल्य आहे. श्रमिकांच्या श्रमातुन उत्पादनाची प्रक्रिया निरंतर चालु असते. किंबहुना श्रमिक वर्गाच्या जोरावर विकासाची गती अवलंबून असते. परंतू जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर कामगार जगतामध्ये वेगाने बदल होत आहेत. श्रमिक वर्ग हा असंघटीत क्षेत्राकडे वेगाने ओढला जातोय. राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार देशातील ९३% श्रमिक हे असंघटीत क्षेत्रात काम करतात. तर महाराष्ट्रात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या ९१% आहे व फक्त ९% श्रमिक हे संघटीत क्षेत्रात मोडतात. असंघटीत क्षेत्रातील श्रमिकाला तुलनात्मकदृष्ट्या अत्यंत कमी, अपुरे व अनियमीत वेतन दिले जाते. मालक-नोकर असा दीर्घकालीन संबंध प्रस्थापित होणे कठीण असते. कामाचे स्वरुप किरकोळ, हंगामी असते. बहुतांश कामगार कायदे या श्रमिकांना लागु होत नाहीत. असंघटीत क्षेत्रामध्ये सर्वात मोठा वर्ग हा स्वयंरोजगारितांचा आहे. ज्यांचे उत्पन्न तुटपुंजे असते. भांडवल, वीज, पाणी दळणवळण यासारख्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. तसेच उत्पन्नाची व सामाजिक सुरक्षिततेची हमी नसते. बहुतांश श्रमिक वर्ग हा दारिद्र्यामध्ये, कर्जबाजारी असतो, सामाजिक सन्मान, प्रतिष्ठा व योग्य न्याय मिळत नाही. अशा नानाविध वैशिष्ट्यांनी

भरलेला महाराष्ट्रातील श्रमिक वर्ग हा असंघटीत क्षेत्रात मोडतो.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महाराष्ट्रातील असंघटीत क्षेत्राची सद्यस्थिती अभ्यासण्याचा प्रयत्न तसेच महाराष्ट्रातील असंघटीत श्रमिकांची परिस्थिती सुधारुन त्यांना चांगले रहाणीमान जगता यावे यासाठी महाराष्ट्र शासन राबवित असलेल्या कल्याणकारी कायद्यांचा व योजनांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### संशोधन लेखाची प्रमुख उद्दिष्ट्येः

१. महाराष्ट्राच्या असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे व कामाच्या प्रकारानुसार रोजगाराचे स्वरुप काय आहे याचा आढावा घेणे.

२. महाराष्ट्रातील असंघटीत श्रमिकांसाठी शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी कायद्यांचा व योजनांचा आढावा घेणे.

३. असंघटीत श्रमिकांच्या परिस्थितीत आणखी सुधारणा घडवुन आणण्यासाठी काही उपाययोजना करता येतील का यावर विचार-विमर्श करणे.

प्रस्तुत संशोधन लेखाची ही प्रमुख उद्दिष्ट्ये असुन हा लेख पूर्णतः दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे.

### महाराष्ट्रातील श्रमशक्तीची सद्यस्थितीः

श्रमशक्तीचे प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. (१) संघटीत क्षेत्र (२) असंघटीत क्षेत्र. सर्वसाधारणपणे ज्या आस्थापनेमध्ये १० पेक्षा अधिक कामगार काम करतात त्यांचा समावेश संघटीत क्षेत्रात तर १० पेक्षा कमी कामगार काम करणाऱ्या आस्थापनांचा समावेश असंघटीत क्षेत्रात केला जातो. असंघटीत क्षेत्राची देशपातळीवर जी स्थिती आहे तीच स्थिती राज्यपातळीवर देखील दिसुन येते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण श्रमिकांची संख्या ५.१० कोटी इतकी आहे. त्यापैकी संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या ९% आहे तर असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ९१% आहे.

महाराष्ट्रातील दुकाने व आस्थापना अधिनियमाखाली १९ लाख आस्थापना नोंदणीकृत असुन, सुमारे २८ लाख श्रमिक काम करतात. तसेच या अधिनियमाच्या बाहेर असणाऱ्या कारखान्यांची संख्याही तेवढीच आहे. त्याचबरोबर राज्यातील १.२१ कोटी शेतकऱ्यांकडे जवळपास २.४० कोटी शेतमजुर काम करतात. ४० लाख मालकांकडे जवळ-जवळ २० लाख घरेलू कामगार काम करतात. राज्यामध्ये बांधकाम व तत्सम क्षेत्राशी निगडीत काम करणाऱ्या मजुरांची संख्या ३० लाखांहून अधिक आहे. माथाडी अधिनियमाखाली ३४ माथाडी मंडळे कार्यरत आहेत व त्यामध्ये २ लाखांहून अधिक माथाडी कामगार आहेत. तर राज्यातील ६ सुरक्षा रक्षक मंडळाअंतर्गत जवळपास ३२ हजार सुरक्षा रक्षक काम करतात. नाका कामगार, रस्त्यावरील फेरीवाले यांची संख्याही काही लाखांच्या घरात आहे. सद्यस्थितीत राज्यातील श्रमशक्ती

तक्ता १: राज्यातील श्रमशक्तीची सर्वसाधारण स्थिती (US) नुसार टक्केवारीची विभागणी

| तपशील | वर्ष २०१०-११ | | | वर्ष २०११-१२ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकुण | पुरुष | स्त्रिया | एकुण |
| एकूण श्रमशक्ती सहभागदर(LFPR) | ८१.८ | ३४.२ | ५९.४ | ८१.७ | ३८.१ | ५९.९ |
| कार्यशक्ती सहभागदर (WPR) | ८०.५ | ३३.६ | ५८.४ | ८०.२ | ३७.८ | ५९.० |
| बेरोजगारी दर (UR) | १.३ | ०.६ | १.० | १.५ | ०.३ | ०.९ |
| श्रमशक्तीबाहेरील लोकसंख्या | १८.२ | ६५.७ | ४०.६ | १८.३ | ६१.९ | ४०.१ |

स्त्रोत : महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०११-१२ पृ.२३१


व कार्यशक्तीमधील सहभाग दर स्त्री-पुरुष निहाय कसा आहे हे तक्ता १ वरुन स्पष्ट होते.

वर्ष २०१०-११ व २०११-१२ या दोन्ही वर्षांचा विचार करता राज्यामध्ये श्रमशक्तीबाहेरील स्त्री लोकसंख्या अनुक्रमे ६५.७ आणि ६१.९ टक्के इतकी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे दोन्ही वर्षामध्ये स्त्री श्रमशक्ती सहभाग दर व कार्यशक्ती सहभाग दर हा पुरुषांच्या तुलनेत खुपच कमी आहे. २०१०-११ मध्ये फक्त ३४.२ टक्क्यांवर असलेल्या स्त्री श्रमशक्ती सहभाग दरात थोडीशी वाढ होऊन २०११-१२ मध्ये ३८.१ टक्का इतका झाला आहे त्यामुळे कार्यशक्ती सहभाग दरात देखील थोडी वाढ झाली आहे. याच कालावधीत पुरुष श्रमशक्ती व कार्यशक्ती सहभाग दर मात्र ८० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. स्त्री श्रमशक्ती कमी असण्याची अनेक कारणे असु शकतात. त्यामध्ये मुख्यतः स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तराचे व्यस्त प्रमाण, उच्च शिक्षणात स्त्रियांचे वाढते प्रमाण तसेच सामाजिकदृष्ट्या आजही गृहिणी म्हणून कुटुंब सांभाळण्याचा कल स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे.


महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे होऊन गेली पण या दीर्घकालावधीचा विचार करता स्त्रीयांचा श्रमशक्ती व कार्यशक्ती मधील सहभाग दर हा फारसा समाधानकारक नसल्याचे लक्षात येते. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्वयंरोजगार करणाऱ्यांचे प्रमाण हे पुरुष व स्त्री या दोन्हीच्या बाबतीत वाढत आहे. स्वयं रोजगारितांमधील बहुतांश वर्ग हा असंघटीत क्षेत्रात मोडतो.

सोबतच्या आकृतीवरुन स्पष्ट होते की, किरकोळ/दैनिक स्थितीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण वर्ष २०१०-११ व २०११-१२ या एका वर्षात ३०.६% वरुन ३७.०% झाले म्हणजे त्यामध्ये ७%ची वाढ एका वर्षात झाली. याचे महत्वाचे कारण, कायमस्वरुपी रोजगाराचे घटलेले प्रमाण हेच आहे. असंघटीत क्षेत्रामध्ये स्वयंरोजगारितांचा हिस्सा देखील सातत्याने वाढत आहे.

आकृती १: राज्यातील श्रमशक्तीची विभागणी
वर्ष: २०१०-११




आकृती २: राज्यातील श्रमशक्तीची विभागणी
वर्ष: २०११-१२




वरीलप्रमाणे स्वयंरोजगारीत कामगारांचे प्रमाण एका वर्षात ३% हुन अधिक वाढले. श्रम बाजारामध्ये नियमित रोजगाराच्या संधीतील घट तसेच इतर प्रकारच्या रोजगारातील व रोजगारक्षम कौशल्याचा अभाव यामुळे किमान जगता तरी यावे यादृष्टीने स्वयंरोजगार करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे.

नियमित वेतनावर काम करणाऱ्या रोजगाराचे प्रमाण वरील एका वर्षात १०% नी घटले. ही घट सातत्याने होत असल्यामुळेच स्वयंरोजगारीत व किरकोळ/ दैनिक रोजगारात वाढ होत असल्याचे स्पष्ट होते.

## महाराष्ट्रातील कामगार कल्याण योजना:

महाराष्ट्राने सुरुवातीपासूनच श्रमिकांविषयी सकारात्मक भूमिका घेऊन कामगार कल्याण विषयक विविध योजना राबविण्यात पुढाकार घेतला आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटीत कामगारांसाठी व त्यांच्या कुटूंबांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी कायदे करुन विविध कल्याण मंडळे आज महाराष्ट्रात कार्यरत आहेत त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे :

## घरेलू कामगार कल्याण मंडळ :

घरेलू कामगारांच्या हितरक्षणासाठी, त्यांच्या कल्याणास चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २००८ मध्ये 'महाराष्ट्र घरेलु कामगार कल्याण मंडळ अधिनियम' संमत केला. हा नियम म्हणजे असंघटीत क्षेत्रातील दुर्लक्षित कामगार वर्गाच्या हितासाठी उचललेले एक प्रागतिक पाऊल आहे. या अधिनियमाच्या कलम २८ पोटकलम (१) नुसार घरेलू कामगार कल्याण मंडळ ऑगस्ट २०११ मध्ये स्थापन केले आहे. हे मंडळ त्रिपक्षीय असून त्यामध्ये कामगार, मालक व शासन यांचे प्रतिनिधी आहेत.

घरेलू कामगार याचा अर्थ घरेलू काम

करण्याकरिता ठेवण्यात आलेला कामगार असा आहे. घरेलू कामामध्ये झाडलोट करणे, भांडी घासणे, कपडे धुणे, स्वयंपाक करणे, लहान मुले व वृद्ध व्यक्तींना सांभाळणे, यासारखी घरगुती कामे तसेच मालक व घरेलु कामगार यांनी परस्पर सहमतीने ठरविलेली शारिरीक कष्टाची कामे इ. या अधिनियमानुसार राज्य शासनास जिल्ह्यातील घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी योजना तयार करण्यासाठी व त्या कार्यान्वित करण्यासाठी राजपत्रातील अधिसुचनेनुसार अनेक जिल्ह्यात घरेलू कामगार कल्याण मंडळे स्थापन करता येऊ शकतात. मंडळ स्थापन झाल्यानंतर घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी खालील कार्ये करणे अपेक्षित आहे. घरेलू कामगारांची या अधिनियमाखाली प्रथम लाभार्थी म्हणून नोंदणी करणे, अपघात घडल्यास लाभार्थीला तात्काळ साहाय्य पुरविणे, लाभार्थींच्या मुलाच्या शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देणे, महिला लाभार्थीकरिता प्रसुती लाभाची तरतुद करणे, लाभार्थीचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या कायदेशीर वारसाला अंत्यविधीच्या खर्चासाठी रक्कम प्रदान करणे, मंडळाने वेळोवेळी निश्चित केलेले इतर लाभ तसेच निधीची निर्मिती करणे आणि त्याचा व्यवहार पाहणे इ.

### बिडी कामगार कल्याण निधी:

बिडी कामगार कल्याण निधी अधिनियम १९७६ नुसार बिडी कामगारांच्या कल्याणासाठी निधी गोळा केला जातो. बिडी उद्योग हा श्रमाधारित व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांमध्ये या उद्योगाचा विस्तार आहे. सोलापुर सह नगर, नाशिक, भिवंडी, नांदेड, कामठी, गोंदिया या भागात सुमारे ४ लाख कामगार कुटुंबांची उपजिविका बिडी मजुरीवर चालते. तसेच महिलांना या व्यवसायात मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो. कल्याण निधी हा प्रामुख्याने बिडी कामगारांच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, स्वच्छ पिण्याचे पाणी, शैक्षणिक सुविधा, त्यांच्या रहाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी गृहबांधणी प्रकल्प उभारुन अत्यंत सवलतीच्या दरात त्यांना घरे उपलब्ध करुन दिली जातात. पुणे व सोलापूर याठिकाणी बिडी कामगारांना राहण्यासाठी अत्यंत कमी किंमतीत घरे उपलब्ध करुन दिली आहेत.

### महाराष्ट्रातील माथाडी मंडळे:

असंघटीत क्षेत्रातील असंरक्षित माथाडी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी, त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी देशामध्ये पहिल्यांदा महाराष्ट्राने पुढाकार घेतला आणि १९६९ मध्ये 'महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजिवी कामगार (रोजगार नियमन व कल्याण) अधिनियम विधानसभेत संमत करुन घेतला. आज या अधिनियमाअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ३४ माथाडी मंडळे कार्यान्वित आहेत आणि सुमारे २ लाख माथाडी कामगारांना या मंडळामार्फत लाभ मिळवून दिले जातात. एकूण ८३ हजार ५८३ मालकांची नोंदणी

या माथाडी मंडळामध्ये झाली आहे. माथाडी कामगारांचे काम हे अतिशय कष्टाचे असते. परंतु माथाडी मंडळांमार्फत या माथाडी कामगारांना संरक्षण देण्यात यश आले आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार माथाडी कामगारांच्या वेतनाव्यतिरीक्त मंडळाकडे ठराविक प्रमाणात 'लेव्ही' स्वरुपात रक्कम जमा करावी लागते. मालकांकडून मिळालेल्या 'लेव्हीतुन' कामगारांना प्रॉव्हीडंड फंड, ग्रॅच्युएटी, बोनस व इतर फायदे मिळवून दिले जातात. माथाडी कामगारांना राहण्यासाठी अल्पदरात घरांची उपलब्धता करुन देण्यात येत आहे. तसेच आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यासाठी काही हॉस्पिटल्स देखील निर्माण केली आहेत. या कामगारांना आणखी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी शासन विचार करीत असून आवश्यकता वाटल्यास अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचा विचार शासन करीत आहे.

### महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळे:

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (रोजगार नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ अंतर्गत सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत आहेत. सध्या राज्यामध्ये ६ सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत असुन त्याअंतर्गत जवळपास ३२ हजार सुरक्षा रक्षक काम करतात. सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षकांच्या रोजगाराचे नियमन केले जाते. तसेच त्यांना विविध योजनांच्याद्वारे सामाजिक सुरक्षिततेचे लाभ पुरविले जातात. मंडळामार्फत त्यांचे वेतन व इतर शर्ती ठरविल्या जातात, अलिकडे कामगार व्यवस्थापन प्रणालीमार्फत मालकांनी त्यांचे वेतन चेकद्वारे करण्याचे बंधनकारक केले आहे.

### बाल कामगार निर्मुलन व पुनर्वसन - राज्य कृती आराखडा:

असंघटीत क्षेत्रातील बालकामगार ही तर अत्यंत गुंतागुंतीची आर्थिक व सामाजिक समस्या आहे. बालकामगार निर्मुलनासाठी सध्या विविध स्तरावर प्रयत्न चालू आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेनेदेखील यासाठी अनेक पातळीवर प्रयत्न सुरु केले आहेत. देशपातळीवर भारत सरकारने १९८६ मध्ये बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा करुन बाल कामगार निर्मुलनाच्या दृष्टीने सुरु केलेले कायदेविषयक ठोस पाऊल उचलले व अनेक उपक्रम हाती घेतले. 'बाल कामगार मुक्त महाराष्ट्र' करण्यासाठी शासन स्तरावर अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. बालकामगार ही अनिष्ट प्रथा दूर करण्याच्या उद्देशाने कामगार आयुक्तांच्या नियंत्रणाखाली शासनाच्या संबंधीत विभागाचे (कामगार विभाग, गृह विभाग, महिला व बालकल्याण विभाग) अधिकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना विभाग यांचे अधिकारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी यांचे एकत्रित कृती दल २००५ मध्ये स्थापन करण्यात आले या कृतीदलाने धाडसत्रे आयोजित करुन हजारो बालकामगारांची सुटका केली. कृतीदलाच्या या उल्लेखनिय कामकाजाची दखल संपुर्ण

देशाने घेतली. मुंबईच्या कृतीदलाच्या धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र कृती दलाची निर्मिती व त्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी कृती दले गठीत करण्यात आली आहेत. पुढे शासन निर्णय ३ जुलै २००७ नुसार बालकामगार निर्मुलन व पुनर्वसन राज्य कृती आराखडा तयार करण्यात आला असुन त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

**इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ :**

केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ नुसार महाराष्ट्राने इमारत व इतर बांधकाम कामगारांना कल्याणकारी सुविधा व सामाजिक सुरक्षितता पुरविण्यासाठी कल्याणकारी मंडळाची निर्मिती केली आहे. मंडळाला पुरेसा निधी मिळावा व कामगारांना चांगल्याप्रकारे कल्याणकारी योजनांचा फायदा करुन देण्यासाठी कोणत्याही बांधकाम प्रकल्पाच्या एकुण खर्चाच्या १ टक्का रक्कम अधिभार म्हणून कल्याण मंडळाला जमा करण्याचे बंधन अधिनियमामध्येच करण्यात आले आहे. कल्याण मंडळाने इमारत व बांधकाम कामगारांसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने, प्रसुतीविषयक लाभ, कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक मदत, स्कॉलरशिप, वैद्यकिय मदत, अपंगत्व आल्यास मदत तसेच नैसर्गिक अथवा अपघाती निधन झाल्यास आर्थिक सहाय्य इ.

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ :**

कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कामाच्या ठिकाणाबाहेर कामगार कल्याण मंडळामार्फत अनेक कामगार कल्याण योजना गेल्या ७३ वर्षापासून राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तत्कालीन मुंबई राज्यात १९३८ मध्ये मुंबई शहरामध्ये ना. म. जोशी मार्ग येथे पहिले कामगार कल्याण केंद्र स्थापन करुन बहुसंख्येने कामगार राहत असलेल्या कामगार वस्तीत कल्याणकारी योजना राबवायला सुरुवात झाली पुढे १९५३ मध्ये मुंबई शासनाने 'मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम तयार करुन स्वतंत्र वैधानिक मंडळाची स्थापना केली. कामगार कल्याण निधीसाठीचा मुख्य स्त्रोत म्हणजे कामगार, मालक व शासन यांची त्रिपक्षीय वर्गणी. या मंडळाचा फायदा संघटीत क्षेत्रातील कामगारांना अधिक प्रमाणात होतो. परंतु अलिकडे असंघटीत क्षेत्रातील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना देखील लाभ मिळावेत यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. सध्या या मंडळाची २३२ कामगार कल्याण केंद्रे महाराष्ट्राच्या विविध भागात कार्यरत आहेत. याशिवाय ग्रामीण केंद्रे, सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरातील समिती पद्धतीवर सुरु करण्यात आलेली केंद्रे, आदिवासी विभागातील केंद्रे तसेच ज्या कामगार विभागात नियमित

स्वरुपाची केंद्रे नाहीत अशा कामगार वसाहतीमधून 'कामगार वसाहतीतील कल्याण कार्य' या सदराखाली काही प्रासंगिक स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विविध कामगार कल्याण केंद्रांमध्ये जे कल्याणकारी उपक्रम राबविले जातात त्यामध्ये मुख्यतः मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रम, आंतरगृह व मैदानी खेळ, सामुदायिक व सामाजिक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यवसाय प्रशिक्षण, विविध प्रमाणपत्र शिक्षण वर्ग, लोक प्रबोधनाचे कार्यक्रम इ. या सर्व कल्याणकारी उपक्रमांतून सुजाण, सुसंस्कृत व आदर्श कामगार घडविण्याचे कार्य या मंडळामार्फत सातत्याने केले जाते.

वरीलप्रमाणे अनेक कल्याणकारी मंडळामार्फत असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी वेगवेगळे कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबविले जातात तसेच भारत सरकार पुरस्कृत सामाजिक सुरक्षिततेच्या योजनाही महाराष्ट्र शासन राबविते. त्यामध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकालीन निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब कल्याण योजना, जननी सुरक्षा योजना, हातमाग विणकरांसाठी व्यापक कल्याण योजना, जनश्री विमा योजना, आम आदमी विमा योजना, राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना इ. अलिकडेच महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने सुरु केलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही सुद्धा बहुतांश असंघटीत कामगारांना लागु होते तर देशामध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र सरकारच्या कामगार विभागाने 'कामगार व्यवस्थापन प्रणाली तयार केली असुन या प्रणालीमार्फत ज्या कामगारांचे पगार रु. ३,०००/- पेक्षा अधिक आहेत अशा सर्व संघटीत, असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे पगार हे धनादेश/बँकेमार्फत करण्याचे सक्तीचे केले आहे. सर्व आस्थापना मालकांना त्यांचा परवाना, परवाना नुतनीकरण, नोंदणी तसेच कामगारांचे पगार या यंत्रणेमार्फतच होणार. सध्या ही यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर सुरु आहे. याच्या यशस्वीतेनंतर संपुर्ण महाराष्ट्रासाठी लागू करण्यात येणार आहे.

## असंघटीत श्रमिकांच्या कल्याणासाठी आणखी काही उपाययोजना :

संपूर्ण महाराष्ट्रातील श्रमिकांना संरक्षण पुरवून त्यांना अधिक उत्पादक व कार्यक्षम बनविण्यासाठी कल्याणकारी कार्यक्रमांना आणखी महत्व देण्याची गरज आहे. श्रमिक हा केवळ उत्पादन खर्चाचा एक भाग म्हणून न पाहता ती एक दीर्घकालीन उत्पादक गुंतवणूक आहे या दृष्टीकोनातुन पाहिले पाहिजे. आतापर्यंत महाराष्ट्रामध्ये अनेक कल्याणकारी योजना विविध कल्याण मंडळामार्फत राबविण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु सर्वसमावेशक चिरस्थायी विकासाच्या प्रकियेत कामगार कल्याणासाठी खालील बाबींचा विचार होणे अपेक्षित आहे.

१) केंद्र शासनाने असंघटीत कामगारांसाठीचा सामाजिक सुरक्षितता कायदा - डिसेंबर २००८ मध्ये पारित

केला आहे परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये यासंबंधी अद्याप सामाजिक सुरक्षितता मंडळ तयार केलेले नाही. तेव्हा या अनुषंगाने मंडळ स्थापन करुन विविध लक्ष्य समुहनिहाय सामाजिक सुरक्षितता योजना तयार करुन त्या योग्यरितीने राबविण्याची गरज आहे.

२) आंतरराष्ट्रीय श्रम संघटना व इतर काही तज्ज्ञांच्या मते एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ५ टक्के खर्च हा कामगारांच्या कल्याणासाठी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी होणे आवश्यक आहे. तेव्हा अर्थसंकल्पीय तरतुदीत कामगार कल्याणावर किमान ५ टक्क्यांची तरतुद करुन कल्याणकारी बाबींवर खर्च होण्याची आवश्यकता आहे.

३) राष्ट्रीय रोजगार धोरणांमध्ये असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांना कामाच्या योग्य स्थितीबाबत व योग्य कामासंबंधी (Decent Work) ची चौकट निश्चित करण्याची गरज आहे.

४) श्रमाधारित उद्योग व्यवसायांना सरकारने संरक्षण देऊन त्यांच्या विस्तारासाठी व विकासासाठी चालना देण्याची गरज आहे. तसेच छोटे उद्योजक व स्वयंरोजगारितांना आवश्यक सहकार्य करुन त्यांना उद्युक्त करावे.

५) बाजाराधिष्ठीत कौशल्यावर भर देऊन श्रमिकांमध्ये रोजगार क्षमता विकसित करण्यावर भर द्यावा.

६) श्रमिकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आरोग्य, शिक्षण, वास्तव वेतन, रोजगाराची गुणवत्ता यासारख्या मुलभूत घटकांवर भर दिला पाहिजे.

७) असंघटीत श्रमिकांना किमान वेतनाची सुरक्षितता देण्यासाठी किमान वेतन अधिनियम महत्वपूर्ण आहे परंतु या कायद्याच्या अनुसुचित समाविष्ट असणाऱ्या रोजगारांनाच तो लागू होतो. तेव्हा सर्व श्रमिकांना याचे संरक्षण मिळवून देण्यासाठी अनुसुचित रोजगाराची मर्यादा काढून टाकल्यास या कायद्यानुसार सर्वच कामगारांना किमान वेतनाचे संरक्षण मिळेल.

भारतीय राज्यघटनेतील सुचीनुसार कामगार हा सामायिक सुचीतील विषय असल्यामुळे आतापर्यंत कामगार वर्गाच्या संरक्षणासाठी व त्यांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर अनेक कामगार कायदे करुन कामगारांच्या कल्याणासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. अनेक सामाजिक सुरक्षिततेच्या योजना राबविल्या परंतु जागतिकीकरणाच्या प्रवाहात श्रम जगतामध्ये वेगाने बदल होत गेले. असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांची संख्या वाढतच आहे. बहुतांश ठिकाणी कामगारांचे कंत्राटीकरण, नोकरीची असुरक्षितता, उत्पन्नाची असुरक्षितता यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. किमान रहाणीमान टिकवता यावे यासाठी स्वयंरोजगारीतांचा वर्ग वाढत आहे. कुशल व अकुशल

कामगारांमधील अंतर मोठ्या प्रमाणात वाढत आहे, तसेच दोन्हीमधील वेतनातही मोठी विषमता निर्माण होत आहे. म्हणूनच गरज आहे ती राज्यातील श्रमशक्ती विकासाला पुरक कशी होईल याचा विचार करण्याची व त्याअनुषंगाने रोजगार पुरक विकास धोरणे राबवुन आर्थिक-सामाजिक विकास व कामगार कल्याण साधण्याची. आर्थिक, सामाजिक व वित्तीय विकासाच्या प्रकियेत राज्याच्या उत्पन्नाच्या वाढीबरोबर श्रमिक जगताच्या रहाणीमानात व त्यांच्या कल्याणात वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी केंद्रिय पातळीवर काम करणाऱ्या तसेच राज्यातील इतर सर्व छोट्या-मोठ्या कामगार संघटनांनी असंघटीत श्रेत्रातील कामगार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी, त्यांच्या संरक्षणासाठी एकत्र येण्याची गरज आहे. तसेच कल्याणकारी विकासाचे प्रारुप स्विकारलेल्या राज्यात कामगार कल्याण केंद्रीत (Labour Welfare Centric) विकास झाला पाहिजे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक चिरस्थायी गतिमान विकास हे बाराव्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी श्रमशक्ती (मनुष्यबळ) विकास हा महत्वाचा अजेंडा असला पाहिजे असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

संदर्भ सूची:


1. Jafa V.S. *'Labour and Employment scenario in the 21st Century* (2001), New Century Publications, Delhi
2. Jayan Jose Thomas, *'Labour in the New Economy - An Indian Perspective*, The Indian Journal of Labour Economics, Vol. 48, No. 4, Oct-Dec 2005.
3. Indian Labour Journal, GOI, Labour Bureau, Vol. 51, Sept. 2010 No. 9.
4. Ministry of Labour and Employment, GOI, Annual Report - 2009-10, 2010-11.
5. Revised Draft Policy of Govt. of Maharashtra, 2011
6. Trivedi V.K., *'Unorganised Sector Labour and Legislative Protectgion'* Awards Digest, Journal of Labour Legislation, Vol. XXXIII, 3-4 March-April 2007.
7. Unorganised Sector, AITUC Education Series - 3 (1997) AITUC Publication, New Delhi.
8. www.mahashram.com

९. डॉ. राजन तुंगारे, डॉ. पी. एम. कडुकर, *'भारतीय असंघटीत क्षेत्र आणि सामाजिक सुरक्षितता - एक व्यष्टी अध्ययन*, अर्थमंथन, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन - २०१०.

१०. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, २००७ ते २०१२.

११. बालमजुरी निर्मुलनार्थ माहिती पुस्तिका, कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# स्थूल देशांतर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा
## भारत व चीन तुलनात्मक अभ्यास

**सुधीर यशवंत शेसभरे, पलूस,**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जि. सांगली,
भ्रमणध्वनी: ९४२११२७१४१

सध्या भारताचा स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर हा घटताना दिसतो. यास कारणीभूत २००७ पासून सतत घटत जाणारा औद्योगिक उत्पादन वाढीचा दर सन २०१२ मध्ये ३.४९% होता. तो २०१३ मध्ये ३.१२ % होण्याचा अंदाज (Planning Commission Govt. of India 2013 Data) व्यक्त केला आहे. तसेच सन २०१० पासून सेवा क्षेत्रातील वाढीचा दर सतत घटत आहे. सन २०१२ मध्ये ८.२० % (CSO, RBI 2013) होता तो सन २०१३ मध्ये ६.५९ % होण्याचा अंदाज (Planning Commission Govt of India 2013 Data) व्यक्त केला आहे. तसेच भारताची निर्यात घट, व आयात वाढ, अपयशी शेअर बाजार रुपयाची घसरण, परकीय गंगाजळीत होणारी घट, वित्तीय तुटीतील वाढ इ. कारणांमुळे भारताचा स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सन २०१० मध्ये १०.५ % होता तो सन २०१२ मध्ये ३.२ % इतका अल्प राहीला आहे. सद्यस्थितीला स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने एकमेव क्षेत्र रहाते, ते म्हणजे कृषी क्षेत्र होय. शेती उत्पादन वाढीच्या दरात वृध्दी घडवून आणल्यास भाववाढीवर नियंत्रण, निर्यात वाढ, आयात घट, करून घसरणाऱ्या रुपयामध्ये स्थैर्य आणता येईल. तसेच औद्योगिक क्षेत्र विस्तारण्याचे कार्य हे शेतीच्या माध्यमातूनच करता येइल. या सर्व घटकांचा परिणाम भारताचा स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा दर वाढेल व हे भारताला महासत्ता बनण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. या दृष्टिकोनातून भारताच्या शेती क्षेत्राची चीनच्या शेती क्षेत्राशी तुलना करून भारताच्या शेती क्षेत्रातील कमतरता व त्यावरील उपाय योजना या संदर्भात आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

१. चीन व भारत देशातील स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या दराचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. चीन व भारत शेती क्षेत्रातील उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. चीन संदर्भात भारतातील शेती क्षेत्रातील कमतरतेचा अभ्यास करणे.

४. भारताच्या शेती उत्पादन वाढी संदर्भात उपाय सुचविणे.

५. स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढी संदर्भात शेती उत्पादन वाढीचे महत्व स्पष्ट करणे.

**सिध्दांत कल्पना:**

'शेती उत्पादनात वाढ घडवून आणल्यास स्थूल देशातर्गत उत्पादनात वाढ घडून येईल'

GDP=F (Growth of Agri. production )

GDP = स्थूल देशांतर्गत उत्पादन.

F = फलनात्मक संबंध

Growth of Agri.production = शेती उत्पादन वाढ.

**अभ्यास पध्दती:**

भारत व चीन या दोन्ही देशातील स्थूल देशातर्गत उत्पादन चीन भारत शेती क्षेत्रातील उत्पादकता, शेत जमीन, शेतीमधील यांत्रिकीकरण, शेतीमधील संशोधन व विकास तसेच गुंतवणूक यासंबंधीची माहिती The World Bank, Planning Commission Govt of India, Central Statistical Organisation (CSO), Food and Agriculture Organisation (FAO), या दुय्यम साधन सामग्री वरून गोळा केली आहे व तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी Statistical Tools चा वापर केला आहे.

**चीन भारत तूलनात्मक अभ्यास:**

अशिया खंडात क्षेत्रफळाने मोठे आणि शेजारी असणारी राष्ट्रे म्हणजे चीन आणि भारत. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या या देशांमध्ये असल्याने जगातील सर्वात मोठी बाजार पेठ या दोन देशामध्ये आहे. चीन आणि भारत हे कृषीप्रधान देश असल्याने २/४ पेक्षा जास्त लोकसंख्या शेती क्षेत्रात सामावलेली आहे. सन १९८० पासून चीनने तर १९९१ पासून भारताने आर्थिक सुधारणांना सुरुवात केल्याने यांचा आर्थिक विकासाचा दर सतत वाढत आहे. त्यामुळे हे देश आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल करीत आहेत. वरील साधर्म्यांचा विचार करून हे दोन देशाची तुलना करण्यासाठी निवडले आहेत.

परंतु वरील गोष्टीच्या संदर्भात दोन्ही देशांमध्ये साम्य दिसून येत असले तरी भारत हा देश चीनच्या पुढील घटकांच्या बाबतीत फारच मागे आहे.

**स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर:**

सन २००३ ते २०१२ या १० वर्षाच्या कालखंडातील चीन व भारत देशातील स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीची तुलना करता येईल. सन २००३ ते २०१२ या कालखंडाच्या दरम्यान सन २०१० या वर्षाचा अपवाद वगळता चीन चा स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर कायमच भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या दरा पेक्षा जास्त होता. १० वर्षाच्या कालखंडात सन २००७ मध्ये चीनचा वृध्दी दर सर्वात जास्त (१४.२ % ) इतका तर भारताचा १० वर्षाच्या कालखंडात २०१० मध्ये सर्वाधिक (१०.५ %) वृध्दीदर राहीला आहे. दोन्ही देशातील स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीची १० वर्षातील सरासरी घेतली असता चीनची सरासरी वृध्दीदर हा १०.४६ % तर भारताची सरासरी वृध्दी ७.६५ % आहे. तर सध्याचा भारताचा स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर हा फक्त ३.२ % इतका अल्प राहीला

आहे. याचे कारण म्हणजे औद्योगिक उत्पादन वाढीच्या दरात व सेवा क्षेत्रातील वृध्दी दरात सतत होणारी घट होय. म्हणून माजी गव्हर्नर डॉ.सी. रंगराजन यांच्या मते "कृषी क्षेत्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन असेल व अर्थव्यवस्थेला तारण्याची क्षमता ही कृषी क्षेत्रातच असेल" भारताला स्थूल देशांतर्गत वाढीचा दर चीनच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या प्रमाणात साध्य करावयाचा असेल तर शेती विकासाला महत्त्व देणे गरजेचे आहे.

### शेतजमिनीतील उत्पादन:

शेती उत्पादन वाढीचा दर हा शेतीतील उत्पादकतेवर अवलंबून आहे. शेत जमिनीची प्रति हेक्टर उत्पादकता जास्त असेल तर शेतीतले उत्पादन जास्त राहील आणि प्रतिवर्षी उत्पादनात वाढ घडवून येत असेल तर स्थूल देशातर्गत उत्पादन वाढीचा दर वाढत जाईल. म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर हा शेतीजमिनीच्या उत्पादकतेवर अवलंबून आहे. शेतजमिनीतील उत्पादकता वाढल्यास स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर जास्त होईल. भारताची चीनच्या जमिनीच्या उत्पादकतेशी तुलना पुढील Food and Agriculture Organisation (FAO) ने दिलेल्या आकडेवारीवरून करता येईल.

सन २००३-२००५ दरम्यान चीनची प्रतिहेक्टरी तांदुळ उत्पादकता ६२३३ कि.ग्रॅ. तर भारताची तांदुळ उत्पादकता ३०३४ कि.ग्रॅ प्रति हेक्टरी होती. चीन ची प्रति हेक्टरी गहू उत्पादकता ४१५५ कि.ग्रॅ तर भारताची गहू उत्पादकता प्रति हेक्टरी २६८८ कि.ग्रॅ तेलबियाच्या संदर्भात चीनची प्रतिहेक्टरी उत्पादकता १७७८ कि.ग्रॅ तर भारताची ९०९ कि.ग्रॅ इतकी आहे. भाजीपाला फळे यांचे चीन मध्ये ४५० मिलीयनला इतके उत्पादन निघते तर भारतात १३५ मिलीयनला इतके उत्पादन निघते. यावरून चीनच्या उत्पादकतेची तुलना केली असता भारताची उत्पादकता निमपट असल्याचे स्पष्ट होते. उत्पादकता कमी असेल तर स्थूल देशांतर्गत उत्पादन कमी राहील. चीनची उत्पादकता जास्त असल्याने स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढत आहे. यासाठी भारताने शेती उत्पादकेतेत वाढ घडवून आणणे गरजेचे आहे.

### शेतजमीन आणि यांत्रिकीकरण:

शेतीतील उत्पादन वाढीसाठी शेतजमीन व शेतजमिनीवरील यांत्रिकीकरण सर्वात महत्त्वाचे घटक आहेत. शेत जमीन आणि यांत्रिकीकरणाच्या संदर्भात भारताची चीनशी सन २००७-०८ मध्ये Economic Advisory Council ने दिलेल्या आकडेवारी वरून तुलना करता येइल.

सन २००७-०८ मध्ये चीनची शेत जमीन १६१ मिलीयन हेक्टर तर भारताची १३० मिलीयन हेक्टर इतकी शेतजमीन आहे. म्हणजेच चीनची शेत जमीन ही भारताच्या दुप्पट आहे. साहजिकच शेत जमीन जास्त असेल तर शेतीतील उत्पादन जास्त राहून स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढते. शेतीमधील यांत्रिकीकरणाचा परिणाम हा उत्पादकतेवर होत असतो. भारताची चीनच्या यांत्रिकीकरणासंदर्भात तुलना केली असता चीन मध्ये १००० हेक्टर मागे १५.७ ट्रॅक्टर आहेत. तर भारतात १००० हेक्टर मागे निव्वळ ७ ट्रॅक्टर आहेत.

### संशोधन व विकास केंद्रे:

शेती विकासासाठी संशोधन व विकास केंद्रे महत्त्वाची ठरतात. शेतीमधील नवीन संशोधनामुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढते.

China Agriculture Year book २००५ मधील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, चीनने सन २००६ मध्ये शेती संशोधनासाठी $ १.५ बिलीयन इतकी रक्कम खर्च केली असून १००० नवीन संशोधन व विकास केंद्रे स्थापन केली आहेत. या केंद्रांमधून २०४६ नवीन रोपांची जाती असणाऱ्या अर्जाचे मूल्यमापन केले आहे. चीन मधील संशोधन केंद्रे खासगी कंपनीशी संबधित राहून संशोधन कार्य करतात. संशोधकाचा पगार हा संशोधन कार्याशी जोडला आहे.

भारतात मात्र संशोधन कार्याच्या बाबतीत याउलट स्थिती असलेली दिसून येते. हरित क्रांती नंतर भारतात तेलबिया डाळी व बी-बियाण्ङ्काच्या उत्पादनात कोणताच बदल घडून आला नाही. तसेच शेतीसंशोधनास दिलेल्या रकमेपैकी ९० % कर्मचाऱ्ङ्कांच्या वेतनावर खर्च होते तर ३ % रक्कम फक्त संशोधनावर खर्च होते.

**पायाभूत सोयी:**

ग्रामीण भागातील पायाभूत सोयीत (वीज, पाणी, रस्ते, वाहतूक, दळण वळण, शिक्षण, आरोग्य) वाढ करणे म्हणजे शेतीचा विकास करणे होय. चीनने ग्रामीण भागातील पायाभूत सोयी मध्ये सन २००६ मध्ये $ २० बिलीयन इतकी रक्कम खर्च कली आहे. यात ३२५०० कि.मी. रस्ते, गोदामे, बाजार सुविधा निर्मिती केली आहे. भारतात अद्यापही ग्रामीण भागातील रस्ते मुख्य रस्त्यांशी जोडले गेले नाहीत.

**समारोप:**

वरील तुलनात्मक अभ्यासावरून असे स्पष्ट होते की चीनने भारताच्या मानाने शेतीतील उत्पादकता, शेतजमीन, यांत्रिकीकरण, शेती संशोधन व पायाभूत सुविधांच्या बाबतीत दुप्पट प्रगती केली आहे त्यामुळे चीनचा स्थूल देशातर्गत उत्पादन वाढीचा दर भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे. भारतानेही शेती मधील असणाऱ्या उणिवा भरून काढल्यास म्हणजेच शेती उत्पादकतेत वाढ, शेतजमीन लागवडीखाली वाढ, वीज व पाणी पुरवठ्याच्या सोयीत वाढ, उत्पादन खर्चाच्या प्रमाणात किंमत, स्वस्त दराने कर्ज पुरवठा तसेच पायाभुत सोयी निर्माण करण्यासाठी सरकारने पुरेशा प्रमाणात गुंतवणूक केल्यास येणाऱ्या पुढील वर्षात शेती उत्पादनातील वाढ ही स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर वृध्दिंगत करण्यात फारच भरीव कार्य करेल.

**संदर्भसूची:**


1) Dr. S.Vijaykumar (2012) *Comparative study of Agriculture in India*, China and U.S.
2) Data Sundaram, Indian Economy
3) World Bank National Accounts data and OECD National Accounts date files (2012).
4) Govt. of India Ministry of Finance (2011-12): *Economic survey* Oxford University press.
5) C. Rangarajan (2007-08) : Economic Advisory Council.
6) Planning Commission Govt. of India 2013: *Data for Use of Deputy Chairman Planning Commission.* (http//planning commission gov.in )

# ग्रंथ परीक्षण

# फ्रँकलिन रुझवेल्ट

## अमेरिकेचा तारणहार ठरलेल्या जिद्दी नेत्याची यशोगाथा


**मंजुषा मुसमाडे, पुणे,**

नौरोसजी वाडिया कॉलेज

भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२५


*(ग्रंथ लेखिका-ज्योत्स्ना लेले(२०११), राजहंस प्रकाशन प्रा. लि. पुणे)*

अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष बराक ओबामा यांची ज्यांच्याशी तुलना केली जाते ते अमेरिकेचे ३२ वे अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या जीवनकार्याचा मागोवा प्रस्तुत ग्रंथात घेतलेला आहे. हे दोघेही डेमॉक्रॅटिक पक्षातर्फे निवडणूक लढवणारे राष्ट्राध्यक्ष होते. या प्राथमिक समस्येबरोबरच दोघांनीही अमेरिकेच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली व हेही साम्य महत्त्वाचे आहे. ओबामा हे रुझवेल्ट यांचा अतूट निर्धार व धडक कृती करून परिस्थितीवर मात करण्याचा वारसा पुढे चालवतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे रुझवेल्ट यांचे हे चरित्र इतिहासाचा वेध घेत वर्तमान व भविष्यातील अमेरिकेचेही दर्शन अनुमान बांधण्यास उपयुक्त ठरू शकते.

पुस्तकात उपसंहारासह १४ प्रकरणे आहेत. शेवटी संदर्भग्रंथांची सूची दिली आहे. सुरूवातीच्या काही प्रकरणात रुझवेल्ट यांचे खाजगी जीवन, यांचा राजकारणातील प्रवेश व यशस्वी घोडदौड चित्रीत केले आहे. प्रौढ वयात रुझवेल्टना पोलिओने पांगळे केले. त्यावर त्यांनी कशी मात केली हे प्रभावीपणे सांगितले आहे.

परंतु खऱ्या अर्थाने चरित्रनायकाचे चित्रण १९२९ च्या आर्थिक महामंदीच्या टप्प्यापासून दिसून येते.

**महामंदी:**

२४ ऑक्टोंबर १९२९ गुरूवार या दिवशी न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजमध्ये जी अभूतपूर्व पडझड झाली त्यामुळे इतिहासात हा काळा गुरुवार म्हणून कुविख्यात आहे. गुंतवणुकदारांचे दाबेलियन (४०० कोटी डॉलर) बुडाले होते. ११ सुप्रसिद्ध

गुंतवणुकदारांनी नुकसानीमुळे आत्महत्त्या केल्या. १५०००००० (एक कोटी पन्नास लाख) लोकांचा देशाच्या सुस्थितीवरचा विश्वास उडाला व लोकांनी आपले शेअर्स विकायला काढले. १९२७ मध्ये सुरू झालेल्या म्युच्युअल फंडचे बारा वाजले. २९ ऑक्टोंबर १९२९ या एका दिवशी मोठ्या कंपन्याच्या भावात ५० टक्के घट झाली. लहान कंपन्यांचे शेअर्स विकलेच गेले नाहीत. १०० कोटी डॉलर्सचे लोकांचे नुकसान झाले. त्या एका विशिष्ट दिवशी एवढ्या लोकांमध्ये घबराट / असुरक्षितता का पसरली? या गोष्टीवर अजूनही अभ्यास होत आहे. लेखिकेने महामंदीचे केलेले हे वर्णन अतिशय प्रभावी झालेले आहे.

**मंदीची पार्श्वभूमी:**

यावेळी न्यूयॉर्कचे गव्हर्नर रुझवेल्ट होते तर राष्ट्राध्यक्ष रिपब्लिक पक्षाचे हर्बर्ट हुवर होते. राष्ट्राध्यक्षांचे मंदीच्या परिस्थितीवरील भाष्य दिशाभूल करणारे होते.

अमेरिकेतला बेकारीचा दर अंदाजे २५-३० टक्के होता. फ्रँकलिन यांचा वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी इतिहासाची मदत होते यावर विश्वास होता. परंतु लेखिकेने म्हटल्याप्रमाणे ही परिस्थिती कोड्यात टाकणारी होती. कारण १८१९, १८३७, १८५५, १८७३, १८९३ या सालातील आर्थिक मंदी इतकी तीव्र नव्हती.

लेखिकेने प्रो.रेमण्ड मोले या पात्राच्या तोंडून मंदीची कारणे स्पष्ट केली आहेत. ती म्हणजे - हंगामानुसार होणारे चढ उतार, यंत्रयुगामुळे मालाचे प्रचंड उत्पादन व मागणी अभावी मालाचे साठे पडून राहणे टाळण्यासाठी कारखानदार कारखाने बंद करून कृत्रिम टंचाई निर्माण करतात. त्यामुळे नोकर कपातीने झालेली बेकारी आणि नित्यप्रमाणे येणारी व्यापारी चक्रे.

रुझवेल्टने बेकारीच्या समस्येवर चर्चा करण्यासाठी वार्ताहर परिषद बोलावली. त्यामुळे न्यूयॉर्क हे एकमेव राज्य बेकारीशी झगडत आहे, हे अमेरिकेला जाणवले असे लेखिका म्हणते. मंदी व बेकारीला तोंड देण्यासाठी रुझवेल्ट यांनी अर्थतज्ज्ञांचे सल्ले घेतले. बेकारीच्या कारणांचा सखोल अभ्यास केला व एक आयोग नेमला. गव्हर्नर पदाची फेरनिवडणूक त्यांनी जिंकली. पुरेसा पैसा हाताशी नसतानाही फ्रँकलिनी *सरकार कुणालाही भुकेनं मरू देणार नाही* अशी जाहीर ग्वाही दिली व सरकारकडून १५ दशलक्ष (दीड कोटी) डॉलर मंजूर करून घेतले. स्वत: संतुलित अंदाजपत्रकाचे पुरस्कर्ते असूनही तुटीचे अंदाजपत्रक बनवायला संमती दिली. १,६०,००० लोकांना जमिनीचे संवर्धन, जंगल लागवड अशा प्रकारची कामे दिली. Trickle down सिद्धांतापेक्षा "Pull up" विचारसरणीवर भर दिला. आपल्या विचारांच्या प्रचारासाठी व जनतेचे मनोधैर्य टिकविण्यासाठी झंझावाती दौरे, रेडिओवरील भाषणे दिली. आपल्या पोलिओमुळे होणाऱ्या अपप्रचाराकडे रुझवेल्ट यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले व अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ते पूर्ण तयारीनिशी उतरले. हा संपूर्ण भाग लेखिकेने समर्थ शैलीत रंगविला आहे.

८ नोव्हेंबर १९३२ रोजी ते राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले. शपथविधी समारंभापूर्वीच त्यांच्यावर खुनी हल्ला झाला. परंतु त्यांचा सहकारी मारला गेला व ते वाचले. या प्रकरणात जलद न्यायदान व त्वरित अंमलबजावणी होऊन काही महिन्यातच मारेकऱ्याला फाशी दिली गेली. फ्रँकलिनना त्यामुळे लोकांचा आदर व प्रेम मिळाले

असे लेखिका म्हणते.

राष्ट्राध्यक्ष- काळोखातील वाटाड्या या प्रकरणात लेखिकेने रुझवेल्ट यांच्या राष्ट्राध्यक्ष कारकिर्दीचा सविस्तर आढावा घेतला आहे. राष्ट्राला उद्देशून पहिल्या भाषणातच त्यांनी लोकांची मने जिंकली. चाकाच्या खुर्चीत बसून केलेल्या भाषणाला पसंतीची पोच देणारी ४ लाख ६० हजार पत्रे आली.

**मंदीतले धोरण:**

सत्तेवर आल्यावर सर्वप्रथम 'Emergency' Banking Act पास झाला. बँका चार दिवस बंद ठेवल्या. सुवर्ण आयात निर्यातीवर बंदी घातली. उल्लंघन करणाऱ्यांना १० हजार डॉलर दंड व १० वर्षाची कैद अशी कडक शिक्षा करण्यात आली.

आपत्ती व्यवस्थापनाचे धोरण राबविताना रुझवेल्टनी आकाशवाणीवरून २७ प्रभावी भाषणे दिली. त्यामुळे त्यांना लोकांचा विश्वास संपादन करता आला व त्यांनी अडचणी सोसूनही सहकार्य केले.

United we stand ही आत्मविश्वासाने परिपूर्ण घोषणा रुझवेल्टच्या खंबीर मनोवृत्तीचे दर्शन घडवते. रुझवेल्ट प्रशासनाचे आरंभीचे १०० दिवस हा अनेक घटनांनी भरलेला, वेगवान असा अमेरिकेच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय झगमगता काळ होता असे इतिहासतज्ज्ञ म्हणतात हे वाचून त्यांच्या धडाडीची कल्पना येते.

National Youth Organization अंतर्गत २० लाख तरूणांना अर्धवेळ काम दिले गेले. यामुळेच ऑर्थर मिलर या प्रसिद्ध लेखकाला व रिचर्ड निक्सन या नंतरच्या राष्ट्राध्यक्षांना आपले शिक्षण पूर्ण करता आले. हा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. बेकारांबरोबरच शेतकरी घरे गहाण पडलेले लोक, भिकारी, लहान उद्योजक अशा विविध गटांना रुझवेल्टच्या Federal Emergncy Relief Administration ने मदत केली हे वाचून रुझवेल्टच्या धोरणाच्या व्याप्तीची कल्पना येते. १९३५ पर्यंत ३५ लाख लोकांना कामे, २० लाख लोकांना कामाऐवजी आर्थिक मदत, शिवणकामापासून विमानतळापर्यंत प्रकल्पाची व्याप्ती, रस्ते, पोस्ट, हॉस्पिटल, शाळा, मैदाने, कोलंबिया नदीवर ग्रँड कॉली धरण, कलाकारांसाठी शासकीय इमारतींवर म्यूरल, रंगकाम, ग्रामीण गीतांचे ध्वनीमुद्रण, प्रौढ शिक्षण वर्ग, ब्रेलमध्ये भाषांतर, शाळांमध्ये जेवण पुरवणे, गायन, नाटकाचे प्रयोग अशा अनेक मार्गांनी मदत दिली. यालाच (New Deal) असे नाव आहे.

येथे अमेरिकन मानसिकतेचा लेखिकेने केलेला उल्लेख महत्त्वाचा वाटतो. त्यांना घरबसल्या मदत नको होती. कामाचा मोबदला हवा होता.

येथे लेखिकेने विशेष तळटीप दिली आहे. ३-४ वर्षाच्या काळात केलेली कामे ही पाहिली की आपल्या मनात आपल्या देशातील परिस्थिती आणि त्यावर चाललेली उपाययोजना यांची तुलना आल्याशिवाय राहत नाही. त्यांच्यापेक्षा तिप्पट कालावधीत आपण एक टक्काही काम करू शकलेलो नाही. या शेऱ्याशी वाचकांचेही एकमत होईल यात शंका नाही.

मंदीविरोधी उपाययोजनांच्या अंमलबजावणीत रुझवेल्ट यांची पत्नी एलिनॉर यांचा सक्रिय सहभाग त्यांच्याइतकाच महत्त्वाचा होता, हे जागोजागी लक्षात येते. J M Keynes यांनी अनावृत्त पत्राद्वारे रुझवेल्ट यांना त्यांच्या

योजनेबद्दल मुक्तकंठानं स्तुती केली व काही सल्लेही दिले.

Irving Fisher: Quantity Theory of Money आधारित सोने खरेदी योजना राबविण्यात आली होती. ही केन्सच्या सल्ल्यामुळे थांबवली. याचे स्पष्टीकरण अर्थशास्त्राच्या परिभाषेत केलेले आहे. त्यामुळे एखाद्या कादंबरीप्रमाणेच अर्थशास्त्रावरील वैचारिक पुस्तक वाचत असल्याचा अधूनमधून भास होतो. एकाचवेळी ऐतिहासिक, मनोरंजनात्मक व आर्थिक वैचारिक भाष्य करणारे असे हे पुस्तक आहे.

रूझवेल्ट यांच्यासाठी Ford ने खास गाडी हाताने चालवण्याजोगी बनवली.

१२ एप्रिल १९४५ रूझवेल्टचे निधन झाले. आणखी जगले तर US-USSR शीतयुद्ध टळले असते. भारत अमेरिका संबंध अधिक मैत्रीपूर्ण असते असे लेखिका म्हणते. तज्ज्ञांचा अंदाज असा आहे की, जगाचा चेहरामोहरा बदलून टाकला असता. युद्धोत्तर जगात सर्व राष्ट्रांना स्वातंत्र्याचा लाभ व्हावा, समानता नांदावी, शांततेमुळे सर्वांचे जीवन समृद्ध व्हावे हे स्वप्न रुझवेल्ट यांचे होते. चर्चिलशी यावरून त्यांचे मतभेद होते. भारतात राष्ट्रीय सरकार स्थापन करून विस्तृत अधिकार द्यावेत असे त्यांनी सुचवले. नेहरूंनीही रुझवेल्टकडून आदरपूर्वक स्वातंत्र्यासाठी नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त केली होती.

पुस्तकात काही त्रुटी आहेत. केन्सना नोबेल पुरस्कार मिळाल्याचा उल्लेख चुकीचा आहे. मात्र पुस्तकातील विचार आजच्या परिस्थितीतही उपयुक्त वाटतात.

---

## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# महाराष्ट्रातील साखर उद्योग: समस्या व उपाय

**नागेश मोहनराव सुर्यवंशी, मुंबई-१२,**
डॉ. टी.के. कला आणि
वाणिज्य महाविद्यालय, परेल.
भ्रमणध्वनी: ९८६७००४१८२

कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या दुय्यम क्षेत्रातील उद्योगाचा विकास होणे आवश्यक असते. म्हणून नियोजनाच्या काळामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजना काळामध्ये शेती क्षेत्राचा विकास आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळामध्ये शेती आधारित आणि इतर उद्योगांचा विकास करण्याचे ठरविण्यात आले. आजही भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ६७ वर्षानंतर जवळपास ५५ % लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे आणि ही लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. म्हणून या ग्रामीण भागाच्या विकासासाठी कृषि पूरक उद्योगाचा विकास होणे आवश्यक असते. म्हणुन स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकारी चळवळ एक प्रभावी साधन म्हणून वापरण्यात आले. त्यामुळे भारतातील सहकारी चळवळीने विशेषत: महाराष्ट्रात अनेक सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात आले. महाराष्ट्रामध्ये साखर उद्योग विशेषत: ग्रामीण भागाच्या विकासासाठी संजीवनीच ठरला आहे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी कापूस गिरण्या, साखर कारखाने, दूध संकलन केंद्रे, फळबाग लागवड इ. व अशा अनेक उद्योग व्यवसायांचा हातभार लागत आहे. परंतु प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात साखर उद्योगाची भूमिका काय आहे ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील साखर उद्योग:**

केवळ भारतातच नव्हे तर आशिया खंडातील पहिला साखर कारखाना कै. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी १९५० मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रवरानगर (लोणी) येथे स्थापन केला. त्यामुळे दुष्काळग्रस्त असणाऱ्या अहमदनगर जिल्ह्याच्या विकासास एक वेगळी दिशा मिळाली. त्यानंतर या साखर कारखान्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन शासनाने साखर कारखान्यांचे जाळे देशभर पसरवले. त्यामुळे महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या ग्रामीण विकासाला एक नवीन दिशा मिळाली

व हजारो लोकांना साखर उद्योगात रोजगार मिळाला.

महाराष्ट्रामध्ये २००६-०७ हे वर्ष अतिरिक्त साखर उत्पादनाचे वर्ष ठरले. त्याचवेळी महाराष्ट्रामध्ये एकूण साखर कारखान्यांची संख्या १८८ होती. त्यापैकी १६३ कारखाने कार्यरत होते. तर २०१०-११ या वर्षी राज्यातील एकूण २०१ साखर कारखान्यापैकी १६७ साखर कारखाने कार्यरत होते आणि २०११-१२ या वर्षी राज्यातील एकूण २१४ साखर कारखान्यांपैकी १७६ कारखाने कार्यरत होते.

महाराष्ट्र हे ऊस उत्पादनाच्या बाबतीत भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत अग्रेसर असे राज्य आहे. महाराष्ट्राने गेल्या अनेक वर्षापासून साखरेच्या उत्पादनात सातत्य टिकवून ठेवले आहे. १९९५-९६ ते २०००-०१ या दरम्यानच्या कालखंडामध्ये उसाचे लागवड क्षेत्र, उसाची गाळप क्षमता, साखरेचे उत्पादन या बाबतीत सातत्याने वाढ झालेली दिसून येते. याचे श्रेय महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला जाते. तसेच सहकारी चळवळ यशस्वी करण्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण, विठ्ठलराव विखे-पाटील, धनंजय गाडगीळ, वैकुंठ भाई मेहता आणि वसंतदादा पाटील या दूरदृष्टी असणाऱ्या नेत्यांकडे जाते.

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या ऊसाचे क्षेत्र, उत्पादन, गाळप क्षमता, साखरेचे उत्पादन, साखरेचा उतारा यांचा आढावा (१९९५-९६ ते २०११-१२) पुढील प्रमाणे घेण्यात आलेला आहे.

**१९९५-९६ ते २०१२-१३ या काळातील महाराष्ट्रातील साखर उद्योगाची स्थिती:**

महाराष्ट्रातील साखर कारखान्यामध्ये १९९५-९६ या वर्षी ५१४.५८ लाख मे.टन इतक्या ऊसाचे उत्पादन करण्यात आले व १०.४९% उताऱ्यासह ५३.९४ लाख मे.टन इतक्या साखरेचे उत्पादन झाले. तर २०००-०१ या वर्षी ६७६.४९ लाख मे.टन इतक्या ऊसाचे गाळप करून ११.६४% उताऱ्यासह ६७.०५ लाख मे.टन साखरेचे उत्पादन करण्यात आले. १९९५-९६ पासून २०००-०१ या कालखंडात ऊसाचे उत्पादन, गाळप क्षमता, साखरेचे उत्पादन यामध्ये सातत्याने वाढ होत गेली. परंतु २००१-०२ नंतर मात्र ऊसाचे उत्पादन, गाळप क्षमता, साखरेचे उत्पादन, उतारा या सर्व बाबतीत फक्त २००६-०७ हे वर्ष वगळता घट झालेली आहे. २००१-०२ या वर्षी ४८३.८७ लाख मे.टन इतक्या ऊसाचे गाळप करून ११.६२% उताऱ्यासह ५६.१२ लाख मे.टन इतक्या साखरेचे उत्पादन करण्यात आले. २००३-०४ या वर्षी ऊसाचे २९०.३९ लाख मे.टन इतक्या ऊसाचे गाळप करून १०.९४% उताऱ्यासह ३१.७१ लाख मे.टन इतक्या साखरेचे उत्पादन करण्यात आले. २००६-०७ या वर्षी ७९०.८४ लाख मे.टन गाळप करून १०.८९% उताऱ्यासह ९१.०० लाख मे.टन साखर उत्पादीत करण्यात आली. २००७-०८ या वर्षामध्ये ७६.२ ला.मे.टन ऊसाचे गाळप करून ११.९०% उताऱ्यासह ९.०६ लाख मे.टन साखरेचे उत्पादन करण्यात आले. २००८-०९ या वर्षी ४० लाख मे.टन ऊसाचे गाळप करून ११.४४% उताऱ्यासह ४.५६लाख मे.टन साखरेचे उत्पादन झाले. २००९-१० या वर्षी ६१.४ लाख मे.टन ऊसाचे गाळप करून ११.५% उताऱ्यासह ७.०६ लाख मे.टन साखरेचे उत्पादन करण्यात

आले. २०१०-११ या वर्षी ७९.५ ला.मे.टन ऊसाचे गाळप करून ११.२९% उताऱ्यासह ८.९ ला.मे.टन साखरेचे उत्पादन करण्यात आले. २०११-१२ यावर्षी ७७.१२५ ला.मे.टन ऊसाचे गाळप करून ११.६६% उताऱ्यासह ८.९८२ ला.मे.टन साखरेचे उत्पादन करण्यात आले.

२०१२-१३ या वर्षी महाराष्ट्रामध्ये पावसाच्या कमतरतेमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. तसेच धरणांची पाण्याची पातळी फारच कमी झाली होती. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. त्यामुळे शेतीसाठी धरणांमधून होणारा पाण्याचा पुरवठा थांबवण्यात आला. ऊसासाठी पाणी पुरवठा नसल्यामुळे ऊसाचा वापर जनावरांसाठी वैराण म्हणून करण्यात आला. परिणामी ऊसाचे लाभ क्षेत्र १०.०५ लाख हेक्टर वरून ९.४५ लाख हेक्टर पर्यंत कमी झाले. महाराष्ट्राची सरासरी ऊस उत्पादकता प्रती हेक्टर ८१ टन इतकी आहे. तामिळनाडू राज्याची ऊस उत्पादकता सर्वाधिक म्हणजेच १०३ टन प्रती हेक्टर आहे. त्यापाठोपाठ कर्नाटक राज्याची सरासरी ऊस उत्पादकता ८९ टन प्रती हेक्टर आहे. यावरून लक्षात येते की इतर ऊस उत्पादक राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याची ऊस उत्पादकता कमी आहे. त्यामुळे महाराष्ट्रामधील ऊस लागवड क्षेत्र वाढवणे, उत्पादकता वाढवणे हे मोठे आव्हान सहकार विभागापुढे तसेच महाराष्ट्र सरकार पुढे आहे. त्यामुळे राज्यातील साखर उद्योगास नवीन दिशा देण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजनाची आवश्यकता आहे.

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या समस्या:**

१) कारखान्यांचे आजारपण:

साखर कारखाने आजारी पडण्याचे महत्वाचे कारण म्हणजे आर्थिक नियोजन व काटकसरीचा अभाव होय. बहुतेक कारखान्यातील व्यवस्थापक किंवा संचालकांमध्ये कार्यक्षमतेचा अभाव जाणवतो. त्यामुळे आर्थिक नियोजन होत नाही. परिणामी कारखान्यांची कार्यक्षमता कमी होते.

२) ऊसाच्या किमतीची व पुरवठ्यांची समस्या:

ऊसाचा पुरवठा तीन घटकांवर अवलंबून असतो. ते म्हणजे ऊसाची किंमत, इतर शेत मालाच्या किंमती व पाण्याची उपलब्धता. पाण्याची उपलब्धता ज्या शेतकऱ्याकडे असते तोच ऊसाची लागवड करतो. तसेच जो कारखाना ऊसाला जास्त किंमत देतो त्या कारखान्याच्या क्षेत्रातच जास्त ऊसाची लागवड झालेली दिसून येते.

३) अतिरिक्त कामगार भरती:

गाळप क्षमतेनुसार प्रत्येक कारखान्यांना किती कामगारांची भरती करावी याची प्रमाणके आयुक्तांनी ठरवून दिलेली असतात. परंतु काही कारखाने वगळता कायम आणि हंगामी कामगारांची अतिरिक्त भरती झालेली आढळून येते.

४) जलद ऊस वाहतूकीची समस्या:

ऊस तोडल्यानंतर बराच काळ शेतात पडून राहिल्यास साखरेचा उतारा घटतो. म्हणून जलद वाहतूक व्यवस्था केल्यास उत्पादनावर अनुकूल परिणाम होण्यास मदत होते.

५) सदोष परवाना पद्धत:

साखर कारखान्याना परवानगी देताना सिंचन सुविधा, दळणवळणाच्या सोई, ऊस लागवड क्षेत्र याचा विचार झाला पाहिजे. परंतु

राजकीय हितसंबंधामुळे परवानगी दिलेले कारखाने आज बरेच आजारी पडलेले आढळतात.

६) वाढते कर्ज:

कारखान्यांनी घेतलेल्या अल्पकालीन व दीर्घकालीन कर्जाचा व्याजदर १६% ते १८% असतो. त्यामुळे कर्जाची पतरफेड वेळेवर होत नाही. त्यामुळे कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत जातो.

७) गाळप क्षमतेचा अपुरा वापर:

साखर कारखान्याना आपल्या गाळप क्षमतेचा पूर्णपणे वापर करण्यासाठी १६० दिवस ऊस मिळाला पाहिजे. परंतु दिवसेंदिवस ऊस लागवड क्षेत्रामध्ये होणारी घट यामुळे कारखान्यांच्या पूर्ण गाळप क्षमतेचा वापर होत नाही.

**साखर कारखान्याच्या विकासासाठी उपाय योजना:**

१) साखर कारखान्यानी साखरेबरोबरच इतर दुय्यम वस्तूंच्या निर्मितीवर (कागद, अल्कोहोल, गुरांचे खाद्य, खते इ.) लक्ष केंद्रित करावे.

२) ऊस लागवडी खालील क्षेत्र व ऊस उत्पादकता वाढवण्यासाठी राज्य शासनाने तसेच कारखान्यांनी विविध योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

३) साखर कारखान्यांमध्ये कुशल व कार्यक्षम श्रमिकांची भरती करावी.

४) साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी दरवर्षी लेखा परिक्षण करावे.

५) केंद्र व राज्य सरकार तर्फे साखर उद्योगासाठी लावण्यात येणारे विविध कर रद्द करण्यात यावेत.

६) साखर कारखान्यांच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी केंद्र व राज्य सरकारने पुरेसे अर्थसहाय्य करावे.

**सारांश:**

महाराष्ट्रातील साखर उद्योगाला सध्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. साखर कारखान्यांच्या संख्येमध्ये जरी भर पडत असली तरी कारखान्यांचे आजारी पडण्याचे प्रमाणही वाढत आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे ऊस लागवडीखालील क्षेत्र कमी होत आहे. परिणामी साखर उत्पादनाच्या वृद्धी दरामध्ये मागील काहीवर्षामध्ये घट झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या अर्थकारणामध्ये आणि समाजकारणामध्ये, ग्रामीण भागाच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या साखर उद्योगाचे भवितव्य धोक्यात येत आहे. शेतकरी आंदोलने, अवर्षण, लोकरी मावा या सारख्या बाबीमुळे साखर उद्योग अडचणीत येत आहे. त्यामुळे राज्यातील साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजनांची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची:**


१) डॉ. बी. डी. खंदारे, *योजना* (सप्टेंबर - २००६) अंक २

२) डॉ. एम. एन. सोंडगे, *योजना* (एप्रिल - २०१०) अंक १

३) व्ही. एस. करपे, भोसले, पवार, मराठवाडा अर्थशास्त्र परिषद स्मरणिका, २९ वे अधिवेशन ४ व ५ फेब्रुवारी २०१२.

४) डॉ. मुकुंद महाजन - *भारताचे कृषि अर्थशास्त्र*

५) www.vsisugar.com

# करार शेती: कृषि विकासाचे माध्यम

ज्ञानेश्वर विष्णु गोरे, देऊळगाव राजा,
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री व्यंकटेश महाविद्यालय,
जिल्हा: बुलडाणा.
भ्रमणध्वनी: ९१७५७१०३७५.
E-mail: dvgore12@gmail.com

भारतीय अर्थव्यवस्था ही एक कृषी प्रधान अर्थव्यवस्था असून शेती ही भारतीयांची जीवनपध्दती बनलेली आहे. सन १९५१-५२ ते सन २०१०-११ या संपूर्ण योजना कालावधीदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण अन्नधान्य उत्पादन ५२ दशलक्ष टनांपासून २४४.७८ दशलक्ष टनांपर्यंत वाढले असले तरी या कालावधीदरम्यान सकल देशांतर्गत उत्पादितामधील कृषी क्षेत्राचा वाटा ५६% पासून १४% पर्यंत कमी झालेला दिसून येतो. परंतु ज्या प्रमाणात सकल देशांतर्गत उत्पादितामधील कृषी क्षेत्राचा वाटा कमी होत आहे. त्या मानाने कृषी क्षेत्रावरील लोकसंख्येचे अतिरिक्त अवलंबित्व कमी करण्यात आणि कृषी विकासाचे नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यात भारतीय नियोजनाला येत असलेले सातत्यपूर्ण अपयश ही खऱ्या अर्थाने चिंतेची बाब असल्याचे स्पष्ट होते (भारताची आर्थिक पाहणी: २०११-१२).

या दृष्टिकोनातून भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्य निर्मूलन, उत्पादक रोजगार निर्मिती, समतोल प्रादशिक विकास, चिरंतन अन्नसुरक्षा इत्यादी विविध उद्दिष्टांच्या माध्यमातून जलद, चिरंतन व अधिक समावेशक कृषी विकास आवश्यक ठरतो (भारत सरकार - २०११). भारतीय कृषी उत्पादकांना जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी पुरेशा प्रमाणात संस्थात्मक वित्त पुरवठा, प्रगत तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी उत्पादन पध्दती, पर्याप्त व गुणवत्तापूर्ण आधारसंरचनेची उपलब्धता इत्यादी घटकांच्या पूर्ततेसाठी सार्वजनिक प्रयत्नांबरोबरच खाजगी क्षेत्राचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरतो. म्हणजेच मूल्यवर्धीत कृषी विकासाच्या माध्यमातून कृषी आधारीत उद्योग व सेवांचा जलद विकास व पर्यायाने 'जलद, चिरंतन आणि अधिक समावेशक विकास' साध्य करण्याचे

एक प्रभावी माध्यम म्हणून करार शेती हा सर्वोत्तम पर्याय ठरु शकतो.

## संशोधन पध्दती व उद्दिष्ट्ये:

प्रस्तुत शोधनिबंध विश्लेषणात्मक स्वरुपाचा असून शोधनिबंधाच्या विश्लेषणासाठी दुय्यम साधनांचा अवलंब केलेला आहे. शोधनिबंधाच्या विश्लेषणासाठी आवश्यक दुय्यम स्वरुपाची माहिती संकलित करण्यासाठी विविध शासकीय संस्थांचे अहवाल आणि मान्यताप्राप्त नियतकालिकांतील लेखांचा आधार घेतलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करत असताना पुढील उद्दिष्ट्ये विचारात घेतलेली आहेत:

१) करार शेतीची संकल्पना व प्रकार स्पष्ट करणे.

२) करार शेतीअंतर्गत भारतीय शेतकऱ्यांना होणारे फायदे व संभाव्य धोके स्पष्ट करणे.

३) करार शेतीअंतर्गत सहभागी खाजगी उद्योगसंस्थांना प्राप्त होणारे फायदे व संभाव्य धोके स्पष्ट करणे.

४) करार शेतीच्या माध्यमातून जलद, चिरंतन आणि अधिक समावेशक कृषी विकासाची प्रक्रिया सक्षम बनविण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

## करार शेतीची संकल्पना व प्रकार:

भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र आणि कृषी प्रक्रिया उद्योगांमध्ये प्रचंड वेगाने रुपांतर घडून येत असून या प्रक्रियेअंतर्गत कृषी उत्पादन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विपणन इत्यादी घटकांतील वाढते अंतर कमी करुन भारतीय शेतकरी आणि प्रकिया उद्योजकांना चिरंतन उत्पन्न प्रवाह निर्माण करण्याची संधी प्राप्त करुन देण्याच्या कार्यामध्ये 'करार शेती' अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

करार शेती संसाधन केंद्राने केलेल्या व्याख्येनुसार, ''करार शेती म्हणजे अशी कृषी उत्पादन पध्दती आहे ज्या अंतर्गत कृषी उत्पादक (शेतकरी) आणि कृषी उत्पादनाचे खरेदिदार (खासगी प्रक्रिया उद्योजक) यांच्यातील विशिष्ट करारानुसार कृषी उत्पादक व विक्रीचे व्यवहार केले जातात.''

भारतातील कमाल जमीन धारणा कायद्यानुसार कृषी प्रक्रिया उद्योगांना स्वत:च्या मालकीची जमीन धारण करणे आणि शेतमालाचे व्यापारी तत्त्वानुसार उत्पादन घेण्याचे अधिकार नसल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रक्रिया उद्योग आणि कृषी उत्पादक यांच्यात कच्च्या मालाचे उत्पादन आणि प्रक्रिया उद्योगासंदर्भात जे कायदेशीर करार होत असतात त्यांनाच करार शेती असे म्हणतात.

## करार शेतीचे प्रकार :

सि. एटॉन आणि ए. डब्ल्यू. शेफर्ड यांच्या अध्ययनानुसार जगातील विविध अर्थव्यवस्थांमध्ये आजपर्यंत अनुभवास अलेल्या करार शेतीच्या विविध प्रतिमानांपैकी काही यशस्वी प्रतिमाने पुढील प्रमाणे आहेत :

१) केंद्रीकृत प्रतिमान (Centralized Model) -

या प्रतिमानांतर्गत कृषी उत्पादकासोबत करार करणाऱ्या प्रक्रिया उद्योगाकडून शेतकऱ्यांना उत्पादन प्रक्रियेत विविध प्रकारचे सहकार्य व मार्गदर्शन करुन निर्धारीत किंमतीला शेतमालाची खरेदी केली जाते. तसेच या उद्योग संस्थेकडूनच

त्यावर प्रक्रिया करुन पॅकेजिंग व विपणनाचे कार्य देखील केले जाते. त्यामुळे या प्रतिमानांतर्गत उच्च गुणवत्ता टिकविणे शक्य होते. या प्रतिमानाचा अवलंब प्रामुख्याने तंबाखू, कापूस, ऊस, केळी, कॉफी, चहा, रबर इत्यादी पिकांबाबत केला जातो.

२) न्यूक्लियस इस्टेट प्रतिमान (Nucleus Model)

हे प्रतिमान केंद्रीयीकृत प्रतिमानाचेच एक विकसित स्वरुप असून या प्रतिमानांतर्गत प्रोत्साहक हा स्वत:च कृषी उत्पादन प्रक्रियेत सहभागी असतो. शक्यतो लागवडीखालील क्षेत्र हे कृषी प्रक्रिया उद्योगाच्या सानिध्यातच असते. या प्रतिमानाचा अवलंब प्रामुख्याने ताज्या पालेभाज्या व फळे यांचे उत्पादन व प्रक्रिया या संदर्भात केला जातो.

३) बहुभागीय प्रतिमान ( Multipartite Model)

या प्रतिमानांतर्गत स्थानिक शेतकरी व उत्पादनाचे खरेदिदार यांच्या दरम्यान शासन व अधिकोषण संस्थांसारख्या वैधानिक संस्था दुवा म्हणून कार्य करतात. या प्रतिमानांतर्गत विविध आदानांचा पुरवठा, पतपुरवठा, व्यवस्थापन, उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन इत्यादी विविध सेवा पुरविणाऱ्या संस्था वेगवेगळ्या असू शकतात.

४) अनौपचारिक प्रतिमान ( Informal Model)

अशा प्रकारचे अनौपचारिक करार वैयक्तिक उद्योजकांकडून किंवा छोट्या कृषी प्रक्रिया उद्योगसंस्थांकडून केले जातात. या प्रतिमानांतर्गत अतिशय साधे, सरळ आणि हंगामी स्वरुपाचे करार केले जातात. या प्रतिमानाचा अवलंब टरबूज, विविध फळे आणि पालेभाज्या इत्यादी कृषी उत्पादनांच्या संदर्भात केला जातो.

५) मध्यस्थ प्रतिमान ( Intermediary Model)

या प्रतिमानांतर्गत कृषी उत्पादक आणि प्रक्रिया उद्योजक यांच्या दरम्यान शेतमालाचे संकलक, शेतकरी संघ, बीगर सरकारी संघटना या सारखे मध्यस्थ अस्तित्वात असतात. शेतमालाचे अंतिम खरेदीदार या मध्यस्थांसोबत कायदेशीर करार करतात. तर या मध्यस्थांकडून शेतकऱ्यांशी स्वतंत्रपणे अनौपचारिक करार केले जातात. या प्रतिमानानुसार कृषी उत्पादक आणि प्रक्रिया उद्योजक यांच्यामध्ये प्रत्यक्ष व्यवहार होत नसल्यामुळे शेतकरी आणि प्रक्रिया उद्योजक या दोन्ही घटकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

## करार शेती अंतर्गत भारतीय शेतकऱ्यांना होणारे लाभ व संभाव्य धोके:

करार शेती अंतर्गत कृषी उत्पादक आणि प्रक्रिया उद्योग यांच्या दरम्यान केल्या जाणाऱ्या कायदेशीर करारामुळे भारतीय शेतकऱ्यांना पुढील लाभ प्राप्त होऊ शकतात :

१)दर्जेदार कृषी आदाने व सेवांची सहज उपलब्धता.

२)अत्याधुनिक कृषी तंत्र आणि तंत्रज्ञानाची सहज उपलब्धता.

३)विविध उत्पादन कौशल्यांचे उद्योगाकडून कृषी क्षेत्राकडे हस्तांतरण.

४)निश्चित किमतीला शेतमालाच्या विक्रीची व निश्चित उत्पन्नाची हमी.

५)नियंत्रित व विश्वासार्ह बाजारपेठेची उपलब्धता.

६)कृषी उत्पादन आणि उत्पादकता वाढीसाठी प्रेरणा.

७)कृषी व ग्रामीण क्षेत्राच्या जलद व चिरंतन विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती.

करार शेतीअंतर्गत कृषी उत्पादकांना वरील प्रमाणे काही लाभ प्राप्त होत असले तरी करार शेती अंतर्गत कृषी उत्पादकांच्या दृष्टिकोनातून पुढील धोके संभवतात :

१. अनेकदा शेतकरी व प्रक्रिया उद्योजक यांच्यादरम्यान तोंडी स्वरुपाचे औपचारिक करार होतात. अशा स्थितीमध्ये बाजार किमती कमी झाल्यास प्रक्रिया उद्योगाकडून पूर्वनिर्धारीत किंमतीला कृषी उत्पादनाची खरेदी न करण्याचा धोका संभवतो.

२. करार शेती अंतर्गत उत्पादनाची गुणवत्ता व निश्चित आकारमान टिकविण्याची जबाबदारी बऱ्याचदा कृषी उत्पादकांवर असते. यात अपयश आल्यास प्रक्रिया उद्योगाकडून करार रद्द केला जाण्याचा धोका संभवतो.

३. अर्थव्यवस्थेतील कार्यसंस्कृतीचा अभाव हा देखील करार शेती अंतर्गत एक मोठा धोका संभवतो.

## करार शेती अंतर्गत प्रक्रिया उद्योगांना होणारे फायदे व संभाव्य धोके:

करार शेती अंतर्गत कृषी उत्पादक आणि प्रक्रिया उद्योग यांच्यादरम्यान केल्या जाणाऱ्या कायदेशीर करारांमुळे प्रक्रिया उद्योगांना पुढील लाभ प्राप्त होऊ शकतात.

१. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कच्च्या मालाच्या मुबलक पुरवठ्याची हमी.

२. जमीन धारणविषयक निर्बंधावर करार शेती हा प्रभावी उपाय ठरतो.

३. कच्च्या मालाच्या उपलब्धतेसाठी अनेक पर्याय प्राप्त होतात.

करार शेती अंतर्गत प्रक्रिया उद्योगांना वरील प्रमाणे काही लाभ प्राप्त असले तरी त्यांना काही धोके देखील संभवतात ते पुढील प्रमाणे :

१. पुरेशा प्रमाणात जमिनीच्या व कृषी उत्पादकांच्या उपलब्धतेतील अडचण.

२. कुशल व गुणवत्तापूर्ण कृषी उत्पादकांच्या उपलब्धतेची अडचण.

३. भारतीय अर्थव्यवस्थेतील पारंपरिक शेती पध्दतीमुळे निर्माण होणारे सामाजिक व सांस्कृतिक अडथळे.

४. बाजार किमतीमध्ये वाढ झाल्यास कृषी उत्पादकांकडून कराराचे उल्लंघन होण्याचा धोका.

५. अर्थव्यवस्थेतील कार्यसंस्कृतीचा अभाव.

## करार शेती विकासासाठी धोरणात्मक उपाययोजना:

करार शेती अंतर्गत शेतकरी आणि प्रक्रिया उद्योगांना संभवणारे विविध धोके कमी करुन जलद, चिरंतन आणि अधिक समावेशक कृषी विकासाचे व पर्यायाने अधिक समावेशक आर्थिक विकासाचे एक प्रभावी माध्यम म्हणून करार शेतीचा विकास करण्यासाठी पुढील उपाययोजना करणे गरजेचे ठरते:

१. शेतकरी आणि प्रक्रिया उद्योगांमध्ये केल्या जाणाऱ्या कायदेशीर करारांमध्ये सरकार आणि राष्ट्रीयीकृत अधिकोषण संस्थांनी दुवा

म्हणून कार्य करणे गरजेचे आहे.

२. कृषी व ग्रामीण भागातील निरक्षरतेचे मोठे प्रमाण लक्षात घेता शासनाने करार शेती अंतर्गत शेतकऱ्यांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

३. अधिकाधिक खासगी प्रक्रिया उद्योगांना करार शेतीच्या माध्यमातून भारतीय कृषी विकासात सहभागी करुन घेण्यासाठी शासनाने भारतीय कृषी व ग्रामीण आधार संरचनेचा गुणवत्तापूर्ण पध्दतीने जलद विकास करणे गरजेचे आहे.

## समारोप:

भारताचे विद्यमान राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी ६४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून केलेल्या अभिभाषणानुसार, "भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये गेल्या ६०० वर्षांमध्ये जेवढे बदल झाले असतील त्यापेक्षाही अधिक बदल आणि नवप्रवर्तन गेल्या ६० वर्षांमध्ये घडून आले आहेत." या विकासात्मक संक्रमण प्रक्रियेमध्ये भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत संस्थात्मक नवप्रवर्तनाच्या माध्यमातून जलद कृषी व ग्रामीण विकासाचे एक प्रभावी माध्यम म्हणून करार शेती अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

शेतकऱ्यांना दर्जेदार व उच्च उत्पादन देणाऱ्या बी-बियाण्यांची उपलब्धता करुन देणे, आधुनिक उत्पादन तंत्रविषयक तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे, अत्याधुनिक तंत्रज्ञान व मुबलक संस्थात्मक वित्त पुरवठा उपलब्ध करुन देणे आणि सर्वाधिक महत्त्वाचे उत्पादित कृषी मालाची निश्चित किंमतीला विक्रीची व निश्चित उत्पन्नाची हमी देऊन कृषी उत्पादन आणि उत्पादकता वाढीसाठी प्रेरणा मिळवून देण्यामध्ये करार शेतीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेली आहे.

थोडक्यात भारतीय शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाची हमी मिळवून देऊन उत्पादक रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन, अन्नधान्य उत्पादन व अन्न सुरक्षितता यासह कृषी व ग्रामीण विकासाच्या माध्यमातून उद्योग व सेवा क्षेत्रांचा व पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेचा जलद, चिरंतन आणि अधिक समावेशक विकास साध्य करण्यासाठी करार शेती हे एक प्रभावी माध्यम ठरु शकते.

## संदर्भसूची:


1) Govt. of India (2012) : *"Economic Survey : 2011-12"*, Ministry of Finance, New Delhi.

2) Govt. of India (2011) : *"Faster, Sustainable and More Inclusive Grwoth- An Approach to the XIIth Five Year Plan"*, Planning Commission, New Delhi.

3) Dr. C. S. Deshpande (2005) : *"Contract Farming as Means of Value Added Agriculture"*, Occassional Paper, NABARD, Mumbai.

4) Gulati Ashok (2008) : *"Fragmenting Bottom and*

*Consolidating Top"*, Indias Changing Food System and Implications For Small Holders : Some Aspects of Economic and Social Development (eds.), S. Mahendra Dev and K.S. Babu, Academic Foundation, India.

5) Singh Sukhpal (1998) : *"Should Indian Farming Go Corporate?"*, Business India, Aug. 24, PP. 6.

6) Charles Eaton and A.W. Shepherd : *"Contract Farming : Partnerships for Grow"*, Agricultural Services Bulletin, Rome, ISBN : 92-5-104593-3, PP. 41-56.

7) Glover D. And Kusterer K. (1990) : *"Small Farmers, Big Business : Contrat Farming and Rural Developing"*, London, Macmillan.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ. अनिल सूर्यवंशी (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

# अर्थ शब्दांची वाट पाहे

# मज्जार्थशास्त्र

## (Neuro Economics)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

**मज्जार्थशास्त्र (Neuro Economics):**

जागतिकीकरणाच्या लाटेपूर्वी (१९८० नंतर) प्रथम भाववाढ हा जागतिक प्रश्न झाला. आता २१ व्या शतकाच्या पहिल्या अर्ध्यात मंदी किंवा भावघसरण हा जागतिक प्रश्न झाला. आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध अत्यंत गुंतागुंतीचे व गतिमान झाले. नवे आर्थिक प्रश्न निर्माण झाले. अनेक प्रकारची आर्थिक धोरणे, उपाय योजना व कार्यक्रम निर्णय घेणाऱ्यांच्या बौध्दिक तरलतेशी जोडले जाऊ लागले. निर्णय घेणाऱ्यांच्या मज्जासंस्थेचे कार्य कसे चालते यावर घेतलेले आर्थिक निर्णय व प्रस्थापित अर्थसिध्दान्त यांतील संबंध अवलंबून राहतात. कल्पनाशक्ती, निर्वचनशक्ती, जिज्ञासा व शोधवृत्ती तसेच अमूर्त अनुभवांचे मापनक्षम व्यक्तिकरण या सर्व गोष्टी मूलतः मज्जाशक्तीची मूळ पातळी व कार्यक्षमता यावर अवलंबून असतात, या दृष्टीने वर्तमान जगात आपल्या समोर येणाऱ्या व्यापक व क्लिष्ट अनुभवांच्या व २१ व्या शतकातील नावीन्य वैविध्याचा नेमका अर्थ समजून घेण्यासाठी निकोलस ए. ख्रिस्टॅक्स यांच्या मते सामाजिकशास्त्रामध्ये बायोसोशल सायन्सेस, नेटवर्क सायन्स, न्यूरो-इकॉनॉमिक्स, बिहेविरल जेनेटिक्स आणि कॉम्प्यूटेशनल सोशल सायन्सेस असे नवे विषय आणण्याची गरज आहे. त्यातील (Neuro Economics) या शब्दासाठी प्रस्तुत लेखक 'मज्जार्थशास्त्र' हा शब्द सूचवित आहे. कारण माणसाच्या मज्जासंस्थेच्या आरोग्यावर, पातळीवर व वापरावर बौध्दिक क्षमता अवलंबून असतात.

संदर्भ: निकोलस ए. ख्रिस्टॅक्स-*लेट अस शेक अप सोशल सायन्सेस*, इकॉनॉमिक टाईम्स, २२ जुलै २०१३.

International Research Journal
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक
# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थ:।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. जे. एस. पाटील,
अध्यक्ष
शांती प्लाझा,
बी-९, ८८०/८८१,
शनिवार पेठ, सातारा-४१५ ००२,
भ्रमणध्वनी:९४२३२६१७१६

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर,
बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
भ्रमणध्वनी:९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं. ३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक

निवेदन

नेल
ग्रळ,

ह्रा-

ि


# Gokhale's Advanced Training Institute Jalgaon

GATI
यत्र गतिः तत्र यशः



Contributing to National Skills Development ..



**For details contact :**
23, Sneha Sudha Apartments, Near M.J.College, Jalgaon.
Mobile: 9822770904, 9881153936
**Email: info@gatiskills.com | Website: www.gatiskills.com**

## INDUSTRIAL AUTOMATION COURSES

TAACT In association with Teknocrats Academy of Automation & Control Technology (TAACT), Nashik

- **Certified Automation Engineer (CAE)**
- Industrial Automation workshop
- AC Motors & Drives
- Hydraulics & Pneumatics
- Basic PLC programming
- Advanced PLC programming
- Integrated Programming of PLC, HMI & SCADA & many more

## HEALTH MANAGEMENT COURSES

- Basics of stress management
- Human Behaviour
- Stress & lifestyle diseases
- Stress & health
- Involvement & influence of stress in our life
- Stress management by yoga & Ayurveda

## SOFT SKILLS COURSES

- Communication skills
- Presentation skills
- Time management
- Leadership development
- Listening skills
- Neuro Linguistic Programming (NLP)
- Voice modulation
- Being positive, creative & assertive

**| Experienced faculties | Unique course contents |**
**| Resourceful library | Placement assistance |**

(जाहिरात सहकार्यः प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष, म.अ.प.)



**Accredited by NAAC with "B" Grade**

**Affiliated to SantGadge Baba Amravati University**

## *Salient Features*

- *Highly Qualified and Dedicated Faculty*
- *Provision of Higher Education to Rural Students at Affordable Fees*
- *Innovative Practices for students*
- *Deep Commitment to Society Through Extension Activities*
- *Glorious Achievements in Academic and Sports*


Principal S. N. Deshmukh

WEBSITE : [illegible] MAIL : [illegible] PH.: 07227244479



Registration No.31918/77, अर्थसंवाद, डिसेंबर २०१३/खंड ३७, अंक ३/ मूल्य ₹.२०/-